

श्रवणयंत्रांचे विनामुल्य वाटप व जोडणीचे 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' प्रस्थापित



# SO THE WORLD MAY HEAR

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# वार्तापत्र

मा.यशवंतराव चव्हाण
३४व्या पुण्यतिथीनिमित्त
विनम्र अभिवादन !

Narotam Sekhsaria Foundation

Yashwanrao Chavan Pratishthan, Mumbai

SALAAM BOMBAY FOUNDATION

# Making INDIA TOBACCO Free














# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. ने. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. ने. एम. एम. एच. /बी. ओ. एम. - ५३९/८५

यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८५९८, २२०४५४६० फॅक्स : २२८५२०८१/८२

**➢ विश्वस्त मंडळ सदस्य ➣**

१. मा. श्री. शरदराव पवार — अध्यक्ष
२. मा. श्री. अरुण गुजराथी — उपाध्यक्ष
३. मा. सौ. सुप्रिया सुळे — कार्याध्यक्ष
४. मा. श्री. श. गं. काळे — सरचिटणीस
५. मा. श्री. हेमंत टकले — कोषाध्यक्ष
६. मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर
७. मा. श्री. राम प्रधान
८. मा. श्री. वसंतराव कार्लेकर
९. मा. श्री. दिलीप वळसे-पाटील
१०.मा. श्री. अजित निंबाळकर
११.मा. श्री. बी. के. अग्रवाल
१२.मा. श्री. अमित डहाणूकर
१३.मा. श्री. डॉ. समीर दलवाई
१४.मा. श्री. ना. धों. महानोर
१५.मा. सौ. प्रभा कुलकर्णी

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६.मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगरविकास विभाग
१७.मा. श्री. एन. जे. जमादार
सचिव व वरिष्ठ विधी सल्लागार

**➢ कार्यकारिणी मंडळ सदस्य ➣**

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. लक्ष्मण माने
१०.मा. श्री. विनायकराव पाटील
११.मा. श्री. के. बी. आवाडे
१२.मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३.मा. श्री. जीवनराव गोरे
१४.मा. श्री. विजय शिर्के
१५.मा. श्री. जयराज साळगांवकर
१६.मा. श्री. गणपतराव अप्पासाहेब पाटील
१७.मा. श्री. राजेश टोपे
१८.मा. श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पो. पाटील
१९.मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील
२०.मा. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले-पाटील
२१.मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२.मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगरविकास विभाग

**➢ कार्यकारी समिती ➣**

| | | | |
|---|---|---|---|
| १. मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष | ५. मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| २. मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष | ६. मा. श्री. अजित निंबाळकर | विश्वस्त सदस्य |
| ३. मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष | ७. मा. श्री. जीवनराव गोरे | सदस्य |
| ४. मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस | ८. मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील | सदस्य |

**विभागीय केंद्र**

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पो. पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | मानद अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, कोकण | अध्यक्ष | श्री. शेखर निकम |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. अंकुशराव कदम |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | - | - |
| जिल्हा केंद्र, अहमदनगर | अध्यक्ष | श्री. यशवंतराव गडाख-पाटील |
| जिल्हा केंद्र, सोलापूर | अध्यक्ष | श्री. गो. मा. पवार |
| जिल्हा केंद्र, अंबेजोगाई (बीड) | अध्यक्ष | डॉ. द्वारकादास लोहिया |
| जिल्हा केंद्र, ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |
| जिल्हा केंद्र, जळगांव | अध्यक्ष | श्री. रवींद्र प्रल्हादराव पाटील |
| जिल्हा केंद्र, पालघर | अध्यक्ष | श्री. सुनिल देवराव रणाईत |
| नवी मुंबई केंद्र | अध्यक्ष | श्री. प्रमोद कर्नाड |
| जिल्हा केंद्र, परभणी | अध्यक्ष | सौ. संध्याताई दुधगांवकर |

**विविध विभाग**

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. वसंत काळपांडे |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| | संघटक | श्री. निलेश राऊत |
| अपंग हक्क विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. विनायकराव ना. कांबळे |

**मध्यवर्ती कार्यालय**

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व कलादालन रंगस्वर | सरव्यवस्थापक, सभागृहे | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक ब्रिगेडिअर श्री. सुशील गुप्तन | |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम व्यवस्थापक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | वित्त व लेखा व्यवस्थापक | श्री. महेश चव्हाण |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक | श्री. अनिल पाझारे |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएट्स |
| सांविधानिक लेखा परीक्षक | मे. सी. व्ही. के. असोसिएट्स, मुंबई | चार्टर्ड अकाउंटंट |

अंतर्गत हिशेब तपासनीस घोरपडे मराठे ॲण्ड असोसिएट्स, मुंबई,
चार्टर्ड अकाउंटंट

# संपादकीय

आज २५ नोव्हेंबर २०१८. स्व. यशवंतराव चव्हाण यांची ३४ वी पुण्यतिथी. त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन. त्यांचे प्रेरणादायी कार्य व मार्गदर्शक विचार या पायावर त्यांच्या निधनानंतर एक वर्षाच्या आत 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई' या संस्थेची स्थापन करण्यात आली. त्यालाही आता ३३ वर्षे झाली आहेत. माहिती तंत्रज्ञान, दळणवळण, माध्यमविश्व यासह अनेक क्षेत्रांत या तीन दशकांत प्रचंड उलथापालथ झालेली आपण सर्वांनी अनुभवली आहे. बदल सतत होतच असतात हे जरी खरे असले, तरी या कालावधीत बदलाचा वेग अतिप्रचंड होता हेही वास्तव आहे. सर्वसाधारणपणे याचे स्वागत करत असताना त्यामुळे समाजातील कोणते प्रश्न आपण सोडवू शकलो आणि त्यातूनच कोणत्या नव्या समस्या आपल्यासमोर उभ्या राहिल्या याचा गांभीर्यपूर्वक विचार करण्याची गरज आहे.

कृषिआधारित अर्थव्यवस्थेसोबत स्व. यशवंतरावजींनी औद्योगिक विकासाची पायाभरणी केली व 'कृषी- औद्योगिक समाज' ही संकल्पना हळूहळू प्रत्यक्षात आकार घेऊ लागली. त्यांचे याबाबतचे विचार या अंकात एका लेखाद्वारे पुन:श्च वाचकांसमोर ठेवत आहोत. महाराष्ट्राने त्यामुळे देशात स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण केले व चव्हाण साहेबांच्या सामाजिक राजकीय दृष्टीच्या वारसदारांनी ते टिकवून ठेवले आणि पुढेही नेले. अनेक पिढ्यांचे भविष्य त्यातून आकाराला आले. ही गती आणि प्रगती आपणांला सातत्यपूर्वक कायम ठेवावी लागणार आहे. त्या विकासाचा लाभ सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहचवून सर्वांना संधी व न्याय मिळवून देण्याचीही जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. प्रतिष्ठान विविध उपक्रमांच्या द्वारे या कार्यात आपला खारीचा वाटा उचलत आहे.

विविध समाजघटकांसाठी - विशेषतः- वंचित घटकांसाठी शासनाने उत्तम ध्येय - धोरणे आखावीत व प्रत्यक्ष योजना, कार्यक्रमांद्वारे त्यांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी अनेक उपक्रम संस्था राबवीत आहे. त्यासाठी अनेक व्यक्ती, संस्था, व शासन यांच्यासोबत समन्वयाने आम्ही काम करत आहोत.

आजही आम्ही दिवसभराच्या शिक्षणविषयक परिषदेचे आयोजन केले आहे. त्यात शिक्षक, अधिकारी, शिक्षणतज्ज्ञ, पालक मिळून ३०० हून अधिक लोकांनी सहभाग घेतला. सद्यस्थितीचा आढावा घेऊन पुढील दिशा शोधण्याचा हा प्रयत्न आहे. या परिषदेत दिवंगत शिक्षणसचिव (केंद्र व राज्य) कुमुद बन्सल यांच्या नावाने वर्षातील शिक्षणविषयक उत्तम ग्रंथाला पुरस्कार दिला जातो. यावर्षी श्री. सूर्यकांत कुलकर्णी यांच्या 'सल शिक्षणाचा' या पुस्तकाला सदर पुरस्कार देण्यात आला. दिवंगत कुमुद बन्सल यांनी घालून दिलेल्या मार्गावरून मी व माझे सहकारी शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहोत.

त्यासोबतच युवा, ज्येष्ठ, दिव्यांग, एकल महिला, ट्रान्सजेंडर्स यांच्याही सोबत आमचे कार्य सुरू आहे. गेली ५ वर्षे आम्ही 'स्टारकी' या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या सहकार्याने कर्णबधिर विद्यार्थी व ज्येष्ठांसाठी जागतिक दर्जाची श्रवणयंत्रे बसवून देत आहेत. आजपर्यंत १५००० लाभार्थींना याचा उपयोग झाला आहे. यावर्षी २६ ऑक्टोबर २०१८ रोजी बालेवाडी, पुणे येथे राज्यातील ४८४८ व्यक्तींना ८ तासांच्या कालावधीत श्रवणयंत्रे बसवून जागतिक विक्रमाची नोंद करण्यात आली. 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'ने हा विक्रम प्रमाणित करून आमचा उत्साह द्विगुणित केला आहे. टाटा ट्रस्ट व इतर अनेक संस्थांच्या सहकार्याने आम्ही ही मोहीम पार पाडली. त्याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

पद्मश्री दया पवार यांच्या बलुतं आत्मकथनाला चाळीस वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने पद्मश्री दया पवार प्रतिष्ठान, ग्रंथाली वाचक चळवळ व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'बलुतंची चाळीशी' या एकदिवसीय संमेलनाचे आयोजन केले होते. अनेक मान्यवरांनी यात सहभाग घेतला.

यावर्षीचे यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक 'विदर्भ संशोधन मंडळ' ला आज प्रदान करण्यात येत आहे. मंडळाच्या कार्याविषयी सविस्तर माहिती या अंकातील मंडळाबद्दलच्या सन्मानपत्रात आपणांस पहावयास मिळेल. गेली ८४ वर्षे सातत्याने संशोधन करण्यास या संस्थेप्रती आपणा सर्वांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करते. अशा संस्थाच समाज घडवत असतात आणि पुढील दिशा-दिग्दर्शनही करत असतात. संस्थेचे प्रमुख व त्यांच्या सहकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

सुप्रिया सुळे

(सुप्रिया सुळे)

# वार्तापत्र

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३४ व्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवाद
वर्ष : २२ वे / अंक ४४ वा / प्रकाशन : २५ नोव्हेंबर २०१८

सल्लागार
**मा. शरद काळे**
**मा. हेमंत टकले**

मानद संपादक
**सुप्रिया सुळे**

कार्यकारी संपादक
**दत्ता बाळसराफ**

सहसंपादक
**सुरेश पाटील**
**अनिल पाझारे**

विशेष साहाय्य
**पद्मभूषण देशपांडे**

साहाय्य
**मीनल सावंत- पाडावे**
**रमेश मोरे**
**मनिषा खिल्लारे**
**महेश साळवी**

**केंद्रातील सहकारी :**
विद्याधर खंडे, संगीता गवारे, स्मिता रायकर, महेश चौधरी, यतीन घोडेकर, राजेंद्र रुपवते, निवृत्ती भोर, संजना पवार, शैलेश चव्हाण, शोभा लोंढे, अनिल चिंदरकर, सुकेशनी मर्चंडे-शेवडे, प्रियंका देसाई, विजय नागरे, जयेश गुजराथी, विश्वदत्त मुळे, सुरेश कोठावळे, महादेव सगरे, सुरेश सावंत, अशोक जाधव, मंगेश शिंदे, सतीश लाड, भक्ती जांभवडेकर, सुषमा साळुंखे, स्वाती शेलार यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

## अनुक्रमणिका

- माननीय यशवंतराव चव्हाण लेख.......................... ६
- यशवंतराव चव्हाण राज्यस्तरिय पारितोषिक-२०१८ मानपत्र..१०

**मध्यवर्ती कार्यालय व विविध विभाग**

- नवमहाराष्ट्र युवा अभियान ................................ १२
- अपंग हक्क विकास मंच ................................ १८
- शिक्षण विकास मंच ...................................... २४
- कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम .................... २५
- सृजन ...................................................... २८
- महाराष्ट्र महिला व्यासपीठ ................................ २९
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय ...................... ३१
- माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ............................ ३५

**विभागीय केंद्र, कार्यवृत्त**

- विभागीय केंद्र, कऱ्हाड ................................ ३६
- कृषी व सहकार व्यासपीठ आणि विभागीय केंद्र, पुणे ... ४५
- विभागीय केंद्र, नागपूर ................................ ४८
- विभागीय केंद्र, नाशिक ................................ ५१
- विभागीय केंद्र, औरंगाबाद ............................ ५६
- विभागीय केंद्र, लातूर ................................ ६२
- विभागीय केंद्र, रत्नागिरी ............................ ६४
- विभागीय केंद्र, अहमदनगर............................ ६५
- विभागीय केंद्र, सोलापूर ..............................६७
- विभागीय केंद्र, अंबाजोगाई ...........................६९
- विभागीय केंद्र, ठाणे ..... ..............................७२
- देवराष्ट्रे अहवाल ......... ..............................७४
- प्रतिष्ठानची प्रकाशने..................................... ७९

हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-कार्यकारी संपादक श्री. दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि., कांदिवली (प) येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्र. ७१५८७/९९

# औद्योगिक विकासाच्या नव्या दिशा

**– यशवंतराव चव्हाण**

जीवनामध्यें नव्या शक्तींची वाढ व्हावी हा दृष्टिकोन, जी राजकीय क्षेत्रामध्ये काम करणारी माणसे आहेत त्यांचा असणारच. त्यांना मी आग्रहाने सांगू इच्छितो, की आम्ही लोककल्याणाच्या यात्रेचा मार्ग पत्करला आहे. या यात्रेमध्ये कोणीही मागे राहू नये. कदाचित आपल्या उद्दिष्टांकडे जाण्याच्या मार्गात फरक असू शकेल. काहींचे मार्ग अलग असतील, विचार निराळे असतील. त्या विचारांशी त्यांनी प्रामाणिक राहावे. मात्र लोककल्याणाच्या या यात्रेत त्यांची आणि आमची, त्यांच्या विचारांची आणि आमच्या विचारांची, कोठेतरी एकत्र गाठ पडल्याशिवाय राहणार नाही.

**औद्योगिक विकासाच्या नव्या दिशा**

महाराष्ट्र राज्य निर्मितीकडे केवळ एक साध्य म्हणून मी पाहात नसून महाराष्ट्रातील लोकांचे विधायक विचार व त्यांचे कर्तृत्व यांची सांगड घालून विकासाच्या कार्यास चालना देण्याचे महाराष्ट्र राज्य हे एक साधन आहे असेच मी नेहमी मानत आलो आहे. या कार्यात तुमच्यासारख्या संघटनांना महत्त्वाची भूमिका बजावता येण्यासारखी आहे. राज्याचा औद्योगिक विकास भक्कम पायावर व जलदगतीने घडवून आणण्याच्या कामी सरकारशी सहकार्य करून, तुम्ही ही भूमिका योग्य प्रकारे बजावीत आहात, याबद्दल मला आनंद वाटतो. तुमच्या अध्यक्षांनी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसंबंधी सविस्तर उल्लेख केला. तथापि राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेला मला आपल्यापुढे मांडले पाहिजे. आपल्या राज्याची व त्याचप्रमाणे भारताची तिसरी पंचवार्षिक योजना चालू महिन्याच्या अखेरीस अंतिम स्वरूपात तयार होईल, अशी अपेक्षा आहे. आपल्या देशाचा आर्थिक विकास आपणांस द्रुतगतीने आणि भक्कम पायावर घडवून आणावयाचा असल्याकारणाने तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत कर्तृत्वाला अधिक संधी व अधिक वाव मिळेल याबद्दल मला शंका नाही.

अगोदरच्या योजनांमध्ये हाती घेण्यात आलेल्या काही मोठ्या प्रकल्पांचे फळ आपल्याला तिसऱ्या योजनेच्या काळात मिळेल. पोलाद उद्योग, वीज आणि वाहतूक यांचा आपण जो विकास करू शकलो त्यामुळे औद्योगिकीकरणाचा वेग वाढविण्याची गुरुकिल्ली आपल्या हाती आली आहे. आपण जी साधनसामग्री निर्माण केली आहे, तिचा पूर्ण काटकसरीने उपयोग करून घेणे आणि त्याचबरोबर उत्पादनाची जी ताकद आज आपल्याकडे आहे, ती वाया जाऊ नये म्हणून खबरदारी घेणे, या गोष्टींना फार महत्त्व आहे. त्यासाठी ज्यांच्याजवळ कामातील कसब व तंत्र आहे, अशा माणसांचा आपणास योग्य प्रकारे उपयोग करून घेता आला पाहिजे. त्याचप्रमाणे लोकांमध्ये आपण कामाची निकड व जबाबदारी यांची जाणीव निर्माण केली पाहिजे. उत्पादनाचा खर्च कमी करण्याकरिता देशी मालाचा व साधनांचा उपयोग करून परदेशी चलनात आपण बचत केली पाहिजे. त्यासाठी नव्यानव्या युक्त्याप्रयुक्त्या आपण शोधून काढल्या पाहिजेत. सरकारकडून औद्योगिक विकास होऊ शकेल यासंबंधी सविस्तर दिग्दर्शन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या कामी उद्योगपतींना त्वरित मदत मिळावी म्हणून सरकारच्या उद्योग विभागामार्फतही व्यवस्था करण्यात आली आहे.

मुंबई शहरातील उद्योगधंद्यांच्या भवितव्यासंबंधी तुम्हांला जी चिंता वाटत आहे व जी तुमच्या अध्यक्षांनी आताच बोलून दाखविली ती मी समजू शकतो. सबंध राज्याचा समतोल विकास करण्याचे जे धोरण सरकारने जाहीर केले आहे, त्याचा अर्थ मुंबई शहराकडे दुर्लक्ष होईल असा मुळीच नाही. याबद्दल तुम्ही निश्चिंत राहावे. बृहन्मुंबईतील उद्योगधंद्याच्या वाढीस भौगोलिक कारणांमुळे मर्यादा पडतात ही गोष्ट सर्वमान्य आहे. आणि म्हणून जमीन, पाणी, वीज आणि कच्चा माल या गोष्टी येथे उपलब्ध होऊ शकतील असे नवे विभाग नवीन उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठी शोधून काढल्याखेरीज आपल्या औद्योगिक विकासाचे पाऊल फारसे पुढे पडणार नाही. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची आखणी करताना बृहन्मुंबईतील उद्योगधंद्यांची शक्य तेवढी वाढ व्हावी म्हणून जरूर ती खबरदारी आम्ही घेतली आहे असे मी आपणाला आश्वासन देतो. खरे म्हणजे ठाण्याच्या खाडीवर पूल बांधून आणि दलदलीच्या भागांचे औद्योगिक भागांत रूपांतर करून मुंबई शहराचे औद्योगिक क्षेत्र सध्याच्या हद्दीच्या बरेच पुढे नेण्याचा आमचा विचार आहे. अर्थात मुंबई महानगरपालिकेचे

अधिकारक्षेत्र वाढविण्याची मात्र यात कल्पना नाही. मी अनेक वेळा सांगितले, की मुंबई शहर सोडल्यास महाराष्ट्र राज्य हे औद्योगिकदृष्ट्या पुढारलेले आहे असे म्हणता यावयाचे नाही, आणि हे नाकारण्यातही काही अर्थ नाही. शिवाय गेल्या दहा वर्षात देशांतील इतर राज्यांच्या मानाने आपली प्रगती अगदीच यथातथा झाली असल्यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झालेली आहे. म्हणून जे भाग अद्याप मागासलेले म्हणून ओळखले जातात त्या भागांत उद्योगधंदे काढून औद्योगिकीकरणाचे क्षेत्र वाढविणे अगत्याचे ठरते. आणि म्हणून महाराष्ट्र राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण भागात सुरू करावयाच्या उद्योगधंद्यांची पूर्वतयारी करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर, ग्रामीण भागात उद्योगधंद्यांची उभारणी करण्याच्या दृष्टीने ज्या औद्योगिक वसाहती स्थापन करावयाच्या आहेत त्यांना मी फार महत्त्व देतो. या औद्योगिक वसाहतींत, रस्ते, वीज, पाणीपुरवठा वगैरे सोयी उपलब्ध होणार असून त्यामुळे तिथे छोटे छोटे उद्योगधंदे सुरू करण्यास चांगलाच वाव मिळणार आहे. या सोयींचा जास्तीत जास्त फायदा घेऊन विजेवर चालणाऱ्या छोट्या छोट्या उद्योगधंद्यांची सुरुवात व वाढ करण्याच्या दृष्टीने प्रत्येक भागासाठी निश्चित स्वरूपाची योजना तयार करण्यात आली पाहिजे. शहरी भागांत आज जे मोठे व मध्यम स्वरूपाचे उद्योगधंदे केंद्रित झाले आहेत, त्यांना ग्रामीण भागांतील हे छोटे उद्योगधंदे पूरक ठरतील. मोठ्या व मध्यम स्वरूपाच्या उद्योगधंद्यातील उत्पादन विभागांचे विकेंद्रीकरण करून ग्रामीण भागांत निघणाऱ्या छोट्या उद्योगधंद्यांकडे हे काम सोपविण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला पाहिजे. यामुळे ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे धाव घेण्याच्या लोकांच्या प्रवृत्तीलाही आळा बसेल.

कृषि-औद्योगिक समाजव्यवस्थेचा पाया घालण्याचे उद्दिष्टही राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत स्वीकारण्यात आले आहे. ग्रामीण भागात उद्योगधंदे काढून ग्रामीण जीवनाशी ते एकरूप करावयाचे आणि शेती व ग्रामीण उद्योगधंदे यांची सांगड घालावयाची हाच याचा अर्थ आहे. ग्रामीण भागात याप्रमाणे शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे निघाल्यास शहरी भागांतील उद्योगधंद्यांकडे कच्च्या मालाची वाहतूक करण्यात होणारे परिश्रम वाचतील. शिवाय ग्रामीण भागांतील या उद्योगधंद्यांमुळे शेतकरीवर्गास रोजगाराचे एक साधन उपलब्ध होईल आणि त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांच्या राहणीमानाचा दर्जाही सुधारेल.

ग्रामीण भागांत आधुनिक स्वरूपाचे उद्योगधंदे सुरू करण्याच्या दृष्टीने शेतीच्या क्षेत्रांत सहकारी तत्त्वावर आधारलेले प्रोसेसिंगचे – म्हणजे शेतमालावर प्रक्रिया करण्याचे उद्योगधंदे काढणे अतिशय फायद्याचे ठरेल. आपल्या राज्यात स्थापन झालेल्या सहकारी साखर कारखान्यांमुळे आपल्याला जो बहुमोल अनुभव मिळाला आहे तो या बाबतीत मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही. या अनुभवाच्या आधारे शेतमालावर प्राथमिकच नव्हे तर त्यानंतरच्याही अवस्थेत प्रक्रिया करण्याचे उद्योगधंदे ग्रामीण भागात सहकारी पद्धतीने सुरू करता येतील. तथापि जेथे ग्रामीण भागातील उत्पादकांच्या सहकारी संस्थांना तांत्रिक अडचणीमुळे म्हणा अगर अवाढव्य भांडवली खर्चामुळे म्हणा, अशा प्रकारचे उद्योगधंदे सुरू करणे शक्य नसेल तिथे 'संयुक्त औद्योगिक क्षेत्र' निर्माण करण्याचा आमचा विचार आहे. सरकार आणि खाजगी कारखानदार यांनी आपल्या संयुक्त प्रयत्नांनी ग्रामीण भागांत मोठ्या स्वरूपाचे उद्योगधंदे सुरू करावयाचे अशी ही कल्पना आहे.

राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांसाठी करण्यात आलेल्या तरतुदींव्यतिरिक्त संयुक्त क्षेत्रांतील उद्योगधंद्यांच्या बाबतीतही पुरेशी तरतूद करण्यात आली आहे. या योजनेचा खाजगी कारखानदार योग्य तो फायदा घेतील असा मला विश्वास वाटतो.

ग्रामीण भागांत उद्योगधंद्यांची वाढ खंड पडू न देता चालू ठेवावयाची म्हणजे ग्रामीण भागांतील लोकांनीच त्या बाबतीत पुढाकार घ्यावयास पाहिजे. त्यासाठी व या लोकांच्या उपक्रमशीलतेस पुरेसा वाव मिळावा यासाठी खास प्रयत्न करावयास पाहिजेत आणि जरूर ती यंत्रणाही उभी करावयास पाहिजे.

अगोदरच्या पंचवार्षिक योजनांमध्ये जे भाग विकासाच्या बाबतीत मागे पडले आहेत त्यांना इतर भागांबरोबर आणणे आवश्यक आहे. राज्याच्या सर्व विभागांत समतोल विकास घडवून आणण्यासाठी सरकार प्रादेशिक विकास मंडळे स्थापन करणार असून त्यासाठी आवश्यक असा कायदाही करण्यात येईल. निरनिराळ्या कारणांमुळे राज्याचे जे भाग अविकसित राहिले आहेत त्यांना विकासाच्या मार्गावर पुढे गेलेल्या इतर

भागांबरोबर आणण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत काही खास तरतुदी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. विदर्भात रस्ते कमी आहेत, तर मराठवाड्यात व कोकणांत रस्ते व वीज यांची कमतरता आहे. त्यामुळे या भागांत काही विशिष्ट प्रश्न निर्माण झाले असून त्यांची उकल करण्याच्या दृष्टीने तिसऱ्या योजनेच्या काळात या भागांतील दळणवळणाच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. भारत सरकारच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत दिवा–पनवेल–उरण रेल्वेची जी तरतूद करण्यात आली आहे, त्यामुळेही कोकण विभागात विकासाचे नवे क्षेत्र निर्माण होईल. तिसऱ्या योजनेत विद्युत–वाहनाचा जो कार्यक्रम आखण्यात आला आहे, त्यामुळे सोलापूर, अहमदनगर, नाशिक, धुळे व जळगांव हे जिल्हे, विदर्भातील पश्चिमेकडले जिल्हे आणि कोकण व मराठवाडा या भागांस वीज मिळू लागेल आणि या भागांची विजेच्या बाबतीत आजपर्यंत जी उपासमार झाली ती नाहीशी होईल. या भागाखेरीज आणखी ५०० मोठ्या व छोट्या गावांना या कार्यक्रमानुसार वीजपुरवठा करण्यात येणार आहे. तेव्हा विकासाच्या बाबतीत जे भाग मागे पडले आहेत त्यांची तिसऱ्या योजनेमुळे काही प्रमाणात तरी प्रगती होईल अशी अपेक्षा आहे.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचे प्रमुख उद्दिष्ट स्वयंचलित विकसनाच्या दिशेने भरीव प्रगती करणे हे आहे. याचा अर्थ असा, की उत्पन्नाचे प्रमाण सारखे वाढत राहण्यासाठी बचतीचे व पैसा गुंतविण्याचे प्रमाण पुष्कळच वाढले पाहिजे. हे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता तुमच्या या कौन्सिलने उत्पादनाचा कार्यक्रम अशा रीतीने आखावा, की त्यायोगे आपल्या गरजेपेक्षा अधिक मालाचे उत्पादन होऊन एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलच्या मदतीने परदेशी बाजारपेठा आपण काबीज करू शकू. तसे झाल्यास आपल्या परदेशी चलनात वाढ होईल आणि त्यातून ज्या उद्योगधंद्यांसाठी आपल्याला परदेशातून यंत्रसामग्री मागवावी लागते त्यांना आपल्याला मदत करता येईल. उत्पादनाचा खर्च शक्यतोवर वाढू न देता आपल्या पक्क्या मालाचा दर्जा आपण सुधारला पाहिजे. तसेच आपल्या उत्पादनकार्यात कोणत्याही प्रकारे खंड पडणार नाही याचीही खबरदारी घेतली पाहिजे. यापूर्वी उद्योगधंद्यांत आपण जे भांडवल गुंतविले आहे आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात आपण जे गुंतविणार आहोत, ते सर्व योग्य कारणी लावून जेवढे उत्पादन आपल्याला वाढविता येणे शक्य आहे तेवढे ते वाढविण्याचा आपण नेटाने प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणे उद्योगधंद्यांतील नफा पुन्हा उद्योगधंद्याच्या वाढीसाठीच वापरला गेला पाहिजे. या गोष्टी जर आपण करू शकलो नाही, तर ज्या स्वयंचलित विकसनाचा मी आताच निर्देश केला ते लांबवणीवर पडण्याची भीती आहे. तुमच्या संस्थेच्या सभासदांना या दिशेने प्रगती करण्याची जी तीव्र उत्कंठा आहे, त्यामुळे आपला उत्पादनाचा कार्यक्रम पार पाडण्याच्या बाबतीत ते यत्किंचितही कसूर करणार नाहीत, याबद्दल मला पूर्ण खात्री आहे.

योजनाबद्ध विकासाच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरेसा रोजगार निर्माण करणे. लोकसंख्येची वाढ झपाट्याने होत असल्यामुळे कामगारांच्या संख्येत दरसाल भर पडत असते. त्यामुळे रोजगाराच्या प्रश्नांचे स्वरूप अधिकाधिक गंभीर होत आहे. नियोजन मंडळाने याबाबतीत जी पाहणी केली आहे, त्यावरून असे दिसून येते, की अगोदरच्या पंचवार्षिक योजनांच्या काळात रोजगाराच्या प्रश्नाबाबत महाराष्ट्र राज्याची फार कुचंबणा झाली. तेव्हा, प्रत्येक माणसास योग्य व पूर्णवेळ रोजगार मिळेल अशी परिस्थिती निर्माण होण्यास अद्याप बराच कालावधी जावा लागेल. तथापि, मध्यंतरीच्या संक्रमणकाळात आधुनिक उद्योगधंद्याची वाढ करण्याचा कार्यक्रम नेटाने व कसोशीने अंमलांत आणला पाहिजे व त्याबरोबर शेतीचाही विकास झपाट्याने केला पाहिजे. त्याचप्रमाणे उत्पादन किंवा उत्पादनाचा खर्च यावर परिणाम होऊ न देता जास्तीत जास्त मजुरांना ज्यामुळे काम मिळेल अशा प्रकारच्या उत्पादनपद्धतीचा आपण अवलंब केला पाहिजे. अर्थात उत्पादनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत जी तांत्रिक प्रगती होत असते तिचा आपण फायदा घेऊच नये असे मला सुचवावयाचे नाही. तथापि सध्याच्या परिस्थितीत रोजगार वाढविण्याचे आपले उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने याबाबतीत तोल सांभाळणे किती आवश्यक आहे याची तुम्हाला कल्पना आहेच. विजेवर चालणारे छोटे उद्योगधंदे सुरू करण्याकरिता ग्रामीण विद्युतीकरणाच्या कार्यक्रमाचा पूर्ण उपयोग करून घेतला पाहिजे याचा उल्लेख मी अगोदर केलाच आहे. उत्पादनाच्या नव्या नव्या पद्धतींचा व तंत्राचा अवलंब करून आणि अगदी अद्ययावत ज्ञान व कसब संपादन करून उपलब्ध स्थानिक साधनसामग्रीचा उद्योगधंद्यांसाठी उपयोग करून घेण्याचे नवे मार्ग जर आपण शोधून काढले, तर उद्योगधंद्यांच्या क्षेत्राचा आपण विस्तार करू शकू आणि बेकारीचे प्रमाणही पुष्कळच कमी करू शकू, याबद्दल मला शंका नाही.

मोठ्या प्रमाणावर आर्थिक नियोजन करीत असताना,

औद्योगिक उत्पादनांतील सर्वात महत्त्वाच्या मानवी घटकाकडे आपल्याला दुर्लक्ष करता येणार नाही. मानवी घटक म्हणजे अर्थातच कामगार! आपल्या या प्रयत्नांत जर यश मिळवावयाचे असेल तर कामगारांना योग्य तो न्याय आपण दिलाच पाहिजे. उद्योगधंद्यांच्या कारभारात कामगारांना भागीदार करून घ्यावे या कल्पनेने आता मूळ धरले असून उत्पादनक्षमता वाढविण्याची नवी प्रेरणा तिने कामगारांमध्ये निर्माण केली आहे. आपले ध्येय तरी काय, हेच आहे. म्हणून औद्योगिक संबंध आपण निकोप ठेवले पाहिजेत, आणि उत्पादनातील नुकसान टाळण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला पाहिजे. या गोष्टींची आज फार आवश्यकता आहे.

आर्थिक विकासाच्या बाबतीत सध्या जे नवीन वातावरण निर्माण होत आहे ते लक्षात घेऊन तुमचे कौन्सिल पंचवार्षिक योजनेची मुख्य उद्दिष्टे सतत आपल्या नजरेपुढे ठेवेल, आणि या योजनेत राष्ट्रीय पुनर्रचनेचे अंगीकारलेले ध्येय साध्य करण्याच्या कामी सरकारशी हार्दिक सहकार्य करेल, अशी आशा मी व्यक्त करतो, आणि या प्रसंगी मला आमंत्रण दिल्याबद्दल तुमचे पुन्हा एकवार आभार मानतो.

**नियोजन, मनुष्यबळ व शेती**

गेल्या दोन–तीन दिवसांमध्ये नियोजनावर आपण अनेक चर्चा ऐकल्या. परंतु नियोजन हा विषयच इतका नित्य नवा आहे, की त्याच्यासंबंधीची चर्चा कधी कंटाळवाणी वाटत नाही. आकाशाकडे माणसाने पाहिल्यानंतर ज्याच्या त्याच्या नजरेप्रमाणे त्याला ते दिसते. जसे आकाश विशाल आहे तसाच नियोजनाचा हा प्रश्नही विशाल आहे. असंख्य दृष्टिकोन आणि असंख्य प्रश्न यातून असंख्य माणसांच्या जीवनास पूर्णतया स्पर्श करणारा हा विषय असल्यामुळे त्याच्यासंबंधी कधी कंटाळा येत नाही. पण नियोजनाचा निश्चित अर्थ आपण आपल्या मनाशी समजावून घेतला पाहिजे. विशेषतः महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर जी परिस्थिती महाराष्ट्रात आहे तिच्या पार्श्वभूमीवर आणि देशातील नियोजनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या जनतेचे नियोजनाच्या बाबतीत आजचे कर्तव्य काय आहे, हे आपण पाहिले पाहिजे.

**संदर्भ** : **सह्याद्रीचे वारे**

**स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या निवडक भाषणांचा संग्रह यातून साभार**

**(महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाची सभा**
**मुंबई दि. १९ मे १९६१)**

## !! हार्दिक अभिनंदन !!

प्राईम पॉईंट फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणारा **‘संसदरत्न’** पुरस्कार, तसेच युनिसेफ व पार्लमेंट्री ग्रुप फॉर चिल्ड्रन यांच्या वतीने देण्यात येणारा **‘पार्लमेंट्रीयन अवॉर्ड फॉर चिल्ड्रन’** या पुरस्काराने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या कार्याध्यक्ष खा. सुप्रिया सुळे यांना सन्मानित करण्यात आले. त्यांचे प्रतिष्ठान परिवाराच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन!

# ‘यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१८’ विदर्भ संशोधन मंडळ

## मानपत्र

इतिहास या ाब्दाची व्युत्पत्ती 'इति ह आस' अाी सांगितली जाते. त्याचा अर्थ 'असे झाले' पण काय झाले ते समजले तरी ते का झाले, कधी झाले, केव्हां झाले, त्याचे परिणाम काय झाले वगैरे अनेक प्रनांना इतिहास संाोधकांनाच उत्तरे ाोधावी लागतात. त्यामुळे त्यांना काळाची भूत, वर्तमान व भविष्य अाी विभागणी न करता अखंड काळावर लक्ष केंद्रित करावे लागते. त्या संाोधनामध्ये काही असे सुवर्ण क्षण येतात, जे अनेक अज्ञात प्रदेाांवर व कालखंडावर नवीन प्रकाााचा झोत पाडतात, उदा. मोहेंजोदडो येथील एका सामान्य दिसणाऱ्या टेकडीच्या उत्खननातून जी वस्तुस्थिती निर्दानास आली त्यामुळे भारताच्या इतिहासाची भूतकालीन कक्षा काही हजार वर्षांनी मागे गेली. तसेच प्रिंसेप यांनी ब्राह्मी लिपीची उकल केल्यानंतर सम्राट अाोकाचे ाािलालेख वाचणे ाक्य झाले व सम्राट अाोकाचे कर्तृत्व प्रकाात आले. असे सुवर्ण क्षण वारंवार येत नाहीत पण ते केव्हां येतील हेही सांगता येत नाही. म्हणूनच काळ व दो यांचे खंड न पाडता सत्याचा ाोध घेणारे इतिहास संाोधन मानवी संस्कृती समृद्ध करीत असते. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' हा गीतोपदो ाािरोधार्य मानून इतिहास संाोधनाचे काम समर्पितपणे करणाऱ्या संस्थांमध्ये महाराष्ट्राच्या उपराजधानीतील – नागपूरमधील – विदर्भ संाोधन मंडळाची गणना होते.

ब्रिटिा राजवटीत मध्य प्रांत व वऱ्हाडच्या राजधानीचे ाहर असलेले नागपूर हे इतिहास काळात गोंड आणि भोसले राजघराण्यांच्या कारभाराचे केंद्र होते. कला, साहित्य, विज्ञान, क्रीडा, प्राासन, न्याय, सामाजिक परिवर्तन, इत्यादी आधुनिक जीवनाच्या सर्व प्रांतांमध्ये या नगरीतून प्रज्ञावंत उदयास आले. संपूर्ण महाराष्ट्राच्या जडणघडणीत, लौकिकात त्यांनी मोलाची भर घातली. विदर्भ संाोधन मंडळाने असेच योगदान इतिहास संाोधनामध्ये केलेले आहे.

१९३३ च्या डिसेंबरमध्ये नागपूर येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनासाठी आलेल्या महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी साहित्य, संस्कृती, इतिहासाचे जतन आणि संवर्धन होण्यासाठी नागपूरला एक संस्था स्थापन करण्याची कल्पना मांडली. कै. ग. त्र्यं. माडखोलकर आदिंच्या पुढाकाराने २ जानेवारी १९३४ रोजी सुप्रसिद्ध संाोधक व साहित्यिक नी. ब. भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सिटी कॉलेजात सभा होऊन 'वाङ्मय इतिहास संाोधन मंडळ' स्थापन झाले. १४ जानेवारी १९३४ रोजी मकरसंक्रांतीच्या मुहूर्तावर ख्यातनाम संाोधक डॉ. महामहोपाध्याय वा. वि. मिराी यांनी 'खामखेड येथील ताम्रपट' हा ाोधनिबंध वाचून मंडळाच्या स्थापनेचा ाुभारंभ केला. पुढे जागा अपुरी पडू लागली म्हणून साहित्य संघाचे कार्यालय विदर्भ साहित्य संघाच्या इमारतीत गेले. नंतर प्रांतीय व केंद्रीय ाासन आणि स्थानिक देणगीदार यांच्याकडून निधी जमवून मंडळाच्या स्वतंत्र इमारतीचे बांधकाम १९६५ मध्ये पूर्ण झाले. नवीन इमारतीचे उद्घाटन सप्टेंबर १९६५ मध्ये राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले व मंडळाचे कार्यालय नव्या वास्तूत हलविण्यात आले. नंतर नवीन जागाही कमी पडू लागल्यामुळे मंडळाने वरचा मजला बांधला व त्याचे उद्घाटन २३ जानेवारी १९८६ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री.

ािवाजीराव पाटील–निलंगेकर यांच्या हस्ते झाले. या सभागृहाचे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक सभागृह असे नामकरण झाले. अनेक दुर्मिळ ग्रंथ सांभाळत, अनेक मौलिक चर्चासत्रे, निबंधवाचन आणि प्रकाानांचे आव्हान स्वीकारत ही वास्तू आज मोठा दिमाखात उभी आहे.

पहिली दोन दाके या संस्थेचे संचालन म. म. डॉ. वा. वि. मिराा यांनी केले. कोकण ही जन्मभूमी व विदर्भ ही कर्मभूमी असलेल्या डॉ. वा. वि. मिराा यांनी संस्थेच्या माध्यमातून ३२ संाोधनपर ग्रंथ प्रकााित केले. कोरीव लेख, नाणकाास्त्र व पुरातत्व, ािलालेख या क्षेत्रांमध्ये त्यांनी अग्रस्थान मिळविले. तसेच सातवाहन, ाक, गुप्त, वाकाटक, राष्ट्रकूट, कलचुरी, ािलाहार, अभीर, यादव, इत्यादी प्राचीन राजवांाच्या इतिहासावर प्रकाा टाकणारे ग्रंथ व संाोधनपर लेख प्रसिद्ध केले. या त्यांच्या अनन्यसाधारण कामगिरीमुळे भारत सरकारने 'पद्मभूषण' हा गौरव त्यांना दिला. त्यांच्यानंतर गो. बं. देगलूरकर, दे. गो. लांडगे, डॉ. ना. ग. नांदापूरकर, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, ां. भा. देव, ग. त्र्यं. दोपांडे, सिद्धेश्वर ाास्त्री चित्राव, प्रा. ग. वा. कवीश्वर, प्रा. ढवळीकर, श्री. भा. वर्णेकर, देवीसिंह चौहान, डॉ. डांगे व सौ. सिंधू डांगे आा अनेक विद्वान संाोधकांनी डॉ. मिराांची परंपरा पुढे चालू ठेवली.

प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन साहित्य, भारतीय इतिहास, तत्वज्ञान, पुरातत्व, भूमीविज्ञान, संत परंपरा, महानुभावपंथ आा अनेक विषयांमधील संाोधनाला संस्थेने सातत्याने प्रोत्साहन दिले आहे. विदर्भ संाोधन मंडळाचे वार्षिक अंक हे नवीन संाोधकांना निबंध प्रकाानासाठी हक्काचे व्यासपीठ ठरले आहेत.

इतिहास संाोधकांच्या नवीन पिढीला प्रोत्साहन देण्यासाठी मंडळाने अनेक पारितोषिके आणि पुरस्कार सुरू केले आहेत. याािवाय मंडळ विविध विषयांवर राज्य व राष्ट्रीय पातळीवर चर्चासत्रे, कार्याााळा, परिसंवाद आयोजित करीत असते. त्यांचे विषय पाहिले की, अभ्यासाचा परीघ वाढविण्याबाबत संस्था सजग असल्याचे दिसून येते. उदा. २०१६ मध्ये संस्थेने दलित–ग्रामीण–आदिवासी संाोधनात्मक साहित्य संमेलन आयोजित केले होते.

मंडळाच्या तीन व्याख्यानमाला सातत्याने चालाव्यात म्हणून नागपूर येथील थोर समाजसेवक डॉ. वसंतराव वानकर यांनी मंडळाला देणगी दिलेली आहे. त्याािवाय भाऊजी दप्तरी यांच्या चाहत्यांच्या देणगीतून दप्तरी व्याख्यानमाला चालविली जाते. महाराष्ट्रात प्रसिद्ध होणाऱ्या सर्वोत्कृष्ट वैचारिक ग्रंथास किंवा मानव्याास्त्राअंतर्गत प्रकााित होणाऱ्या उत्कृष्ट ग्रंथास एक वर्षाआड बालाजी हुद्दार या क्रांतिकारकाच्या नावाने पारितोषिक देण्यात येते. त्याािवाय २०१० पासून प्रा. श्री. मा. कुळकर्णी स्मृती पुरस्कार सुरू करण्यात आला आहे.

महाराष्ट्राची भूमी आा सार्वजनिक संस्थांच्या कर्तृत्वाने समृद्ध झालेली आहे. विदर्भाच्या संपन्न भूमीत गेली ८४ वर्षे सातत्याने संाोधन कार्य करणारे विदर्भ संाोधन मंडळ ही महाराष्ट्राच्या कीर्तीमध्ये भर घालणारी व ज्ञानसंचय वृद्धिंगत करणारी अग्रणी संस्था आहे. या संस्थेने इतिहास व साहित्य संाोधनाच्या क्षेत्रामध्ये केलेले असाधारण कर्तृत्व लक्षात घेऊन या संस्थेला 'याावंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार' प्रदान करताना 'याावंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई'ला विोष आनंद होत आहे.

मुंबई
दिनांक: २५ नाव्हेंबर २०१८

**शरद पवार**
अध्यक्ष
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# नवमहाराष्ट्र युवा अभियान

## कार्यवृत्त

**भारत तंबाखूमुक्त बनविण्यासाठी देशभरात अनुकरणीय कार्य करत असलेल्या स्वयंसेवी संस्था आणि व्यक्तींचा सन्मान**

नरोत्तम सक्सेरिया फाउंडेशन तर्फे सलाम मुंबई फाउंडेशन आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तंबाखूमुक्त भारतासाठी योगदान देणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार व अनुदान प्रदान समारंभ चव्हाण सेंटर, मुंबई येथे २९ जून २०१८ रोजी संपन्न झाला. मा. खा. सुप्रिया सुळे यांच्या शुभहस्ते व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात आला.

या समारंभात ४ स्वयंसेवी संस्था आणि ९ व्यक्तींना सन्मानित केले गेले. यामध्ये उत्तर प्रदेश, प्रतापगढ येथील स्वयंसेवी संस्था तरुण चेतना, छत्तीसगढ–बिलासपूर येथून जन स्वास्थ्य सहयोग, मध्यप्रदेश–सतना येथून दीनदयाल रीसर्च इन्स्टिट्यूट, महाराष्ट्र–जालना येथून निर्मल विकास संस्था यांचा समावेश आहे. वैयक्तिक स्तरावर धुळ्याचे डॉ. सतीश उत्तमराव पाटील, सांगलीचे लक्ष्मण आबा शिंदे, मुंबईच्या वर्षा विद्या विलास, रत्नागिरीचे सिद्धेश्वर वसंत डोके, कोल्हापूरचे संजय गणपती मोहिते, अमरावतीचे सुरेश बापूरावराव रहाटे, यवतमाळचे चंद्रबोधी बापूरावजी घायवेट, यवतमाळचे अवधूत वानखेडे आणि नंदूरबारचे जिल्हाधिकारी मल्लीनाथ कळशेट्टी यांचा समावेश आहे.

तंबाखू नियंत्रणाचे कार्य सुरू ठेवण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना १० लाखांची तरतूद करण्यात आली आणि व्यक्तींना ५० हजार रुपये देण्यात आले. यापैकी कित्येक संस्था आणि व्यक्ती अशा आहेत, ज्यांनी भारतात तंबाखू–नियंत्रण क्षेत्रात प्रचंड योगदान दिले आहे. मराठी चित्रपट फर्जचे दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर, चित्रपट अभिनेता अंकित मोहन आणि इतर खास निमंत्रकांच्या उपस्थितीत संसद सदस्य सुप्रिया सुळे यांनी पुरस्कार विजेत्यांना सन्मानित केले.

कार्यक्रमाचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे पुरस्कारांसाठी निवडलेल्या व्यक्ती आणि संघटना देशाच्या वेगवेगळ्या विभागांशी संबंधित आहेत. सरकार आणि स्वयंसेवी संस्था एकत्र आलेल्या आहेत आणि महाराष्ट्र तंबाखूमुक्त करण्याच्या दिशेने एकत्रित काम करत असल्याची खात्री यामागे आहे. तसंच हे इतर राज्यांमध्येही प्रतिकृत केले जाऊ शकते. तंबाखूमुक्त महाराष्ट्राऐवजी तंबाखूमुक्त भारत हे लक्ष्य ठरवून भारतातील अधिकाधिक भागांमध्ये पोचण्यासाठी दृढ निवड प्रक्रियेनंतर उत्तर प्रदेश, छत्तीसगढ आणि मध्य प्रदेशमधील संघटना निवडण्यात आल्या. पुरस्कार समारंभाच्या वेळी, तंबाखू नियंत्रण कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, सहभागींना संवेदनशील बनवण्यासाठी एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

बालभारतीच्या पुढाकाराने इयत्ता ५ वी, ७ वी, ९ वी व १० वी च्या विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकात तंबाखू नियंत्रणाचा पाठ समाविष्ट करण्यात आला आहे. तसेच राज्य सरकारने तंबाखूबंदी कायद्याच्या कोणत्याही प्रकारच्या उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी टोल फ्री हेल्पलाईन सुरु केली आहे. शैक्षणिक संस्थांच्या आत व १०० मीटर परिसरात गुटखा व सिगारेट विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे.

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक दत्ता बाळसराफ, सहसंयोजक विश्वास ठाकूर, समन्वयक विजय कान्हेकर, संघटक निलेश राऊत हे पाहतात. तर कार्यालयीन संघटक म्हणून सुरेश पाटील व सहाय्यक म्हणून मिनल सावंत, रमेश मोरे, मनीषा खिल्लारे, महेश साळवी कार्यरत आहेत.

**सूर पश्चिमेचे : पाश्चात्त्य संगीत संज्ञा कोश, मु.म.ग्रं. दादर (पू.)**

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, पॉप्युलर प्रकाशन, लोकसत्ता आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'पाश्चात्त्य संगीतसंज्ञा कोश' या अशोक दा. रानडे लिखित आणि चैतन्य कुंटे संपादित ग्रंथाच्या निमित्ताने मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर येथे दि. २३ जून २०१८ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला पॉप्युलर प्रकाशनच्या श्रीम. अस्मिता मोहिते यांनी कार्यक्रमाची तसेच वक्त्यांची ओळख करून दिली. श्री. विश्वास मोकाशी व सूर्यकांत चंद्रकांत गायकवाड यांनी प्रमुख पाहुण्यांचे व उपस्थितांचे स्वागत केले. तसेच कार्यक्रमाचा उद्देश व 'वाचक

जागर' या उपक्रमाबद्दल माहिती दिली.

हा ग्रंथ म्हणजे लोकसत्ता संपादक शिफारस मध्ये निवडलेले पुस्तक आहे. महत्त्वाचे आणि वेगळ्या पठडीतले विषय घेऊन लिहिलेले हे पुस्तक आहे, ज्याचा समाजातल्या वेगवेगळ्या कला घेऊन अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना उपयोग होतो. अशा ग्रंथांना विशेष प्रसिद्धी मिळावी यासाठी लोकसत्ताने ही योजना राबवली होती. पाश्चात्त्य संगीतातल्या संकल्पना, वेगवेगळे संगीत, वेगवेगळी वाद्ये व त्यांचा इतिहास याबाबत मराठीत फार अशी पुस्तके नाहीत. अशी माहिती देणारा हा कोष आहे. तसेच या कोशामधील भाषा ही देवनागरी लिपीतील असल्यामुळे ते समजून घेणे अभ्यासकांना सहज सोपे जाते. तसेच संगीताच्या माहितीसोबत वाद्यांचे छायाचित्रही दिले आहे. जेणेकरून अभ्यासकांना त्या काळातील वाद्यांची ओळख होईल ही माहिती पॉप्युलर प्रकाशनच्या अस्मिता मोहिते यांनी दिली.

चैतन्य कुंटे यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाश्चात्त्य संगीत संज्ञा कोशाबद्दल माहिती दिली. आपल्या भारतीय संस्कृतीत संगीत आणि अनेक प्रकारची वाद्ये आहेत. हे आपल्याला काही अंशी माहिती आहेच, पण त्याचबरोबर पाश्चात्त्य संगीत आणि तिकडची वाद्येदेखील आपल्याला माहिती करून घेणे महत्त्वाचे आहे. ती आपल्या भारतीय वाद्यांशी अगदी मिळतीजुळती आहेत. आपल्यापर्यंत पाश्चात्त्य संगीत अनेक माध्यमांमधून येत असते, परंतु आपल्याला ते ओळखणे तितके सोपे नसते. म्हणून आपण त्यांनी काही दृक्श्राव्य माध्यमातून, काही उदाहरण म्हणून संगीत आणि वाद्य पी.पी.टी. यांच्या माध्यमातून सादर केले.

**मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर (पू).**
**कार्यक्रम – पुस्तकांच्या भेटी.**

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, ग्रंथाली प्रकाशन आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाचक जागर 'या उपक्रमांतर्गत अभिवाचन चळवळीतलं पुढचं पाऊल म्हणजे 'पुस्तकांच्या भेटी' या अभिवाचन कार्यक्रमाचे आयोजन दि. ०५ जुलै २०१८ रोजी करण्यात आले होते.

उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुंबई मराठी ग्रंथालयाचे श्री. हेमंत जोशी यांनी मुंबई मराठी ग्रंथालयाची पार्श्वभूमी उपस्थितांना सांगितली. वाचकांसाठी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय हे सर्वत्र उपलब्ध आहे, आणि त्यांनी ह्याचा लाभ घ्यावा. तसेच 'वाचक जागर' या कार्यक्रमाच्या आयोजनाचे महत्त्व त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात अभिराम भडकमकर (प्रसिद्ध लेखक – दिग्दर्शक), चंद्रकांत मेहेंदळे (ज्येष्ठ अभिनेते), अस्मिता पांडे (प्रसिद्ध निवेदिका) आणि श्रीनिवास नार्वेकर (लेखक – दिग्दर्शक) इत्यादी मान्यवरांनी पुस्तक, कथा आणि कवितांचे अभिवाचन केले. हा कार्यक्रम नुकताच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, तिसरा मजला, शारदा सिनेमाजवळ, नायगाव, दादर (पूर्व) मुंबई येथे प्रेक्षकांच्या उपस्थितीत पार पडला.

**चित्रपट चावडी, य.च.प्र.मुंबई**
**द लॉँग वॉक टू फ्रीडम : नेल्सन मंडेला.**

नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने दि. १० ऑगस्ट, २०१८ रोजी चित्रपट चावडी अंतर्गत 'द लॉँग वॉक टू फ्रीडम' या सिनेमाचे आयोजन करण्यात आले होते. 'द लॉँग वॉक टू फ्रीडम' हे दक्षिण आफ्रिकेचे माजी अध्यक्ष नेल्सन मंडेला यांचे आत्मचरित्र आहे. नेल्सन मंडेला यांचे पूर्ण नाव नेल्सन रोहीहल्ला मंडेला आहे. 'द लॉँग वॉक टू फ्रीडम' हा त्यांच्या आयुष्यावरील चित्रपट असून त्यामध्ये व्यक्तिगत आयुष्याबरोबरच दक्षिण आफ्रिकेचा आणि जागतिक पातळीवरील अनेक लढ्यांचा पट यामध्ये पहायला मिळतो. वर्षानुवर्ष 'काळे' म्हणून हिणवल्या गेलेल्या समूहातील दक्षिण आफ्रिकेचे ते पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष होते. तसेच वर्णद्वेष आणि वर्णभेद विरोधी मोहिमेतील आदर्श व्यक्तिमत्त्व. वयाच्या ९५व्या वर्षी नेल्सन मंडेला यांचे निधन झाले. नेल्सन मंडेला यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासातून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. नेल्सन मंडेला यांनी कायम देशाला उच्च विचारसरणी राखण्याची शिकवण दिली. त्यांच्या या वर्णद्वेष आणि वर्णभेद विरोधी मोहिमेमुळे त्यांच्या विरोधातील नेत्यांनी त्यांना तुरुंगात डांबले होते. नेल्सन मंडेला यांना तब्बल २७ वर्षे तुरुंगवास सहन करावा लागला. या तुरुंगवासाने ते खचून गेले नाहीत. त्यांचे प्रत्येक पाऊल दक्षिण आफ्रिकेला स्वातंत्र्य, लोकशाही व स्वयंशासनाकडे नेणारे होते. धर्म, जात, वर्ण यावर माणसाचे विभाजन न करता सर्वांना समान वागणूक देणारी राज्यघटना ही मडिबांनी दक्षिण आफ्रिकेला दिलेली सर्वात मोठी देणगी आहे. मानवतेसाठी, शांततेसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून १९९३ साली त्यांना नोबेल पारितोषिक देण्यात आले. नेल्सन मंडेला हे खऱ्या अर्थाने एक आदर्श नेतृत्व होते. १८ जुलै १९१८ ला जन्मलेल्या मंडेलांनी साम्राज्यवाद, गरिबी आणि वंशभेदाचं उच्चाटन करण्यासाठी जो अतुलनीय लढा

दिला त्याचं खरंतर शब्दांत वर्णन करणं शक्य नाही. त्यांचा मृत्यू दि. ५ डिसें. २०१३ ला झाला. ते जरी काळाच्या पडद्याआड गेले असले तरी त्यांनी आयुष्यभर जोपासलेली आदर्श जीवनमूल्ये संपूर्ण मानवजातीला सतत प्रेरणादायी ठरतील. धर्म–वर्ण, जातीपाती यांच्या आधारे माणसा–माणसांमध्ये कृत्रिम भिंती उभ्या करणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध संघर्ष करून सर्व मानवांमध्ये बंधुत्वाची, मित्रत्वाची भावना निर्माण करणे, हीच या महामानवाला खऱ्या अर्थाने श्रद्धांजली ठरेल! अशा महामानवाला विनम्र अभिवादन...

### युवा स्वातंत्र्यज्योत रॅली– शिवाजी पार्क ते चैत्यभूमी, दादर

दिनांक. १४ ऑगस्ट २०१८ रोजी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्र पुरुषांना अभिवादन करण्यासाठी, तरुणांमध्ये स्वातंत्र्य दिनाविषयी आदराची जाणीव व जागृती निर्माण व्हावी यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीची सुरुवात श्री. सुरज चव्हाण यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी सदर युवा स्वातंत्र्य ज्योत रॅलीचा उद्देश सहभागींसमोर मांडला. यानंतर प्रमुख पाहुणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. व युवा पिढीच्या भविष्यात काय काय अपेक्षा आहेत आणि त्यांचे दायित्व काय आहे आणि असावे यावर विवेचन केले. यानंतर त्यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलित करण्यात आली. स्वातंत्र्यदिन चिरायू होवो अशा घोषणा देत शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून रॅली मार्गस्थ झाली.

पुढे सावरकर स्मारकातील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याला यांना अभिवादन व पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदानास उजाळा दिला गेला.

चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून सहभागींना संबोधित केले. यानंतर श्री. सुरज भोईर यांनी गायलेल्या उत्स्फूर्त गीतांनी तसेच भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे जाहीर वाचन करून शेवटी राष्ट्रगीत गायन केले. तसेच मनिषा खिल्लारे यांनी सहभागींचे आभार मानून रॅलीची सांगता केली.

### मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि महाविद्यालयीन मराठी वाङ्मय मंडळाची (प्रतिनिधी) अनौपचारिक बैठक शनिवार दिनांक १८ ऑगस्ट २०१८ रोजी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर येथील सभागृहात संपन्न झाली. या बैठकीत सर्व संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी, प्राध्यापक आणि विद्यार्थी सहभागी होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बैठकीच्या प्रयोजनाबद्दल संस्थेचे प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोकाशी यांनी सांस्कृतिक कार्य, (जयंती, पुण्यतिथी, स्पर्धा, व्याख्यानमाला) प्रमुख वैशिष्ट्ये व उपक्रमांची माहिती प्रास्ताविकातून दिली. उपस्थित मान्यवर प्रतिनिधींनी आपले उपक्रमाबाबतचे विचार जरूर मांडावे असे आवाहन केले. महाविद्यालयीन प्राध्यापक, वाङ्मय मंडळ सदस्य, ग्रामीण महाविद्यालयातील प्राध्यापक , विद्यार्थी प्रतिनिधी यांनी आपले अनुभव परखडपणे मांडले. शैक्षणिकदृष्ट्या ग्रामीण महाविद्यालये / ग्रंथालये येथील जीवनानुभव समृद्धीसाठी सहली, मार्गदर्शन शिबिरे, उत्कृष्ट वाचक स्पर्धा, ग्रंथवाचन परीक्षण, मराठी भाषा व सांस्कृतिक धोर, वाचनसंस्कृती, संशोधनासाठी फेलोशिप, नाट्यवाचन, ई. पुस्तके, ब्लॉग, नवकवी–साहित्यिकांसाठी व्यासपीठाची उपलब्धता, नवोदितांना प्रोत्साहन, काव्यवाचन, पत्रलेखन, कार्यक्रमाच्या आयोजनाची पूर्वतयारी, अभिवाचन कार्यशाळेचे आयोजन आणि मराठी भाषेतर विद्यार्थ्यांचा सहभाग, मुद्रित शोधन, संपादन, अंध व्यक्तींसाठी दृक्श्राव्य माध्यमे, अभ्यासकेंद्रांसमवेत समन्वय साधून व्याख्याने आदी विविध विचार बैठकीत प्रकट झाले. या बैठकीत रुपारेल, चेतना, खालसा, डहाणूकर, वझे, महर्षी दयानंद, कसारा–खर्डी आदी महाविद्यालयांचा सहभाग होता.

प्रा. वैशाली जावळेकर, प्रा. अनघा मांडवकर, प्रा. अरविंद जाधव, प्रा. सूर्यकांत आजगांवकर, प्रा. कैलास कळकटे , प्रा. नितीन रिंढे यांच्याबरोबर मिलिंद कांबळे, सूरज खरटमल , प्रशांत पार्टे, (कविता वाचन) , पार्थ गमरे (कविता वाचन), पार्थ घोंगळे (कविता वाचन), रोहिणी नाईक, सुजीत खताळ, सावनी गोगटे, (ब्रेललीपी) या विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत मांडले. या अनौपचारिक चर्चेतील मुक्त वेळेचा वापर करताना प्रमुख कार्यवाह श्री. मोकाशी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन तसेच नवविचारांचे स्वागत करीत होते. उपयुक्त सूचनांच्या बाबतीत अल्पदरात झेरोक्स, सभागृहांची विनामूल्य उपलब्धता, संदर्भ शुल्कात विद्यार्थ्यांना सवलत, असे महत्त्वाचे निर्णयही जाहीर केले.

बैठकीचा समारोप करतांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे श्री. दत्ता बाळसराफ यांनी बैठकीला प्रतिसाद जरी अल्प असला तरी उपयुक्त विचार उपस्थितांनी व्यक्त केल्याबद्दल आभार

मानले व समाधान दर्शविले. मराठी भाषा तज्ज्ञ, हितचिंतक , उपक्रमात रुची असलेले महाविद्यालयीन प्राध्यापक, विद्यार्थी, वाङ्मय मंडळे, अभ्यास केंद्रे यांचे प्रतिनिधी यांची यादी व उपक्रमाबाबतची संपूर्ण माहिती असलेले पोर्टल तयार करणे, संग्रहालय, प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांसहित आयोजक समिती बनवून पुढील बैठकीचे आयोजन करणे, मराठी भाषिकच नव्हे तर एकूण मुंबईवरच प्रभाव पडेल अशा भव्य कार्यक्रमाचे आयोजन करणे, वाचन प्रेरणा दिन, मराठी भाषा दिनासारखे कार्यक्रम यासाठी उत्साहवर्धक वातावरण निर्माण करून उपक्रमाचे आयोजन करणे. उपक्रमात वर्तमान पत्रे, मराठी भाषेवर प्रेम असलेल्या व पोषक कार्य करणाऱ्यांना सामावून घेणे, व्हॉटस्‌अप ग्रुप अथवा गुगल ड्राईव्ह यांचा उपयुक्ततेनुसार वापर करणे यासाठी आजच्या बैठकीत उपस्थित महाविद्यालयीन प्रतिनिधींनी शहर–उपनगरातील महाविद्यालयांशी संपर्क करून पुढील बैठकीत (दि. ४ सप्टेंबर २०१८ ,वेळ दु. १२:३० वा.) त्यांनाही सहभागी करण्यास प्रवृत्त करावे, असे आवाहन करीत बैठकीची सांगता झाल्याचे मा. दत्ता बाळसराफ यांनी जाहीर केले.

**मुख्य सभागृह, य.च.प्र.मुंबई**

**प्रेमानंदजी– आनंदाचा वाटसरू ..! स्मृती– अभिवादन सभा**

परिवर्तन चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत कालकथित प्रेमानंद रूपवते यांचे शनिवार दिनांक ४ ऑगस्ट २०१८ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई , बहुजन शिक्षण संघ संस्था आणि चेतना संस्था, तसेच विविध संस्था – संघटना – मित्रपरिवार यांच्या वतीने शनिवार दिनांक १८ ऑगस्ट २०१८ रोजी स्मृती अभिवादन सभेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला त्यांना आवडणारी 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे, 'समतेच्या वाटेनं', आणि 'इसलिये यह संघर्ष कि हम चुने' असे जागृतीपर गीत सादर करून आदरणीय प्रेमानंदजींचे स्मरण केले. त्यांचा मित्र परिवार, आणि आप्तेष्टांनी त्यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा दिला.

**स्वसंरक्षण प्रशिक्षण वर्ग...**

काही तुरळक व्यक्तींकडून मानसिक, शारीरिक, गुन्हेगारी अशा प्रकारची विकृत कृत्ये होत असतात. त्याचा प्रतिकार कसा करावा यासाठी नुकतेच शनिवारी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि मुंबईच्या नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने स्व–संरक्षण प्रशिक्षणाचे आयोजन दि. १५ सप्टेंबर,२०१८ रोजी करण्यात आले होते.

झालेल्या प्रशिक्षण वर्गात अरविंद खैरे यांनी स्व–संरक्षण म्हणजे काय ते सांगत असताना विविध उदाहरणे दिली. त्यामध्ये नोकरी करत असताना वरिष्ठांच्या दबावाला बळी पडणे, मानसिक त्रास होणे, लैंगिक अत्याचार अशा प्रसंगी कसे सामोरे जायचे याचे मार्गदर्शन त्यांनी उपस्थितांना केले. तसेच उपस्थितांच्या प्रश्नांना योग्य अशी उत्तरे दिली. त्यानंतर त्यांनी उपस्थित असलेल्या व्यक्तींसोबत काही प्रात्यक्षिके करून दाखवली.

**'बलुतं' च्या चाळिशीच्या निमित्ताने**

मराठी साहित्यात मैलाचा दगड ठरलेल्या दया पवार यांच्या 'बलुतं' या आत्मकथनाला यंदा ४० वर्षे पूर्ण होत असल्यामुळे पद्मश्री दया पवार प्रतिष्ठान, ग्रंथाली वाचक चळवळ आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'बलुतंची चाळिशी' या संकल्पनेभोवती २० सप्टेंबर रोजी एकदिवसीय संमेलन आयोजित करण्यात आले होते. याच संमेलनात दया पवार स्मृती पुरस्कार २०१८चे वितरण करण्यात आले. अभिनेता सयाजी शिंदे यांच्यासह राहुल कोसंबी आणि आनंद विंगकर हे लेखक यंदाच्या दया पवार स्मृती पुरस्काराचे मानकरी ठरले. अकरा हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे दया पवार स्मृती पुरस्काराचे स्वरूप होते.

मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर सभागृहात, एकदिवसीय संमेलनात मान्यवर लेखक–कवी–कलावंतांच्या सहभागासह परिसंवाद, चर्चासत्रे, कवी संमेलन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा. शरद काळे (विश्वस्त, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई) यांच्या हस्ते करण्यात आले. सकाळी १० वाजता आयोजित परिसंवादाचे अध्यक्ष दिनकर गांगल तर होणा–या परिसंवादात डॉ. रावसाहेब कसबे, सुशीलकुमार शिंदे आणि रामदास फुटाणे इत्यादी मान्यवर सहभागी होते.

दया पवार यांच्या 'बलुतं' या आत्मकथनाला यंदा ४० वर्षे पूर्ण होत आहेत. पद्मश्री दया पवार यांचे 'बलुतं' १९७८ मध्ये प्रकाशित झाले. 'बलुतं'चा त्यावेळचा प्रवास नेमका कसा होत गेला या विषयावर आधारित 'बलुतंची चाळिशी' या परिसंवादात

ग्रंथाली प्रकाशनाचे संस्थापक दिनकर गांगल, डॉ. रावसाहेब कसबे, वात्रटिकाकार रामदास फुटाणे आणि माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे हे त्या काळातले 'बलुतं'चे साक्षीदार सहभागी झाले होते. या परिसंवादातून त्यांनी ४० वर्षांपूर्वीचा काळ आणि दया पवार यांच्यासोबत असलेल्या मैत्रीचा पट उलगडला. तर 'बलुतं'नंतरच्या नव्वदोत्तरी साहित्याचा आढावा घेण्यासाठी 'समकालीन दलित साहित्य : साचलेपण की विस्तार?' या दुसऱ्या परिसंवादामध्ये साहित्य अकादमी पुरस्कार विजेते राहुल कोसंबी, कवी सुदाम राठोड, प्रा. धम्मसंगिनी रमागोरख या मान्यवरांनी आपले विचार मांडले.

'बलुतं'च्या चाळिशीनिमित्त ग्रंथालीतर्फे या वर्षीपासून 'बलुतं' पुरस्कार देण्यात येणार असल्याची घोषणाही करण्यात आली. उपेक्षित समाजातून येणाऱ्या लेखकाच्या आत्मकथनाला ग्रंथालीच्या वतीने दर वर्षी हा ' बलुतं पुरस्कार' देण्यात येणार आहे. आदिवासींच्या हक्कांसाठी लढणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्या नजुबाई गावित या त्या समाजातील पहिल्या वहिल्या ' बलुतं पुरस्कारा'च्या मानकरी ठरल्या. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते नजुबाईंना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

बाई मी धरण बांधिते, बाई मी धरण बांधिते... माझं मरण कांडिते' ही दया पवारांची कविता फक्त कविताच राहिली नाही तर महाराष्ट्रातल्या अनेक सामाजिक चळवळींचे ते एक लोकगीत ठरले. या कवितेसह 'कोंडवाडा' आणि 'पाणी कुठवर आलं ग बाई' या दया पवारांच्या गाजलेल्या कवितासंग्रहातील काही निवडक कवितांचे सादरीकरण यावेळी मा. आ. हेमंत टकले, सौमित्र आणि डॉ. प्रा. प्रज्ञा दया पवार यांनी केले.

या समारंभात पुरस्कार विजेत्यांच्या एकूणच कारकिर्दीचा 'चला हवा येऊ द्या' फेम अरविंद जगताप, समीक्षक प्रा.उदय रोटे आणि युवा पत्रकार शर्मिष्ठा भोसले यांनी आढावा घेतला.

सयाजी शिंदे : अभिनेता, लेखक, कवी, नाटककार म्हणून परिचित असलेल्या सयाजी शिंदे यांचे सामाजिक कार्यदेखील तितकेच अभिनंदनीय आहे. सयाजी शिंदे यांचा सह्याद्री देवराई प्रकल्प आज राज्यातील अनेक दुष्काळी भागात वृक्षारोपणाचे काम करीत आहे. सयाजी शिंदे यांच्या मुक्तछंदातील 'तुंबारा' या काव्य-नाट्य प्रयोगाची जाणकारांनी चांगली दखल घेतली होती.

राहुल कोसंबी : उभं आडवं' या पुस्तकासाठी साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार प्राप्त झालेले राहुल कोसंबी सध्या 'दलित मध्यमवर्ग' या विषयावर संशोधन करीत आहेत. नॅशनल बुक ट्रस्टच्या मराठी आणि कोकणी विभागाची संपादकीय जबाबदारी त्यांनी गेली अनेक वर्षे सांभाळली असून साहित्य, संस्कृती, दलित अत्याचार अशा विविध विषयांवर कोसंबी यांनी विपुल लेखन केले आहे. विद्यार्थी असताना त्यांनी लोकवाङ्मय गृहामध्ये ग्रंथनिर्मिती, संपादन याचा अनुभव घ्यायला सुरुवात केली आणि सध्या ते 'मुक्त शब्द' या मासिकाचे संपादकीय सल्लागार आहेत.

आनंद विंगकर : परिस्थिती आणि नैसर्गिक आपत्तीने नाडल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांचे सनातन दुःख मांडणाऱ्या 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीने आनंद विंगकर यांना चांगलाच नावलौकिक मिळवून दिला. याच कादंबरीसाठी त्यांना प्रतिष्ठेचा केशवराव कोठावळे पुरस्कार मिळाला आहे. सामाजिक कार्यकर्ता आणि कवी म्हणून परिचित असलेल्या विंगकर यांचा 'आत्मटीकेच्या उदास रात्री' आणि 'सुंबरान मांडलं' हे कवितासंग्रह प्रकाशित झाले असून अलीकडेच दुष्काळी माणदेशात फिरून लिहिलेल्या रिपोर्टवजा ललित लेखांवर आधारित 'माणदेश : दरसाल दुष्काळ' हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.

**विज्ञानगंगा.**

१) 'प्लास्टिक हे पर्यावरणाला वरदान की शाप' :-यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञानगंगा कार्यक्रमांतर्गत शुक्रवार, दि.२२ जून, २०१८ रोजी 'प्लास्टिक हे पर्यावरणाला वरदान की शाप' या विषयावर 'इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नोलॉजी, मुंबई'चे प्रा. रा. ना. जगताप यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्रोत्यांचा यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता.

२) 'घरगुती टाकाऊ वस्तूतून विज्ञान खेळणी':-यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञानगंगा' कार्यक्रमांतर्गत अठ्ठाविसावे पुष्प पुण्यातील आयसर संस्थेतील प्रा. अशोक रुपनेर यांचे 'घरगुती टाकाऊ वस्तूतून विज्ञान खेळणी' या विषयावरील व्याख्यान शुक्रवार, २० जुलै, २०१८ रोजी आयोजित

करण्यात आले होते. श्रोत्यांचा यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता.

३) ‘द इमोशनल ब्रेन’ :–यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक महिन्याला ‘विज्ञानगंगा’ या नावाने वेगवेगळी वैज्ञानिक व्याख्याने आयोजित करण्यात येत आहेत. त्यापैकी एकोणतिसावे व्याख्यान शुक्रवार, दि.१७ ऑगस्ट, २०१८ रोजी ‘टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च’ येथील शास्त्रज्ञ प्रा. विदिता वैद्य यांचे ’द इमोशनल ब्रेन’ हे व्याख्यान सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आले होते. श्रोत्यांचा यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता.

४) ’कृत्रिम बुद्धिमत्ता’ :–यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक महिन्याला ‘विज्ञानगंगा’ या नावाने वेगवेगळी वैज्ञानिक व्याख्याने आयोजित करण्यात येत आहेत. तिसावे व्याख्यान शुक्रवार, दि.२१ सप्टेंबर, २०१८ रोजी महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लि. चे शास्त्रज्ञ, श्री. सचिन सातपुते यांचे ‘कृत्रिम बुद्धिमत्ता’ हे व्याख्यान सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आले होते. श्रोत्यांचा यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता.

५) ‘आदाने फुकट पण शेतकरी कर्जबाजारी’:– यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक महिन्याला ‘विज्ञानगंगा’ या नावाने वेगवेगळी वैज्ञानिक व्याख्याने आयोजित करण्यात येत आहेत. एकतिसावे व्याख्यान शुक्रवार, दि.१९ ऑक्टोबर, २०१८ रोजी डॉ. आनंद कर्वे, पुणे यांचे ’आदाने फुकट पण शेतकरी कर्जबाजारी’ हे व्याख्यान सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आले होते. श्रोत्यांचा यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता.



कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सोबत..

# अपंग हक्क विकास मंच

## कार्यवृत्त

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत, विजय कसबे आणि या मंचाचे संघटक म्हणून सौ. सुकेशनी मर्चंडे-शेवडे हे काम पाहतात. या मंचामार्फत महाराष्ट्रातील अपंगांसाठी विविध जिल्ह्यांत मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिरांचे आयोजन करतात. दिव्यांगांची पूर्वतपासणी करून त्यांना आवश्यक त्या कृत्रिम साधनांसाठी किंवा अवयवासाठी त्यांचे मोजमाप घेऊन मोफत साहित्य उपलब्ध करून दिले जाते. उदा. जयपूर फूट, कॅलिपर, कुबडी, एल्बो क्रचेस, वॉकिंग स्टिक, वॉकर, सर्जिकल शूज, ट्रायसिकल, व्हीलचेअर, स्प्लिंट्स, कमोड चेअर, सी.पी. चेअर, एम. आर. किट, ब्रेल किट, अंध काठी, अंध गॉगल, श्रवणयंत्र, बेल्ट्स आदी साहित्याचे मोफत वाटप कृत्रिम अवयव व साधन वाटप शिबिरात करण्यात येते. सन २००९ पासून आजपर्यंत शासकीय योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील एकूण ४७,६३८ दिव्यांग व्यक्तिंना कृत्रिम अवयव व साहित्य साधनांचा थेट लाभ देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तसेच मंचाच्यावतीने नियमित अपंगांच्या विविध विषयांवर समस्यांवर नियमित चर्चा व कार्यशाळेचे आयोजन करून त्यांच्या समस्यांचे निरसन करण्यात येते. तसेच मार्गदर्शन व सल्ला दिला जातो.

**जिल्हा- धुळे : मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, रोटरी क्लब, दोंडाईचा, आणि समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप दिनांक २ जून, २०१८ रोजी सकाळी १०:०० ते सायं ५:०० पर्यंत तहसील रोटरी भवन, दोंडाईचा, जिल्हा धुळे येथे करण्यात आले. यावेळी श्री. पी. यु. पाटील, (समाजकल्याण अधिकारी - जिल्हा परिषद, धुळे) श्री. नामदेव थोरात (रोटरी सीनिअर्स अध्यक्ष,) डॉ. मुकुंद सोहोनी (सचिव, रोटरी क्लब) श्रीमती अनुराधा सोहनी (प्रोजेक्ट चेअरमन,) श्री. हुसेन बिरदेलवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण ५० दिव्यांगांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम. आर. किट, जयपूर फूट, कॅलिपर, एफ. ओ.के. एफ. ओ. इत्यादी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

**जिल्हा - परभणी : मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने परभणी जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप दिनांक ५ जून, २०१८ रोजी सकाळी १०:०० ते सायं. ५:०० पर्यंत लक्ष्मीनारायण मंदिर मंगल कार्यालय, परभणी येथे करण्यात आले. यावेळी ज्ञानोपासक शिक्षण संस्था अध्यक्ष श्रीमती संध्याताई दुधगांवर, श्री. भोजने, (समाजकल्याण अधिकारी - जिल्हा परिषद परभणी) श्री. आर. जी. गायकवाड, सुजीतकुमार जोशी, सुनील मुलगीर, राहुल शिवभगत, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी संस्थेचे सचिव श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण ३७ दिव्यांगांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम. आर. किट, जयपूर फूट, कॅलिपर, एफ. ओ. के. एफ. ओ. इत्यादी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

**जिल्हा– कोल्हापूर:**
**मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप दिनांक २० जून, २०१८ रोजी सकाळी १०:०० ते सायं. ५:०० पर्यंत स्वयम् स्कूल, कोल्हापूर येथे करण्यात आले. यावेळी ज्ञानोपासक शिक्षण संस्था अध्यक्ष श्रीमती संध्याताई दुधगांवर, श्री. चंद्रकांत सूर्यवंशी, (समाजकल्याण अधिकारी– जिल्हा परिषद, कोल्हापूर), रेडक्रॉस संस्थेचे श्री. जगदाळे, श्री. एस.बी. फडतरे (वैसाका), श्री. प्रमोद भिसे (मुख्याध्यापक, स्वयम् स्कूल), श्रीमती स्वाती गोखले (सचिव, आस्था चॅरिटेबल ट्रस्ट) श्री. नंदकुमार फुले आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण ६३ दिव्यांगांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर. कीट जयपूर फूट, कॅलिपर, एफ.ओ. के.एफ.ओ. इत्यादी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

**जिल्हा – सातारा :**
**मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप दिनांक २१ जून, २०१८ रोजी सकाळी १०:०० ते सायं ५:०० कै. वेणूताई चव्हाण सभागृह, ता. कराड येथे करण्यात आले. यावेळी ज्ञानोपासक शिक्षण संस्था अध्यक्ष श्रीमती संध्याताई दुधगांवर, श्रीमती अनुराधा कानडे, (समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा) श्री. मोहनराव डकरे, श्रीमती भाग्यश्री काळभोर, श्री. नंदकुमार फुले आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण ४७ दिव्यांगांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर. किट, जयपूर फूट, कॅलिपर, एफ. ओ.के. एफ. ओ. इत्यादी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

**जिल्हा – पुणे:**
**मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता दिनांक २२ जून, २०१८ रोजी सकाळी १०:०० ते सायं. ५:०० पर्यंत जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, औंध हॉस्पिटल, पुणे येथे त्यांच्या गरजेनुसार कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी श्री. नितिन ढगे (उपायुक्त, अपंग कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य) श्रीमती मंजिरी देशपांडे (वैसाका), श्रीमती मिनिता पाटील, (माजी अध्यक्षा, बालकल्याण संस्था), मा. नंदकुमार फुले (प्रकल्प संचालक, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, पुणे), श्री. विजय कान्हेकर (सचिव–महात्मा गांधी सेवा संघ) आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण ३० दिव्यांगांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर. किट, जयपूर फूट, कॅलिपर, एफ. ओ. के. एफ. ओ. इत्यादी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

**जिल्हा – अहमदनगर :**
**मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि लोकपंचायत, संगमनेर, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने अहमदनगर जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप दिनांक २४ जून, २०१८ रोजी सकाळी १०:०० ते सायं. ५:०० पर्यंत करण्यात आले. यावेळी श्री. सारंग पांडे (कार्यकारी विश्वस्त,

लोकपंचायत) श्री. उल्हास पाटील, श्री. तुळशीराम जाधव, श्रीमती शालन शेळके, श्री. सोमेश कांटकर, श्री. दिलीप शेळके, श्री. गंगाधर चारुडे, श्रीमती सुजाता गुंजाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण ३० दिव्यांगांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम. आर. किट, जयपूर फूट, कॅलिपर, एफ. ओ. के. एफ. ओ. इत्यादी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

**जिल्हा – पुणे (ओतूर):**
**मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अहमदनगर जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे मोफत वाटप दिनांक २६ जून, २०१८ रोजी सकाळी १०:०० ते सायं ५:०० पर्यंत अहमदनगर येथे करण्यात आले. यावेळी श्री. वैभव तांबे (सचिव, गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ) श्री. नंदकुमार फुले (प्रकल्प संचालक) श्री. दत्ता बाळसराफ (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान) श्री. विशाल तांबे (नगरसेवक), विजय कान्हेकर (सचिव, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी) आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण १०३ दिव्यांगांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर. किट, जयपूर फूट, कॅलिपर, एफ. ओ. के. एफ. ओ. इत्यादी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

**जिल्हा हिंगोली :**
**मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, हिंगोली, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, हिंगोली, यांच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप दिनांक २७ जून, २०१८ रोजी सकाळी १०:०० ते सायं. ५:०० पर्यंत जिल्हा रुग्णालय सभागृह, हिंगोली येथे करण्यात आले. यावेळी श्री. सुनिल देवडा (अध्यक्ष, ओमप्रकाश देवडा पीपल्स को. ऑप. बँक) श्रीमती संगीता गुट्टे (जिल्हा समाज कल्याण अधिकारी), श्री. श्रीकांत कराले, श्री. हनुमान टेकाले आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण ४९ दिव्यांगांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम. आर. किट, जयपूर फूट, कॅलिपर, एफ. ओ. के. एफ. ओ. इत्यादी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे दिव्यांगांना वाटप करण्यात आले.

**जिल्हा नांदेड :**
**मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड, यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे मोफत वाटप दिनांक ३० जून, २०१८ रोजी सकाळी १०:०० ते सायं. ५:०० पर्यंत जिल्हा रुग्णालय सभागृह, हिंगोली येथे करण्यात आले.

यावेळी श्री. डोंगरे (जिल्हाधिकारी), समाजकल्याण सभापती, श्री. ए. बी. कुंभारगांवे, श्री. बापू दासरी (विशेष निरीक्षक), श्री. गोडगोडवार (वै.सा.का.), श्री. विठ्ठल मगनाळे, महात्मा गांधी सेवा संघ परभणी सचिव श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण ३० दिव्यांगांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम. आर. किट, जयपूर फूट, कॅलिपर, एफ. ओ. के. एफ. ओ. इत्यादी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

**जिल्हा सांगली :**
**मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग

हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद सांगली, यांच्या संयुक्त विद्यमाने सांगली जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे मोफत वाटप दिनांक १ जुलै २०१८ रोजी सकाळी १०:०० ते सायं ५:०० पर्यंत राजारामबापू ज्ञान प्रबोधिनी, इस्लामपूर येथे करण्यात आले. यावेळी श्री. शामराव पाटील (अध्यक्ष, राजारामबापू ज्ञान प्रबोधिनी) श्री. दत्ता बाळसराफ (संयोजक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई), श्री. विशाल तांबे (महानगर पालिका सदस्य), श्री. आशिष दामले, श्री. दिपक हुबळ (मुख्याध्यापक), श्री. अजिंक्य कुंभार, डॉ. वृषाली आकळे, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, संस्थेचे सचिव श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण ६८ दिव्यांगांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम. आर. किट, जयपूर फूट, कॅलिपर, एफ. ओ. के. एफ.ओ. इत्यादी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

**जिल्हा-परभणी (सेलू) :**
**मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी आणि समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद औरंगाबाद, यांच्या संयुक्त विद्यमाने परभणी जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे मोफत वाटप दिनांक २६ जुलै २०१८ रोजी सकाळी १०:०० ते साया. ५:०० पर्यंत सेलू येथे करण्यात आले. यावेळी श्री. अशोक काकडे (सभापती, जिल्हा परिषद) श्री. विजय भांबळे, माऊली ताठे (तालुकाध्यक्ष) श्री. ॲड. बाळासाहेब रोडगे, महात्मा गांधी सेवा संघ परभणी संस्थेचे सचिव श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण १२८ दिव्यांगांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर. किट, जयपूर फूट, कॅलिपर, एफ.ओ.के. एफ.ओ. इत्यादी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

**जिल्हा सिंधुदुर्ग :**
**मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप दिनांक ३० जुलै २०१८ रोजी सकाळी १०:०० ते सायं ५:०० पर्यंत सिंधुदुर्ग येथे करण्यात आले. यावेळी श्री. सूर्यवंशी (समाजकल्याण अधिकारी), यतीन अहिरे (वै.सा.का.), महात्मा गांधी सेवा संघ परभणी संस्थेचे सचिव श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण ३७ दिव्यांगांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड इत्यादी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

**जिल्हा औरंगाबाद :**
**मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद, यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप दिनांक २ ऑगस्ट, २०१८ रोजी सकाळी १०:०० ते सायं. ५:०० पर्यंत करण्यात आले. यावेळी श्रीमती ज्योती राठोड (समाजकल्याण अधिकारी), श्री. नासेर खान (महानगरपालिका सदस्य), महात्मा गांधी सेवा संघ, परभणी संस्थेचे सचिव श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण २१ दिव्यांगांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड इत्यादी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

**जिल्हा पुणे :**

**वयोश्री योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :**

सामाजिक न्याय एवं अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, भारतीय कृत्रिम अंग निर्माण (अलिमको), कानपूर जिल्हा परिषद, पुणे जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच आणि जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्ह्यातील ९ तालुक्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी वयोश्री योजनेअंतर्गत ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधने वाटप शिबिराचे आयोजन शुक्रवार २४ ऑगस्ट, २०१८ रोजी ग. माडगूळकर सभागृह, विद्या प्रतिष्ठान, एम.आय.डी.सी. बारामती, पुणे येथे सकाळी १०:०० ते सायं ६:०० पर्यंत करण्यात आले. यापूर्वी झालेल्या तपासणी व मोजमाप शिबिरात एकूण ८००० ज्येष्ठ नागरिकांची तपासणी झाली. त्यापैकी त्यांच्या आवश्यकतेनुसार ३५०० ज्येष्ठ नागरिकांना कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

**महाराष्ट्र राज्य :**

**मोफत डिजिटल श्रवणयंत्र वाटपासाठी कर्णबधिर मुलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी कर्णसाच्यांचे नोंदणी व मोजमाप शिबिर:**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, स्टार की फाऊंडेशन, अमेरिका, आरव्हीएस एज्युकेशनल ॲण्ड चॅरिटेबल फाऊंडेशन, मुंबई, टाटा ट्रस्ट, मुंबई, ठाकरसी ग्रुप मुंबई, विद्या प्रतिष्ठान, बारामती, आणि महात्मा गांधी सेवा संघ, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबादप्रमाणे २०१८ मध्ये महाराष्ट्र राज्यातील २२ जिल्ह्यांत मोजमाप शिबिराचे आयोजन करून जास्तीत जास्त कर्णबधिर विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक यांना मोफत अद्ययावत डिजिटल श्रवणयंत्राचा लाभ मिळावा याकरिता कर्णबधिर मुलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी कर्णसाच्यासाठी नोंदणी, व मोजमाप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

**त्याच्या सविस्तर माहितीसाठी पुढील तक्ता पाहा.**

| अ.क्र. | दिनांक | जिल्हा | एकूण लाभार्थी |
|---|---|---|---|
| १ | २१.०९.२०१८ | बारामती | ५७३ |
| २ | २२.०९.२०१८ | इंदापूर | ५१ |
| ३ | २२.०९.२०१८ | दौंड | २०२ |
| ४ | २३.०९.२०१८ | बारामती | ३०६ |
| ५ | २६.०९.२०१८ | पुणे | ४५५ |
| ६ | २७.०९.२०१८ | सांगली | २०४ |
| ७ | २७.०९.२०१८ | कोल्हापूर | २३६ |
| ८ | २८.०९.२०१८ | रत्नागिरी | ८९ |
| ९ | २८.०९.२०१८ | सिंधुदुर्ग | २५ |
| १० | ३०.०९.२०१८ | उस्मानाबाद | १७४ |
| ११ | ३०.०९.२०१८ | सोलापूर | २९४ |
| १२ | ०१.१०.२०१८ | लातूर | २६० |
| १३ | ०१.१०.२०१८ | नांदेड | १८८ |
| १४ | ०२.१०.२०१८ | हिंगोली | १४२ |
| १५ | ०२.१०.२०१८ | परभणी | २४६ |
| १६ | ०३.१०.२०१८ | जालना | १३५ |
| १७ | ०३.१०.२०१८ | औरंगाबाद | ५२० |
| १८ | ०४.१०.२०१८ | अंबेजोगाई, बीड | २७५ |
| १९ | ०४.१०.२०१८ | पुणे | २३० |
| २० | ०६.१०.२०१८ | ठाणे | ३०९ |
| २१ | ०६.१०.२०१८ | रायगड | १५९ |
| २२ | ०९.१०.२०१८ | जळगांव | २२६ |
| २३ | १०.१०.२०१८ | बुलढाणा | ३०९ |
| २४ | ११.१०.२०१८ | औरंगाबाद | २४७ |
| २५ | ११.१०.२०१८ | विद्या प्रतिष्ठान, पुणे | १४६ |
| | | **एकूण लाभार्थी** | **६००१** |

**'दिव्यांग कट्टा'**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंचाने नोव्हेंबर, २०१७ रोजी दिव्यांगांसाठी 'दिव्यांग कट्टा' सुरू करण्यात आला आहे. हा कट्टा प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी आयोजित केला जातो. सध्या दिव्यांग कट्ट्याच्या माध्यमातून दिव्यांग स्टॉल धारकांच्या समस्या व त्यांना येणाऱ्या अडचणी या विषयाचा मागोवा घेऊन पाठपुरावा केला जात आहे. या दिव्यांग कट्ट्याचे आयोजन शमीम खान (संघटक – अपंग हक्क विकास मंच) हे पाहतात. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अपंग हक्क विकास मंचाच्या संघटक सुकेशनी मर्चंडे-शेवडे विशेष परिश्रम घेतात.

**अंध प्रवर्गासाठी चर्चासत्र :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच आणि ब्लाइंड ग्रॅज्युएट फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दोन वर्षांपासून नियमितपणे दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी अंध प्रवर्गासाठी चर्चासत्राचा उपक्रम राबविला जातो. या सत्रात विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांना बोलावून त्यांच्या संबंधित विषयावर मार्गदर्शनपर चर्चा केली जाते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षणातील झालेले बदल, नोकरीत सामान्य जीवनात येणारे अडथळे अशा विषयांवर चर्चा केली जाते. यामुळे या प्रवर्गातील अपंगांना त्यांचे आयुष्य सोप्या पद्धतीने कसे जगता येऊ शकते याबद्दल विशेष मार्गदर्शन मिळते आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदतही होते. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अपंग हक्क विकास मंचाच्या संघटक सुकेशनी मर्चंडे–शेवडे विशेष परिश्रम घेतात.



चंद्रशेखर यांचे समवेत.... (वर्ष १९७९)

# शिक्षण विकास मंच

## कार्यवृत्त

**विशेष : सभा**

दिनांक २९ सप्टेंबर २०१८ रोजी 'शिक्षण विकास मंच'ची विशेष सभा झाली. ही सभा 'शिक्षण विकास मंच'चे मुख्य संयोजक डॉ. वसंतराव काळपांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस शिक्षण विकास मंचच्या सल्लागार बसंती रॉय, समन्वयक माधव सूर्यवंशी, नजमा काझी, सुचेता भवाळकर यांची उपस्थिती होती. या बैठकीत ऑक्टोबर महिन्यात जो शिक्षण कट्टा घेतला जाणार आहे. त्याचे पूर्ण नियोजन करण्यात आले. या कट्ट्याचा विषय ठरला. तो असा, 'सक्तीचे मोफत शिक्षण–मोफत आहे का?' या ठरलेल्या विषयावर सहभागी कोण होणार याचीही चर्चा करण्यात आली. सक्तीचा मोफत शिक्षणाचा कायदा, त्याची अंमलबजावणी या संदर्भातील चर्चा यावेळी करण्यात आली.

शिक्षण कट्ट्यासाठी जी उपस्थिती होणार आहे त्याची यादी बनवून त्यांना निरोप देण्याचे नियोजन करण्यात आले. प्रसारमाध्यमासाठी प्रसिद्धी पत्रक तयार करण्यात आले. याची चर्चा झाल्यानंतर २५ नोव्हेंबरला जी शिक्षण परिषद भरणार आहे व त्याच्या अनुषंगाने 'सेमी–इंग्रजी' विषयावरचे जे पुस्तक प्रकाशित होणार आहे त्याच्या लेखनाविषयी चर्चा यानंतर झाली. या संदर्भातील सर्व निर्णय घेऊन सभा समाप्त झाली.

**शालेय खर्च भागवायचे कसे ?**
**'शिक्षणकट्टा'मध्ये अनुदानित शाळांची व्यथा**

शासनाकडून शाळांना दिले जाणारे वेतनेत्तर अनुदान पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. त्यामुळे रोजचा शालेय खर्च भागवताना शाळांच्या नाकीनऊ येतात. वीज देयक, शालेय उपक्रमाचा खर्च, परीक्षा आयोजन, ग्रंथालयीन पुस्तक खरेदी, खेळाचे साहित्य, शाळेची डागडुजी हे आणि असे अनेक खर्च कसे भागवायचे, असा प्रश्न यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या शिक्षण विकास मंचतर्फे आयोजित 'शिक्षणकट्टा' कार्यक्रमात उपस्थित करण्यात आला. 'सक्तीचे मोफत शिक्षण–मोफत आहे का?' या विषयावर बोलताना 'आयईएस' नवी मुंबई हायस्कूलचे किसन पवार, एकवीरा विद्यालयाचे नागेंद्र कागीनकर, बदलापूरच्या आदर्श विद्यालयाचे दाभाडे सर आणि वांद्रे येथील महात्मा गांधी विद्यालयाच्या दीपिका गावंडे यांनी ही व्यथा मांडली.

लोकसहभागातून निधी जमा करण्यास काही मर्यादा आहेत, असे मुख्याध्यापक संपदा जोशी यांनी सांगितले. मुंबई मनपाचे शिक्षण अधिकारी प्रकाश चऱ्हाटे यांनी मुंबई मनपा शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण नुसतेच मोफत नाही तर गुणवत्तापूर्ण दिले जाते असे मत मांडले. सतीश मोरे यांनी पैशाअभावी शाळेच्या संगणक कक्षाची कशी दुरवस्था झाली आहे याची उदाहरणे सांगितली. भांडुपच्या अमरकोर विद्यालयाचे सुनील वागळे, मोहिते पाटील विद्यालयाचे दहिफळे आणि सपकाळ सर यांनी विद्यार्थ्यांसाठीचे उपयोगी कार्यक्रम आयोजित करताना शालेय शुल्क आकारले जाते आणि पालक भविष्यातील तरतूद म्हणून सहज शुल्क भरतात, पण ते मर्यादित रूपात असायला हवे, असे मत व्यक्त केले. शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू कार्यकर्ती हेमांगी जोशी यांनी खासगीकरणाचा परिणाम जागतिक आणि देशपातळीवरील शिक्षणावर झाला आहे याकडे लक्ष वेधले. मुकुंद आंधळकर यांनी शिक्षण मोफत देऊ नये, माफक दरात द्यावे म्हणजे त्याचे मूल्य समजेल, असे मत व्यक्त केले. यावेळी भारतीय समाज व्यवस्था ही संमिश्र स्वरूपाची आहे. त्यामुळे शाळांची रचना आणि त्याची शुल्क आकारणीही संमिश्र पद्धतीची आहे. तरीही मनमानी करून पालकांकडून शिक्षणाच्या नावावर लाखो रुपयांची वसुली करू नये, शिक्षण मोफत देताना ते गुणवत्तापूर्ण असावे यावर सर्व निमंत्रितांचे एकमत झाले.

# कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम

## कार्यवृत्त

समाजातील गोरगरीब, दीनदुबळ्या व मागास लोकांना त्यांच्या आर्थिक दुर्बलतेमुळे किंवा मागासलेपणामुळे अन्याय सहन करण्याची वेळ येऊ नये, यासाठी उपाय योजावेत अशा प्रकारचे मार्गदर्शन आपल्या संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतुदीला अनुसरून भारतीय संसदेने १९८७ मध्ये विधी सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केला आहे. या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक साहाय्य व सल्ला पुरविला जातो.

१९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमात अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक साहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत.

**फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारची कामे केली जातात:-**

१. समाजातील गोर-गरीब व तळागाळातील लोकांना कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.

२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करून गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.

३. काही वेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.

४. पक्षकारांच्या तंट्यामध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणणे.

५. विधी विषयामध्ये संशोधन करून प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करून राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला वैधानिक प्रस्ताव पाठविणे.

६. कायद्यांची विशेष माहिती करून देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.

७. सामान्य लोकांना कायद्याची माहिती करून देण्यासाठी राज्याच्या वेगवेगळ्या ठिकाणी वेळोवेळी विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे.

८. संबंधित न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या सहकार्याने लोकन्यायालयाचे आयोजन करणे.

९. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांची मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे, तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी वकिलांची व्यावसायिक नीतिमत्ता या विषयावर परिसंवादाचे आयोजन करणे.

त्यानुसार या अवधीमध्ये फोरमकडून करण्यात आलेल्या कामांचा तपशील खालीलप्रमाणे आहे : (दि. १ जून, २०१८ ते १० ऑक्टोबर, २०१८)

**फोरमच्या बैठका :**

कायदेविषयक साहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात.

**उपसमितीच्या बैठका :**

एखाद्या विषयासंबंधी सखोल अभ्यास करून प्रस्ताव तयार करण्यासाठी वेळोवेळी फोरमच्या वेगवेगळ्या उपसमित्या नेमल्या जातात. आवश्यकतेनुसार त्यांच्या बैठका झाल्या.

**कायदेविषयक सल्ला केंद्र :**

गोरगरीब व सामान्य लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० वा. चव्हाण केंद्राच्या दुसऱ्या मजल्यावर प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या सात महिन्यामध्ये या केंद्राच्या ५ बैठका झाल्या. अंदाजे ४१ लोकांनी या केंद्रामध्ये

येऊन मोफत सल्ल्याचा लाभ घेतला आहे. या केंद्राचे काम सर्वश्री ॲड. विनायकराव काबंळे, ॲड. मधुकर उगळे आदी वकीलांनी पाहिले.

**मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र :**

दर मंगळवारी सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत समुपदेशन व तडजोड केंद्राचे आयोजन करण्यात येते.

**आपल्या कायद्याची माहिती करून घ्या** (Know your Law Lecture Series)

या व्याख्यानमालेअंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यातून एकदा कायदेपंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.

**विधी साक्षरता कार्यशाळा**

लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या कायद्यांची माहिती करून देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ – पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठनागरिक, महिला, सरकारी गृहनिर्माण संस्थांचे सदस्य, आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या सात महिन्यांमध्ये आयोजिलेल्या अशा कार्यक्रमांमध्ये खालील कार्यक्रमांचा समावेश आहे :

**शपथ कार्यक्रम**

सर्व विधी साक्षरता कार्यशाळांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे सांघिक वाचन करण्यात येते. तसेच संविधानातील मुलभूत कर्तव्य पालनासंबंधी शपथा घेण्यात येतात. त्याचप्रमाणे अविवाहित मुले व मुली यांच्याकडून हुंडाबंदीसंबंधी शपथा घेण्यात येतात.

**कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे**

विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करून देण्यात येते. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश असतो : भारतीय संविधान, विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, हुंडाबंदी अधिनियम १९६१, भारतीय दंड संहिता १८६०, ग्राहक संरक्षण कायदा १९८६, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छा पत्र कायदा, गुंतवणूकीसंबंधीचे नियम, कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, माहितीचा अधिकार कायदा २००५, हिंदू विवाह कायदा १९५५, मुस्लिम कायदा, पोटगी संबंधीचे कायदे, महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६, संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, विशेष विवाह अधिनियम १९५४, बाल विवाह बंदी अधिनियम २००५, महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९८८, न्यायालांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), स्त्रियांचे असभ्य प्रतिरूपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, बिकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities Equal opportunities, Protection of Rights and Full Participation)Act, 1995 स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The National trust for welfare of Persona with Sutism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act. १९९९), अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ ( The Immoral Traffic (Precention) Act. 1956), राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७९, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॉपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९९९, महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), मुस्लिम स्त्रिया घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुर्नविकास) अधिनियम १९७१, मुंबई मुद्रांक कायदा १९५८, गृहनिर्माण संस्थांचे विनियम, अनुसूचित जाती आणि जमाती ( अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शारियत) प्रयुक्ती अधिनियम १९३७, नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, भारतीय मुद्रांक कायदा १८९९, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, सोसायटी नोंदणी अधिनियम

१८६०, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, मोटर वाहन अधिनियम १९८८, जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६१, मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, माता पिता व जेष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, मुंबई पोलीस अधिनियम, १९५० व कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारे लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा २०१४

**दिनांक १२ ऑगस्ट, २०१८ रोजी मोफत विधी कार्यशाळा**

कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरमच्या वतीने '' मनस्वी संसाधन केंद्र'' कळंबोली, नवी मुंबई येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ९० महिलांची उपस्तिती होती. या कार्यशाळेत दैनंदिन जीवनाशी निगडीत विषयांवरील कायद्यांची माहिती देण्याच आली. विषय :

१) संविधनाची ओळख २) स्त्री संदर्भातील गुन्हे ३) विवाह आणि घटस्फोटाचा कायदा ४) ग्राहक संरक्षण कायदा ५) माहितीचा अधिकार कायदा ६) वृद्धांच्या कल्याणाचा कायदा

**दिनांक २२ सप्टेंबर, २०१८ रोजी मोफत विधी कार्यशाळा**

कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरमच्या वतीने ''ओरिएन्टल लॉ कॉलेज'' सानपाडा, नवी मुंबई येथे विधी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुंबई उच्च न्यायाधीश प्रकाश डी. नाईक प्रमुख अतिथी म्हणून उपस्तित होते. या कार्यशाळेचा लॉ कॉलेजच्या एकूण १२० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

**दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी व्याख्यानमाला '' आपला कायदा जाणून घ्या''**

कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरमच्या वतीने सर्व सामान्य लोकांपर्यत मोफत दैनंदिन जीवनात उपयोगी कायद्याची माहिती या व्याख्यानमालेव्दारे पोहचवण्याचा प्रयत्न आहे. तरी याचे पाहिले पुष्प दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी सायं ५.०० ते ६.३० सांस्कृतिक सभागृह, चौथा मजला, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते. '' गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांचे प्रश्न आणि त्या सोडवणूकीच्या कायदेशीर तरतूदी'' या विषयाचे विषयतज्ज्ञ ॲड. प्रकाश धोपटकर यांनी लोकांना माहिती दिली. व्याख्यानासाठी ६० लोकांची उपस्थिती होते.

भारतातील सामाजिक – आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत तळागाळापासून थेट केंद्रसरकारपर्यंत गेली चार दशकं माझा सहभाग राहिलेला आहे. करीष्मा लाभलेलं नेवृत्व आणि विचारप्रणाली समाजाच्या, देशाच्या भविष्याला आकार देतात, त्यात परिवर्तन घडवून आणतात, हे मी जवळून पाहिलं आहे. या गोष्टींचं महत्त्व नाकारता येण्याजोगं नसलं तरी माझ्या मते, मानवी जीवनावर विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा होणार परिणाम त्यापेक्षा कितीतरी अधिक खोलवर आणि दीर्घकालीन असतो. प्रत्येक समाजात घडून आलेल्या परिवर्तनाचं शिल्पकार तंत्रज्ञानच आहे. बदलांची दिशा, त्यांचा आवाका आणि गती तंत्रज्ञानानेच निश्चित केली, आणि आकाराला आली असं दिसून आलं आहे.

**मा. शरद पवार**

**दि. ६ नोव्हेंबर २०००**

# सृजन

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर 'सृजन' विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास आणि विविध कलांची तोंडओळख करुन त्यांचे विद्यार्थी जीवन समृद्ध व्हावे या करिता 'सृजन' हा उपक्रम चालविण्यात येतो. सर्जनशीलतेचा आविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्तकलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

- सृजनच्या वतीने दि. ८ जुलै २०१८ रोजी 'किनारी व सागरी जैवविविधता' यावर कार्यशाळा घेण्यात आली. सृष्टीज्ञान संस्थेचे प्रशांत शिंदे यांनी मुलांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत ७० विदयार्थी सहभागी झाले होते.
- रविवार दि. ५ ऑगस्ट २०१८ रोजी थ्रीडी भूमितीय स्ट्रक्चरबाबत मुलांशी रचना संसदचे प्राध्यापक विवेक टेटविलकर यांनी संवाद साधला.
- रविवार दि. २ सप्टेंबर २०१८ रोजी श्री. देवदत मलमे यांनी चिकणमातीपासून वेगवेगळे आकार कसे बनवितात याबाबत मुलांना मार्गदर्शन केले.
- रविवार दि. १८ नोव्हेंबर २०१८ रोजी सृजनची कार्यशाळा श्री. राजेश कांबळे यांनी घेतली. चित्रकलेचे प्राथमिक धडे त्यांनी मुलांना दिले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुबईच्या वतीने मुलांसाठी विविध कौशल्य विकासाचे कार्यक्रम घेतले जातात. यावेळी मुलांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे.



सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान यांचे सोबत

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ

## कार्यवृत्त

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्यावतीने महिलांची शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक अशा विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, कार्यशाळा आणि इतर कार्यक्रमांच्या माध्यमातून कृतीशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता रमेशचंद्र कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात. त्यांना संजना संतोष पवार यांचे सहकार्य असते.

महिलांना उपयुक्त प्रशिक्षण देणे हा महिला व्यासपीठाचा सतत प्रयत्न असतो, जेणेकरून त्या प्रावीण्य मिळवून आपले स्वत:चे अर्थार्जन करू शकतात. व्यासपीठाद्वारे वेळोवेळी समाजाला उपयुक्त असे विषय व त्यावरील चर्चासत्रे आयोजित केली जातात. दिनांक ५ जुलै २०१८ रोजी 'संवेदन' प्रशिक्षण संस्थेमार्फत मा. समीर दिघे यांचे आर्थिक गुंतवणुकीवर विनामूल्य व्याख्यान आयोजित केले गेले. साठ ते सत्तर लोकांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेतला. या व्याख्यानात उत्पन्नाप्रमाणे आर्थिक नियोजन कसे करावे; शेअर बाजार, म्युचुअल फंड, एस आय पी याविषयी मार्गदर्शन; तसेच वाढती महागाई, घटते व्याजदर, वाढत चाललेले दामदुप्पट फसव्या योजनांचे प्रमाण, इन्शुरन्स का घ्यावा? का घेऊ नये? उत्पन्नाप्रमाणे आर्थिक शिस्त कशी असावी? नियोजन करताना कसा विचार करावा? ज्येष्ठ नागरिकांना दर महिन्याला हवे असलेले पैसे आणि पैशाच्या वाढीचा दर यांचा समतोल कसा साधावा? जागतिक गुंतवणूक गुरु वॉरेन बफेट ह्यांचे विचार आणि नियम, समृद्ध आर्थिक विकासाच्या दृष्टीने पाऊल कसे टाकावे अशा बऱ्याच गोष्टींवर चर्चा झाली व लोकांच्या बऱ्याच शंकांचे निरसन झाले.

दिनांक १६ ते २० जुलै या कालावधीत ५ दिवसांचे कॅनव्हास पेंटींग प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. १२ महिला व १ शालेय विद्यार्थी यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. मा. प्रियांका घरत यांचे मार्गदर्शन प्रशिक्षणार्थींना मिळाले.

या प्रशिक्षणात चाकू रंगकाम व पोतकाम रंगकाम यांचा उपयोग कॅनव्हासवर कशा प्रकारे करायचा याबाबत मार्गदर्शन केले गेले. निसर्ग चित्र, गणपती, बुद्ध असे वेगवेगळे विषय वापरून महिलांनी पेंटींग्ज पूर्ण केली. चाकू रंगकाम व पोतकाम रंगकाम या दोन नवीन विषयाचे व रंगसंगती कशी करावी या गोष्टीचे महिलांना मार्गदर्शन मिळाले.

जुलै महिना संपताच गणेशभक्तांना गणपतीची ओढ लागते. मग काहीजण गेल्या वर्षीच्या आठवणीत रमतात, तर काहीजण सजावट कशी करता येईल याबाबतच्या आखणीला सुरुवात करतात, काहीजण गणपती उत्सवाच्या माध्यमातून समाज प्रबोधन कसे करता येईल याबाबत विचार करतात. याच अनुषंगाने १६ ऑगस्ट २०१८ रोजी शाडूच्या मातीपासून गणपती कसे तयार करतात याबाबतच्या मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मूर्तिकार सिद्धेश तेली यांनी ऐन गणपतीअगोदर वेळात वेळ काढून आमच्या विनंतीला मान देऊन मार्गदर्शन केले. शाडूच्या मातीपासून ५ ते ६ गणपती मूर्ती तयार करून दाखविल्या. १७ प्रशिक्षणार्थींनींचा या कार्यशाळेत सहभाग होता. प्रत्येकाने प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आपली कल्पकता वापरून एकापेक्षा एक सुंदर मूर्ती बनविल्या. त्या घरी घेऊन जाताना त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद व समाधान पाहण्यासारखे होते.

चवीचे खाण्याची आवड कुणाला नाही! त्यात भरपूर चीज घातलेला पिझ्झा म्हणजे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच आकर्षित करतो. पण बाहेरील पिझ्झाचे दर व मैदा आणि यीस्ट पासून बनवलेला पिझ्झा पाहिले की वाटते, 'नको बाबा, तब्येतीची हेळसांड नको. अन घरी अव्हन वापरण्याची कटकट नको.' म्हणून बऱ्याचदा आपण खाण्याच्या आवडीला मुरड घालतो. या सर्व गोष्टी लक्षात घेता वाटलं की घरगुती, विनामैदा, विनायीस्ट असा पिझ्झा बनविता आला तर... त्याचेही उत्तर सापडले. 'कुकींग मंत्रा अकादमी'च्या अध्यक्ष पल्लवी नेने यांच्या स्पेशल पिझ्झा कार्यशाळेबाबत माहिती कळली आणि दिनांक १६ ऑगस्ट २०१८ रोजी त्याचीही खास कार्यशाळा ठेवण्यात आली. त्याला महिलांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला. ज्वारी, बाजरी, गहू यांच्या पिठापासून पिझ्झा कसा तयार करता येईल, तसेच सॉस, बार्बेक्यू, डबल चीज, स्पेशल पनीर असे अनेक

पिझ्झाचे प्रकार घरी कसे तयार करायचे याबाबतही पल्लवी नेने यांच्याकडून मार्गदर्शन करण्यात आले. शिकवत असताना तयार केलेल्या पिझ्झाची टेस्टसुद्धा सहभागी प्रशिक्षणार्थीला देण्यात आली. प्रॅक्टिकल व नोट्स यांचा महिलांना खूप उपयोग झाला.

सामाजिक ज्ञानाची गरज लक्षात घेऊन निवडलेला विषय म्हणजे जीएसटी. हा विषय सगळ्याच क्षेत्रात ज्वलंत प्रकारे अस्तित्व दाखवून देत आहे. आताआता लोकांना रोजच्या व्यवहारातील जीएसटी आकडेमोड लक्षात येतेय; पण सहकारी गृहनिर्माण संस्थांनादेखील जीएसटी कसा बंधनकारक आहे याबाबतचे मार्गदर्शन दिनांक ४ सप्टेंबर २०१८ रोजी सनदी लेखापाल मा. अजित जोशी यांच्यामार्फत करण्यात आले. त्याचबरोबर सोसायटीला कोणते कर कशा प्रकारे लागू होतात याचीही चर्चा घेण्यात आली. ५० लोकांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

रोजचे मोत्याचे, सोन्याचे दागिने घालूनही कधीकधी वाटतं, काहीतरी हटके घालावं. हल्ली लग्नसोहळ्यात वेगवेगळे विधी वेगवेगळ्या दिवशी ठेवतात. म्हणजे, संगीत, हळद समारंभ वगैरे. त्यामुळे आधी खऱ्या फुलांच्या दागिन्यांची मागणी होती. पण दिवसागणिक फॅशन बदलते. मग ट्रेंड आला फोमपासून बनविलेल्या दागिन्यांचा. दिसायला सुंदर, नाजूक, हलके व हव्या त्या रंगातले दागिने वधू आवडीप्रमाणे वापरू लागल्या. पण नंतर हे दागिने दैनंदिन वापरासाठीही चांगले आहेत असे लक्षात आले. प्रियांकाला विचारून तीन दिवसांची कार्यशाळा ५, ६ व ७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आली. या फुलांचा वापर आपण घरात सजावटीसाठी करू शकतो; त्यापासून फुलदाणी, फोटो फ्रेम, की होल्डर अशा अनेक गोष्टी बनवू शकतो असे प्रियांकाने सांगितले. तीन दिवसात महिलांनी वेगवेगळ्या रंगांच्या फोमपासून नेकलेस विथ इअरिंग, फिंगर रिंग, ब्रेसलेट, हेअर ब्रोच, सारी ब्रोच इत्यादी प्रकार स्वत: कार्यशाळेत तयार केले. प्रियांकाने प्रशिक्षणार्थींना व्यवसायाच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. महिलांना नवीन कला शिकायला मिळाली.

दिनांक २५ सप्टेंबरपासून ‘सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण : वर्ग क्र २२’ सुरू झाला. या कार्यशाळेला मा. प्रभाकर चुरी, मा. देवयानी गोरे, अॅड. प्रमोद कुमार व सहकारी क्षेत्रातील इतर मान्यवरांचे मार्गदर्शन मिळाले. या कार्यशाळेचे फायदे म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्थेत पूर्णवेळ /अर्धवेळ नोकरी मिळू शकते. तसेच हे प्रशिक्षणार्थी सल्लागार म्हणूनही चांगले काम करू शकतात, व आपल्या स्वतःच्या राहत्या सोसायटीत मॅनेजिंग कमिटीत चांगले काम करू शकतात. सामजिक ज्ञान/भान यांची जाणीव होते. आत्तापर्यंत २० ते ७० या वयोगटातील ५०० पेक्षा अधिक प्रशिक्षणार्थींनी हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. त्यांची परीक्षा घेऊन नंतर प्रमाणपत्रही देण्यात येते. नोव्हेंबर २०१८ मध्ये हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

वर नमूद केलेली सर्व प्रशिक्षणे व कार्यक्रम अत्यंत माफक फीमध्ये ‘ना नफा ना तोटा’ तत्त्वावर सुरू आहेत, ज्यासाठी बाहेर खूप पैसे मोजावे लागतात. या सर्व प्रशिक्षणात आम्ही प्रशिक्षणार्थींची संख्या मर्यादित ठेवली आहे, जेणेकरून मार्गदर्शकास प्रत्येकाकडे लक्ष देता येईल. उगाच माफक फी च्या नावाखाली भरपूर प्रशिक्षणार्थी घेऊन आम्ही आमची कार्यशाळा यशस्वी करत नाही, तर सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीस शिकविलेली कला आली पाहिजे हा हेतू असतो. मग सराव करून ती व्यक्ती त्या त्या कला आत्मसात करू शकते.

आमची उदिष्टे सरळ, सोपी व समाजाचे भले व्हावे या दृष्टीकोनातूनच आहेत. आम्ही सतत लोकांना काय उपयुक्त देऊ शकतो हाच विचार करत असतो. खूप मोठ्या प्रमाणात नाही, पण ज्या समाजात आपण वावरतो व ज्याच्याकडून आम्हालाही खूप काही शिकायला मिळते, त्या समाजाचे देणे परत करणे यात आमचा खारीचा नाही; पण मुंगीचा वाटा नक्की आहे. आजही आमच्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीकडून आम्हाला आमच्या कामाची मिळालेली दाद व भविष्यासाठीच्या शुभेच्छा हेच आमचे उदिष्ट सफल करते. हाच विचार घेऊन आम्ही भविष्यातही स्त्रियांसाठी व समाजासाठी काही ना काही करत राहणार आहोत.

# यशवंतराव चव्हाण ग्रंथालय, मुंबई

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाणसाहेब ग्रंथप्रेमी म्हणून प्रसिद्ध होते. आज मुंबई येथे त्यांच्या नावाने 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय' सुसज्ज आहे. ग्रंथालयाचा विचार केला असता, माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ग्रंथालय सेवांचे स्वरूप बदललेले आहे. प्रामुख्याने वाचनसाहित्य प्रकारातील बदल आणि बदलांच्या अनुषंगाने द्यावयाच्या सेवा हा भाग महत्त्वपूर्ण आहे. ग्रंथालयांनी आता बदलत्या परिस्थितीत वाचकांना आवश्यक असणाऱ्या सेवा–सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या सेवा केवळ ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांसाठी उपलब्ध करावयाच्या आहेत असे नसून जे वाचक ग्रंथालयात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठीही ग्रंथालय सेवांची पूर्ती होणे आवश्यक आहे. यासाठी महत्त्वाची दुर्मीळ पुस्तके, वर्तमानपत्रातील बातम्या, मासिकामधील लेख अशा प्रकारे संग्रहित केलेली महत्त्वाची माहिती व्यवस्थितरित्या स्कॅन करून ग्रंथालयाच्या सर्व्हरवर अपलोड केली आहे. त्यामुळे सभासदांना वाचन सोयीस्कर झाले आहे. ग्रंथालयात येणारे सभासद संशोधक, एमपीएससी, युपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी असतात. ग्रंथालयाने यासाठी काही महत्त्वाच्या विषयांची वृत्तपत्रीय कात्रणे वाचकांना हाताळण्यासाठी व संदर्भाकरिता व्यवस्थितरित्या बांधणी करून ठेवली आहेत. विद्यार्थी, संशोधक यांच्याकरिता, तसेच अद्ययावत माहितीकरिता नियतकालिके बांधणी करून ठेवली आहेत. ग्रंथालयात विविध नियतकालिके, समाजशास्त्र, शेती, इतिहास, कायदा, संस्कृती इ. विषयांवरील पुस्तके, आत्मचरित्रे, धर्मकोष, विश्वकोष, गॅझेटीयर, ॲटलास, इअरबुक, डिक्शनरी, निरनिराळ्या कायद्याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. वेळोवेळी ग्रंथालयाला अनुसरून नवीन पुस्तके खरेदी करण्यात येतात.

### ग्रंथालय रचना व कार्यपद्धती

- **स्पर्धा परीक्षेकरिता उपयुक्त नियतकालिके**

ग्रंथालयात संशोधक, एमपीएससी, युपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी येतात. ग्रंथालयाने यासाठी काही महत्त्वाच्या नियतकालिकांची व्यवस्थितरित्या बांधणी करून ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता ठेवली आहेत:

१) Bulletin Unique Academy
२) Pratiyogita Darpan
३) Kurukshetra
४) Yojana
५) Seminar
६) Competition Success Review
७) The Economist
८) Economic Political Weekly
९) Foreign Affair
१०) Business India
११) frontline
१२) पंचधारा
१३) साधना
१४) सत्याग्रही विचारधारा
१५) समाजप्रबोधन पत्रिका
१६) नवभारत
१७) साहित्य सूची
१८) स्वतंत्र नागरिक
१९) चाणक्य मंडळ
२०) यशाची परिक्रमा

- **संदर्भ सेवा**

ग्रंथालये समाजाभिमुख असल्यामुळे उपभोक्त्याला वाचनसाहित्य सहजासहजी उपलब्ध करून देण्याकडे ग्रंथालयाचा कल आहे. संदर्भ सेवा मिळावी हा ग्रंथालयाचा उद्देश आहे. संदर्भ सेवा देण्यासाठी वाचकांना वेगवेगळ्या प्रकारची माहिती देणे,

उपयोजकाला संदर्भ ग्रंथांच्या संदर्भात मार्गदर्शन करणे, संशोधक किंवा विद्यार्थ्यांच्या माहितीसंदर्भातल्या मागण्या हे सर्व लक्षात घेऊन सूची तयार केली आहे. वाचकाला आवश्यक असणारी माहिती तत्काळ उपलब्ध करून देण्यासाठी काही महत्त्वाच्या E- resources च्या माध्यमातून सेवा देण्यात येते.

| OPEN ACCESS THESES REPOSITORY SHODHGANGA | LINKS |
|---|---|
| Shodhganga | http://shodhganga.inflibnet.ac.in/ |
| DART-Europe | http://www.dart-europe.eu/basic-search.php |
| LSE Theses Online | http://etheses.lse.ac.uk/view/sets/DEPTS.html |
| DSpaceCambridge | https://www.repository.com.ac.uk/ |
| NDLTD | http://search.ndltd.org/index.php |
| Open Thesis | http://www.openthesis.org/ |
| Dyuthi Digital Repository | http://dyuthi.cusat.ac.in/xmlui/ |
| USU Institutional Repository | http://repository.usu.ac.id/handle/123456789/21 |
| KrishiKosh (**कृषिकोष** ) | http://krishikosh.egranth.ac.in/ |
| EThos: e-theses online service | http://ethos.bl.uk/ProcessSearch.do |
| ISIM² Dissertations | https://openaccess.leidenuniv.nl/handle/1887/4948 |
| Open Access Theses and Dissertations | https://oatd.org/ |
| Shodhgangotri | http://shodhgangotri.inflibnet.ac.in/ |

**वृत्तपत्र कात्रण सेवा :** संशोधक किंवा विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य माहिती कमी वेळात देता यावी याकरिता ग्रंथालयात विशेष प्रकारे माहिती संग्रहित करून ठेवलेली आहे. ग्रंथालयात वर्तमानपत्रातील महत्त्वाच्या घडामोडींची कात्रणे करून त्यांच्या फाईल्स तयार करण्यात आल्या आहेत. झेरॉक्स काढून त्यांना व्यवस्थितरित्या बाईंडिंग करण्यात आले आहे. त्यांची यादी खाली दिल्याप्रमाणे–

१) १८५७ चा इतिहास
२) हीरक महोत्सव महाराष्ट्र, २००७
३) हिंदुस्तान टाइम्स इन मुंबई, २००७ : मुंबई मेट्रो, मुंबई एअरपोर्ट, मुंबई सिटी ट्रान्सफॉरमेशन प्रोजेक्ट
४) मुंबईत रेल्वेवरील अतिरेकी हल्ला, ११ जुलै २००६
५) मुंबई राज्यात पावसाचा धुमाकूळ, २६ जुलै २००५
६) २६ नोव्हेंबर २००८ चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला
७) अयोध्येत राममंदिर उभारणी बाबतीत निकाल, २०१०
८) साहित्य संमेलन २००३–२०१०
९) पुरस्कार (२००२–२००६) : साहित्य अकादमी पुरस्कार, भारतरत्न, नोबेल, ज्ञानपीठ, महाराष्ट्र भूषण
१०) पुरस्कार (२००६–२००९) : महात्मा फुले समता पुरस्कार, पद्मश्री, उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार, नोबेल पुरस्कार
११) पुरस्कार (२००९–२०१२) : आल्फ्रेड नोबेल, झी गौरव, जीवन गौरव, भारतरत्न, कला गौरव, कलातिलक, महाराष्ट्रभूषण, आदर्श शिक्षक, गोदागौरव
१२) मराठा आरक्षण मोर्चा २०१७
१३) मराठा आरक्षण मोर्चा २०१८
१४) मा. अटलबिहारी वाजपेयी (१९२४–२०१८)
१५) पावसाळा २०१८
१६) व्ही. एस. नायपॉल (नोबेल पुरस्कार विजेते)

- **ग्रंथालय नेटवर्क :** या रूपांतरासाठी लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर, ई–रिसोर्समध्ये (वाचनसाहित्य) सर्व्हर, संगणक संच, ई–ग्रंथालय आज्ञावली, नेटवर्क व केबलिंग, इंटरनेट कनेक्शन, सीडी आदींची व्यवस्था केली आहे. ऑनलाइन माहितीस्रोत, सीडी, डीव्हीडी या स्वरूपातील माहितीस्रोत, पूर्ण डिजिटल स्वरूपातील ग्रंथ (ई–बुक, ई–जर्नल्स, ई–डेटाबेस) या स्वरूपात उपलब्ध आहेत.

- **ई-ग्रंथालयांद्वारे देण्यात येणाऱ्या सेवा**

**कॅटलॉगिंग :** यामुळे विद्यार्थी, संशोधक यांना ग्रंथालयांमध्ये उपलब्ध असलेल्या पुस्तकांची किंवा संदर्भग्रंथांची माहिती मिळवणे सहजशक्य होते. कॅटलॉगमध्ये प्रत्येक पुस्तकाचा किंवा संदर्भग्रंथाचा गोषवारा (Abstract) दिलेला आहे. त्यामुळे विद्यार्थी, संशोधक व उपभोक्ता यांना पुस्तकाचा संदर्भ समजणे सोपे होते.

**ओपॅक :** ग्रंथालयाचे कॅटलॉग इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध आहेत, जेणेकरून वाचक किंवा उपभोक्ता घरबसल्या पुस्तकांची माहिती मिळवू शकतात.

**रेफरल सेवा :** ग्रंथालयांमध्ये उपलब्ध नसणाऱ्या माहितीसाठी जेथे माहिती उपलब्ध आहे, अशा स्रोतांचा संदर्भ दिलेला आहे.

**करंट अवेअरनेस सर्व्हीस :** ग्रंथालयातील नवीन ग्रंथ, नियतकालिके, दृकश्राव्य साधनांची यादी वाचकांसाठी अंतर्गत वेबवर प्रदर्शित केली आहे.

- **ग्रंथालयाचे नियम :** यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता नमुना अर्ज तयार केला आहे. या अर्जामध्ये स्वतःच्या हस्ताक्षरात परिपूर्ण माहिती भरून त्यासोबत पुढीलप्रमाणे वर्गणी भरणे.

१. सर्वसाधारण सभासदः- सर्वसाधारण सभासदाकरिता रु. ५००/- वार्षिक वर्गणी तसेच रु. ५००/- अनामत रक्कम (१९९६)

२. विद्यार्थी सभासदः- महाविद्यालयीन / उच्चशिक्षण/ संशोधनकर्त्या विद्यार्थ्यांकरिता वार्षिक रु. ५०/- नाममात्र वर्गणी व अनामत रक्कम रु.१००/-

३. यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये काही विद्यार्थी एक दिवस ते एक आठवडा या कालावधीकरिता ग्रंथालयाचा संदर्भाकरिता लाभ घेतात. या विद्यार्थ्यांकडून एका आठवड्याकरिता रु. ५०/- फक्त फी आकारण्यात येते. त्यांच्याकडून फक्त एका कार्डावर त्यांची वैयक्तिक माहिती भरून घेण्यात येते.

४. माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी शिक्षण घेणारे विद्यार्थी संगणकविषयक पुस्तकांचा लाभ घेतात. त्याकरिता वेगळी फी आकारली जात नाही.

**अ) संयुक्त संस्था सभासदत्व** (Corporate Membership) : कॉर्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र असेल. एकावेळी वर्गणी रु. ५०,०००/- ५ वर्षांसाठी.

**अनामत रक्कम** : सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येत नाही. परंतु एखाद्या दुर्मीळ व किमती पुस्तकासाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी अनामत रक्कम घेण्यात येईल.

**एका वेळी देण्यात येणारी पुस्तके:-** एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देता येतील.

**ब) संस्था सभासदत्व :** यासाठी शिक्षण व संशोधन संस्था व सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधन संस्था यु.जी.सी., आय.सी.एस.एस.आर. किंवा आय.सी.एच. आर. यांच्याकडून मान्यताप्राप्त असावी, तर सांस्कृतिक संस्था महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, किंवा मान्यताप्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

**संस्था सभासदत्वासाठी : प्रवेश फी रु. १,०००/- ना परतावा**

**वार्षिक वर्गणी :- रु. ५,०००/-**

**दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासद :- एकावेळी ५ वर्षांसाठी वर्गणी रु. २०,०००/-**

**एकावेळी देण्यात येणारी पुस्तके :** एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देण्यात येतील. अ व ब नुसार सभासदत्व हे संबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येईल.

त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येईल. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्यावतीने पुस्तके घेण्यास /प्रत करण्यास नामनिर्देशित करू शकतील. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागेल. मात्र पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे यांची जबाबदारी संस्थाप्रमुखाची असेल. वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार प्रतिष्ठानला राहील.

**५) सर्वसाधारण सभासद :** सभासदाला एकावेळी एक पुस्तक/ ग्रंथ देण्यात येईल. ते ८ किंवा १५ दिवसांत परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या

अनामत रकमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकाच्या किंमतीएवढी अनामत रक्कम भरून पुस्तक घरी नेता येईल.

६) महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक यांना ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/ संदर्भासाठी देण्यात येतात. घरी/ग्रंथालयाबाहेर नेण्याकरिता नाही.

**७) ग्रंथालयाच्या वेळा व सुट्ट्या :** सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत ग्रंथालय वाचकांकरिता तसेच पुस्तके परत करणे/ नवीन घेणे यासाठी खुले राहील. दुसरा व चौथा शनिवार, सर्व रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ग्रंथालय खुले राहील.

८) सभासदाचे कार्ड हरविल्यास त्यांना पुस्तक देण्यात येणार नाही. सभासदत्व नियमित ठेवण्याकरिता, सभासदाने स्वतःच्या हस्ताक्षरात अर्ज करून ग्रंथालयास सादर करावा. त्यानंतर कार्डाची दुसरी प्रत देण्याचा विचार केला जाईल.

**९)** सभासदांकडून ग्रंथ हरविल्यास त्यांना तो १५ दिवसांत नवीन खरेदी करून द्यावा लागेल किंवा त्या ग्रंथाची अद्ययावत रक्कम मूल्याइतकी रक्कम अनामत रकमेतून कमी करण्यात येईल व गरज पडल्यास अधिकची रक्कम सभासदास भरावी लागेल. अनामत रकमेतून रक्कम भरणे अनिवार्य राहील.

**१०)** सभासद ग्रंथालयामध्ये शांतता राखावी, आपापसामध्ये किंवा ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांबरोबर चर्चा करणे टाळावे. धूम्रपान, थुंकणे, झोपणे याकरिता मनाई आहे. ग्रंथालयात मोबाईल फोन बंद ठेवावे.

**११)** ग्रंथालयातून बाहेर पडताना सभासदास दिलेल्या ग्रंथाचा वर्गांक, दाखलअंक ग्रंथालयाच्या गेटवर तपासला जाईल.

**१२)** सभासदास ग्रंथालयाचे सभासद राहावयाचे नसल्यास त्यांनी तसा लेखी अर्ज दयावा, त्यासोबत कार्ड परत करावे. त्यावर निर्णय घेऊन इतर येणे नसल्यास अनामत रक्कम बिनव्याजी वजा करण्यात येईल.




द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ ग्रहण....

# माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीकडून जून ते सप्टेंबर २०१८ दरम्यान विविध प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले.

सी–डॅक कोर्सेस

सी–डॅक (Centre for Development of Advanced Computing) तर्फे कोर्सची बॅच फेब्रुवारी २०१८ मध्ये सुरू झाली होती. या बॅचला निरोप दिनांक ३१ जुलै २०१८ ला देण्यात आला. या बॅचमध्ये ५७ विद्यार्थी होते.

वरील बॅचच्या विद्यार्थ्यांचा कॉमन प्लेसमेंट प्रोग्रॅम १ ऑगस्ट २०१८ पासून सुरू झाला. विद्यार्थ्यांना कॉमन प्लेसमेंट प्रोग्रॅममध्ये उत्तम कामगिरी करता यावी, यासाठी काही खास व्याख्याने आयोजित केली होती.

व्याख्यानातील छोट्या मोठ्या टिप्पणींचा विद्यार्थ्यांना चांगला उपयोग होत आहे.

PG-DAC ऑगस्ट २०१८ च्या बॅचची C-CAT (C-DAC Common Admission Test) २४ जून व १ जुलै २०१८ ला घेण्यात आली. प्रबोधिनीमध्ये २४० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

PG-DAC ऑगस्ट २०१८ ची बॅच २० ऑगस्टला सुरू झाली. त्यात आजवर ६६ अॅडमिशन्स झाल्या.

PG-DAC कोर्समध्ये अॅडमिशन मिळवण्याकरिता C-CAT परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते. ही परीक्षा उत्तमरित्या उत्तीर्ण होता यावी म्हणून PreDAC कोर्स चालविण्यात येतो. या कोर्सची बॅच माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीमध्ये सुरू आहे.

प्रबोधिनीकडून कोकण ज्ञानपीठ कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी Aptitude या विषयावर मोफत कार्यशाळा २३ ऑगस्ट रोजी आयोजित केली होती. साधारण ८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

मल्टीमीडिया क्रिएशन कोर्ससाठी शालेय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसोबत कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**MKCL कोर्सेस**

प्रतिष्ठानतर्फे चालविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) च्या MS-CIT व KLiC Certificate कोर्सेसना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद आहे.

उन्हाळी सुट्टीमध्ये अॅडमिशन घेतलेल्या विद्यार्थ्यांनी MSBTE कडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांना उपस्थित राहून उत्तम यश मिळविले.

**शिक्षकांचा गौरव**

शिक्षक दिनांचे औचित्य साधून Young Lady High School, Fort Campion International School, Churchgate या शिक्षक संस्थांच्या शिक्षकांचा AIT कडून गौरव करण्यात आला.

**उद्दिष्ट**

गरजू आणि अपंग विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये शिक्षण उपलब्ध करून देण्याची संधी AIT ने दिली. अनेक कोर्सेसमध्ये अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना पडताळणीनंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो. AIT (YCP)तर्फे लष्कर आणि पोलीसखात्यातील व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय यांसाठी फीमध्ये सवलत दिली जाते. इच्छुक आणि शैक्षणिक पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हप्त्याने फी भरण्याची सुविधा देण्यात येते.

# विभागीय केंद्र, कऱ्हाड

## कार्यवृत्त

### स्व. सौ. वेणूताई चव्हाण यांची पस्तिसावी पुण्यतिथी

स्व. सौ. वेणूताई चव्हाण यांची पस्तिसावी पुण्यतिथी दिनांक १ जून २०१८ रोजी संपन्न करण्यात आली. 'विरंगुळा' स्व. यशवंतराव चव्हाणांचे निवासस्थान आणि स्व. सौ. वेणूताई चव्हाण चॅरिटेबल ट्रस्ट येथील देशनेते स्व. यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या प्रतिमेस व पुतळ्यांना श्री. अशोकराव गणपतराव चव्हाण (स्व. यशवंतरावांचे पुतणे) यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. स्व. सौ. वेणूताई यांच्या विरंगुळ्यातील वृंदावनास फार आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. उपस्थितांनी वृंदावनास (तुळशीला) फुले अर्पण करून सौ. वेणूताईंना श्रद्धांजली वाहिली.

स्व. सौ. वेणूताईंच्या स्मरणार्थ त्यांच्या आवडीप्रमाणे शास्त्रीय संगीत व भक्तिगीतांचा कार्यक्रम सौ. वेणूताई सभागृहात घेतला जातो. सालाबादप्रमाणे या वर्षी सौ. वेणूताई सभागृहात १ जून २०१८ रोजी सायंकाळी ६ ते ९ सुप्रसिद्ध गायिका सौ. संपदा माने कदम, मुंबई यांचा कार्यक्रम आयोजित केला होता. श्री. ताम्हणकर साहेब यांनी कार्यक्रमाचे सुसंबद्ध आयोजन केले. मा. आमदार श्री. बाळासाहेब पाटील, श्री. नंदकुमार बटाणे, त्याचप्रमाणे मा. आमदारांशी संबंधित अनेक सद्‌गृहस्थ या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.

सौ. वेणूताई यांना कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच श्रद्धांजली वाहण्यात आली. नेहमीप्रमाणे कार्यक्रमास अनेकांनी हजेरी लावली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे आणि सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टचे सर्व कर्मचारी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

मा. डॉ. अशोक गुजर, मा. मुकुंदराव कुलकर्णी, मा. शंकराप्पा ससुद्दी आदी मान्यवर या कार्यक्रमासाठी पूर्णवेळ उपस्थित होते.

सर्वांनी सौ. वेणूताईंच्या स्मृतीस अभिवादन केले.

### स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट २०१८

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री व देशनेते स्व. यशवंतरावजी चव्हाणसाहेब यांचे निवासस्थान 'विरंगुळा' आणि स्व. सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट या दोन्ही संस्थांच्या इमारतीवर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र, कराडच्या सचिवांनी राष्ट्रध्वज फडकविला. या कार्यक्रमाला दोन्ही संस्थांचे सर्व कर्मचारी आवर्जून उपस्थित होते. सचिव मोहनराव डकरे यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले.

सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मधील देशनेते यशवंतराव चव्हाण व स्व. सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्याला सचिव मोहनराव डकरे यांनी पुष्पहार घातले. इतर सर्व कर्मचारी व वाचक विद्यार्थी विद्यार्थिनींनी सुमनांजली वाहिली.

सर्व कर्मचारी तथा वाचक विद्यार्थी-विद्यार्थिनींना स्वातंत्र्यदिनानिमित्त जिलेबी वाटण्यात आली.

सायंकाळी ५.४५ वाजता सलामी देऊन ध्वज उतरविण्यात आले.

### स्व. विठामाता पुण्यतिथी

देशनेते स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या मातोश्री स्व. विठामाता यांच्या पुण्यस्मृतीस अभिवादन करून ती. स्व. विठामातांच्या फोटोस दि.१८ ऑगस्ट २०१८ :श्री. मोहनराव डकरे यांनी पुष्पहार घालून श्रद्धांजली वाहिली. ती. स्व. विठामाता यांच्या काही आठवणी सांगितल्या. ती. स्व. विठामाता यांच्या प्रतिमेला सर्वांनी सुमनांजली वाहिली. श्री. मोहनराव डकरे व स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांचे सर्व कुटुंबीय यांचे पूर्वापार संबंध असल्याने श्रद्धेय वातावरणात स्व. विठामाता पुण्यतिथी 'विरंगुळ्या'त करण्यात आली.

### सन्माननीय शरदचंद्रजी पवार साहेब यांची विरंगुळा भेट

फक्त अर्धा तास आधी पूर्वसूचना देऊन सन्माननीय पवारसाहेब यांनी दि. २१/९/२०१८ विरंगुळ्याला धावती भेट दिली. 'विरंगुळा' पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, कऱ्हाडचे अध्यक्ष मा. आमदार बाळासाहेब पाटील व त्यांचे अनेक सहकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते. सन्माननीय पवारसाहेब यांनी समाधान व्यक्त केले.



विभागीय केंद्र, नाशिक महिलांसाठी आयोजित पॅनकार्ड शिबीर



लेखक श्याम मनोहर यांची मुलाखत घेताना डॉ. चंद्रकांत पाटील व सुनील तांबे



पं. जवाहरलाल नेहरू विशेष व्याख्यानसत्रप्रसंगी मंचावर डावीकडून डॉ. प्रमोद मुनघाटे व प्रा. सुरेश द्वादशीवार मनोगत व्यक्त करताना प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी



श्री. प्रभूजी देशपांडे यांच्या अमृत महोत्सवप्रसंगी मंचावर डावीकडून डॉ. गणेश चव्हाण, डॉ. गिरीश गांधी, आ. ना. गो. गाणार, श्री. प्रभुजी देशपांडे, श्री. निशिकांत काशिकर. मनोगत व्यक्त करताना कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. पंकज चांदे.



विभागीय केंद्र औरगांबादचे अध्यक्ष मा. अंकुशराव कदम यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मा. सुप्रियाताई सुळे सत्कार करताना



परिक्षित सूर्यवंशी लिखित 'वेस्ट पासून बेस्ट' या पुस्तिकेचे प्रकाशन विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. अंकुशराव कदम यांच्या हस्ते करण्यात आले.



विभागीय केंद्र, पुणे आयोजित श्री. जवाहरलाल नेहरु या विषयावरील निबंध स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थिनी



वारकरी मदत केंद्रात चष्मा वाटप करताना पुणे केंद्र सचिव मा. श्री. अंकुश काकडे व इतर कार्यकर्ते



विभागीय केंद्र, अहमदनगर.. शेती कट्टा या उपक्रमा अंतर्गत आयोजित करण्यात आलेले कार्यक्रम



शेतीकट्टा विषय: ‘खरीपातील एकात्मिक पीक व्यवस्थापन’
तज्ज्ञ मार्गदर्शक : श्री. युनुस खान, कृषितज्ज्ञ, अकोला
दि. १८ ऑगस्ट २०१८ रोजी सकाळी ९ वाजता खडकवाडी ता. पारनेर येथे






कायदेविषयक सहाय्य व सल्ला केंद्र आयोजित कार्यशाळा




विभागीय केंद्र, लातूरच्यावतीने महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या निमित्ताने आयोजित व परिसंवादात बोलताना ज्येष्ठ राज्यशास्त्रज्ञ तथा गांधी अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. अशोक चौसाळकर, अध्यक्ष माजी कुलगूरु डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. नागोराव कुंभार, ॲड मनोहर गोमारे व प्रा. श्याम आगळे.




विभागीय केंद्र लातूरच्यावतीने विभागीय केंद्राचे सचिव कै. हरिभाऊ जवळगे यांना श्रद्धांजली वाहताना छायाचित्रात अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील, कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर, ॲड मनोहरराव गोमारे, डॉ. नागोराव कुंभार आदी.





सृजन या उपक्रमा अंतर्गत किनारी व सागरी जय्व विविधता यावर आयोजित कार्यशाळेत उपस्थित विद्यार्थी





महिला व्यासपीठच्यावतीने आयोजित कॅनव्हास पेंटींग आणि फोरम फ्लॉवर या विषयावर आयोजित कार्यशाळा



वंचित बालके आणि समाज परिसंवादाचे उद्घाटन करताना भाई पन्नालाल सुराणा, भालक कोरगावकर , शुभांगी बुआ



अपंग हक्क विकास मंचच्या वतीने नांदेड येथे मोफत श्रवण यंत्र वाटप पुर्व तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते यावेळी उपस्थित मान्यवर



विभागीय केंद्र, सोलापूर - वाहतूक सुरक्षा अभियानात मार्गदर्शन करताना विनय मोरे




अपंग हक्क विकास मंच 'दिव्यांग कट्टा'






नांदेड,यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई स्टार की फाउंडेशन / अमेरिका व मराठवाडा लोकसेवा मंडळ नेरली यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत श्रवण यंत्र वाटप पूर्व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले यावेळी अध्यक्ष सुनिल कदम, समाज कल्याण निरीक्षक मोरे, नितिन निमेल, स्टार की फाउंडेशचे निहीर प्रधान, अंकुश यादव, संकल्प महापात्रा, रवि भंडारी, पियुष मस्के, सुमेध कुमार, संदिप पंडिता, सेथील लक्ष्मेंद्र, सुशेजित पायी, डॉ. मनिषा तिवारी, संजय रुमाले, आदी. छाया करणसिंह बैस



विभागीय केंद्र, अंबाजोगाई यांच्या वतीने आयोजित सिट्टा संवाद कार्यक्रमात उपस्थित मान्यवर



नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या पुर्व संध्येला आयोजित युवा स्वातंत्र्य ज्योत रॅलीत उपस्थित कार्यकर्ते



विभागीय केंद्र, कऱ्हाड विठामाता चव्हाण यांच्या स्मृतीस अभिवादन



विभागीय केंद्र, अंबेजोगाई येथे कर्णबंधीर विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी, पुर्व तपासणी व मोजमाप शिबीर आयोजित करण्यात आले




विज्ञानगंगा आयोजित कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर चर्चासत्र




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि सलाम मुंबई फाउंडेशन यांच्या वतीने तंबाखू मुक्त भारत राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभात मा. सुप्रिया सुळे पुरस्कार प्रदान करताना





यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय यांच्या विद्यमाने महाविद्यालयीन मराठी वाङ्मय मंडळाची (प्रतिनिधी) बैठक दादर येथे पार पडली



''ज्येष्ठ नागरिक गौरवसंध्या'' आयोजित कार्यक्रमाचे छायाचित्र पाहुणे श्री. महेश झगडे, ठाणे केंद्राचे अध्यक्ष श्री. मुरलीधर नाले, उपध्यक्ष श्री. महेश केळुस्कर यांच्यासह सत्कारमूर्ती



शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे छायाचित्र सत्कारमूर्ती समवेत केंद्राचे अध्यक्ष व सचिव





विज्ञानगंगा उपक्रमाअंतर्गत प्रा. अशोक रुपनेर यांचे 'घरगुती टाकाऊ वस्तूतून विज्ञान खेळणी' या विषयावर आयोजित व्याख्यानात उपस्थित विद्यार्थी



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी प्रशिक्षण वर्गातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी



विभागीय केंद्र रत्नागिरी आयोजित सह्याद्री शिक्षण संस्था यांच्या सयुक्त विद्यमाने माध्यमिक महिला विद्यालय पाग चिपळुन येथे शिक्षण दिनाचे आयोजन






(बलुतं)ची चाळीशी या कार्यक्रमात प्रेक्षकांशी संवाद साधताना उपस्थित मान्यवर





शिक्षण विकास मंच आयोजित (संक्तीचे मोफत शिक्षण खरच मोफत आहे का ? या विषयावर आयोजित शिक्षण कट्टा)

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
## शिक्षण विकास मंच



# डॉ. कुमुद बन्सल
# उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार २०१८

## गौरवपत्र

सध्याच्या शिक्षण व्यवस्थेबाबत सर्वत्र मोठ्या प्रमाणावर असमाधान असल्याचे दिसून येते. शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून खऱ्या अर्थाने गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, त्यातून वर्तमानातील आणि भविष्यातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाऊ शकतील असे विद्यार्थी तयार व्हावेत, या दृष्टीने या व्यवस्थेत बदल होण्याची आणि त्या अनुषंगाने एक सर्वंकष राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार होण्याची गरज आहे. १९८६ मध्ये असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झाले. परंतु त्यानंतर झालेले बदल लक्षात घेऊन नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अजूनही जाहीर झाले नाही. श्री. सूर्यकांत कुलकर्णी यांनी गेल्या चाळीस वर्षांत शिक्षण व्यवस्थेचे निरीक्षण करून, त्यातील नेमके दोष हेरून, विविध पैलूंचा अभ्यास करून, त्यावर सखोल विचार करून या पुस्तकात उपाययोजना सुचवल्या आहेत. या सूचना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरवताना निश्चितच उपयोगी ठरतील.

उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ निवड समितीने एकमताने घेतलेल्या निर्णयानुसार आज रविवार, दिनांक २५ नोव्हेंबर, २०१८ रोजी राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेत ग्रंथाली प्रकाशन, मुंबई यांनी प्रकाशित केलेल्या 'सल शिक्षणाचा' या पुस्तकाचे लेखक सूर्यकांत कुलकर्णी यांना २०१८चा डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.

| बसंती रॉय | डॉ. वसंत काळपांडे | सुप्रिया सुळे |
| --- | --- | --- |
| निमंत्रक, उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार निवड समिती | मुख्य संयोजक शिक्षण विकास मंच | निमंत्रक शिक्षण विकास मंच |

# विभागीय केंद्र, पुणे

## कार्यवृत्त

### वारकरी अल्पोपाहार कार्यक्रम

दरवर्षीप्रमाणे वारकऱ्यांसाठी अल्पोपाहार, चष्मे व गॉगल वाटप याचा कार्यक्रम प्रतिष्ठान व रंगीलदास सुरतवाला ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ८ जुलै २०१८ रोजी पहाटे ५ वाजल्यापासून दुपारपर्यंत घेण्यात आला. स्थळ तिरंगा भवन, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर परिसर, बुधवार पेठ, पुणे हे होते. या कार्यक्रमासाठी संयोजक म्हणून मा. अजित निंबाळकर, मा. शांतीलाल सुरतवाला, मा. अंकुश काकडे यांनी काम पाहिले. मा. सुरतवाला यांचे कार्यकर्ते जगमोहन सुरतवाला, प्रल्हाद तापकीर, सुनिल खताळ, शशिकांत सिन्नरकर, जाधव मामा, रुकूभाई शेख, राकेश कळमाणी, राजा परदेशी इत्यादी अनेक कार्यकर्त्यांनी सक्रीय सहभाग घेतला.

### कृषी व सहकार व्यासपीठ १ जून २०१८ ते १९-१०-२०१८ सहकार कायद्यात गृहनिर्माण संस्थांसाठी स्वतंत्र प्रकरण

सहकार कायद्यामध्ये गृहनिर्माण सहकारी संस्थांसाठी स्वतंत्र प्रकरण असावे व त्यासाठी स्वतंत्र प्राधिकरणही असावे, जेणेकरून सहकार खात्यांतील सेवकांचा गृहनिर्माण संस्थांसाठी मोठ्या प्रमाणात खर्च होणारा वेळ कृषी पतसंस्था व अन्य दुर्बलांच्या सहकारी संस्था, बिगर कृषी पतपेढ्या, नागरी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका इत्यादींसाठी उपलब्ध होऊन त्यांचे कामकाजात सुधारणा करता येईल, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने श्री. देशमुख, सहनिबंधक (झोपडपट्टी निर्मूलन) यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीला दिल्ली व अन्य राज्यांतील स्वतंत्र प्रकरणातील तरतुदी व अन्य दुरुस्त्यांवर चर्चा करून सहकार व्यासपीठाच्या शिफारशी सादर केल्या होत्या. या समितीच्या शिफारशींमध्ये त्याचा विचार झाला व काही शिफारशी (उदा. निवडणूक संबंधाने) मान्य झाल्या. समितीच्या शिफारशी शासनस्तरावर तपासून त्याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय झाला. परंतु पुण्यामध्ये येऊ घातलेल्या दुरुस्त्यांवर चर्चा होऊन आमदार सौ. मेधा कुलकर्णी यांनी आयोजित केलेल्या सभेत मा. सहकारमंत्री महोदयांनी त्यावर पुनर्विचार करण्याचे आश्वासन दिले.

### ‘सहकारी संस्था थकबाकी’ व ‘गृहनिर्माण संस्था पुनर्विकास’ यावर चर्चासत्र

दिनांक २५ जुलै २०१८ रोजी ‘यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान’ आणि ‘पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ मर्यादित’ यांचे संयुक्त विद्यमाने वरील दोन विषयांवर विशाल सह्याद्री सभागृहामध्ये चर्चासत्राचे आयोजन केले गेले. चर्चासत्रासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने हजर होते. श्री. पटवर्धन, पर्यटन अध्यक्ष, पुणे जिल्हा गृहनिर्माण सहकारी संस्था महासंघ, यांनी प्रास्ताविक केले. वकील श्री. शंतनु खुर्जेकर यांनी सहकार कायदा कलम १०१ खालील वसुलीबाबत विवेचन करून सहकारी कोर्टाकडून वसुली दाखवल्यावर स्टे दिला जातो याबाबतच्या अडचणींचे निवेदन केले. श्री. दिग्विजय राठोड, उपनिबंधक, सहकारी संस्था, यांनी सहकारी संस्था सभासदांच्या प्रशिक्षणाचे महत्त्व विशद केले. उपनिबंधक राठोड यांनी वेळच्यावेळी हिशेब तयार असणे व वेळीच वैधानिक लेखापरीक्षण होणे याची आवश्यकता विशद केली. श्री. शं. त्रिं. भिडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात ९७ व्या घटनादुरुस्तीनंतर सहकार कायदा कलम १०१ मध्ये झालेल्या गृहनिर्माण संस्था मेंटेनन्स चार्जेस वसुलीबाबतची पार्श्वभूमी विशद करून ‘सदर कायद्यात गृहनिर्माण सहकारी संस्था मूळ तरतुदीऐवजी दुरुस्ती सुचविली होती; पण चुकीने मूळ तरतूद कायद्यात तशीच राहिली व दुरुस्तीचाही अंतर्भाव झाला. त्यामुळे दुरुस्तीबाबत काही प्रमाणात गैरसमज आहेत’ असे विशद केले. ‘कलम १०१ खालील कारवाईला सहकारी कोर्टाचा स्टे’ याबाबत बोलताना, हा प्रश्न अनेक दशकांचा जुनाच आहे. सहकारी कोर्टांना कलम १०१ बाबत स्टेचे अधिकार नसले तरी काही वेळा नैसर्गिक न्यायाचा आाधार घेऊन सहकारी कोर्ट कलम १०१ मधील प्रकरणी हस्तक्षेप करताना दिसते, हे स्पष्ट केले. गृहनिर्माण संस्था पुनर्विकासाबाबत शासनाने काढलेल्या कलम ७९ ए खालील आदेश संस्थांनी तंतोतंत पाळण्याची आवश्यकता विशद केली. त्यामुळे पुनर्विकासातील अडचणी कमी होण्यास मदत होईल. महासंघाच्या मनिषा कोष्टी यांनी आभारप्रदर्शन केल्यावर चर्चासत्राचा समारोप झाला.

**सहकारी गृहनिर्माण संस्था पुनर्विकास**
**आर्किटेक्ट्स, वकील, चार्टर्ड अकौंटंट्स व सहकारी पॅनेल ऑडिटर्स यांची सभा.**

दिनांक २७ सप्टेंबर २०१८ रोजी 'सहकारी गृहनिर्माण संस्था पुनर्विकास' या विषयावर हॉटेल मॅनेजमेंट कॉलेज हॉल, भारती विद्याभवन हॉल, सेनापती बापट रस्ता, पुणे या ठिकाणी पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघातर्फे आयोजित सभेत मार्गदर्शनासाठी कृषी व सहकार व्यासपीठाचे संयोजक श्री. भिडे यांना निमंत्रित करण्यात आले होते. मात्र त्या दिवशी त्याचवेळी कृषी व सहकार व्यासपीठाची सभा असल्याने प्रतिष्ठानतर्फेसर्वश्री वर्तक वकील तसेच श्री. धरणीधर पाटील यांनी या सभेस हजर राहून मार्गदर्शन केले.

**सहकारी गृहनिर्माण संस्था अडचणी कार्यशाळा**

'महाराष्ट्र सहकारी परिषद', 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान' व 'पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ' यांच्या संयुक्त विद्यमाने मनोहर मंगल कार्यालय, मेहेंदळे गॅरेज, पुणे या ठिकाणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी मा. शेखर चरेगांवकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद, होते. मुंबईहून म्हाडाचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर प्रभू यांना 'गृहनिर्माण संस्थांच्या पुनवर्सनातील अडचणी' व 'संस्थांनी स्वबळावर पुनर्वसन कार्यक्रम पार पाडण्यासाठी घ्यावयाची काळजी' यावर विवेचन करण्यासाठी खास आमंत्रित करण्यात आले होते. अन्य वक्त्यांबरोबर प्रतिष्ठानचे कृषी व सहकार व्यासपीठाचे संयोजक श्री. भिडे व धरणीधर पाटील यांनीही सभेस मार्गदर्शन केले.

**नागरी सहकारी बँकांसाठी व्यवस्थापन मंडळ**

भारतीय रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांमध्ये सध्याच्या संचालक मंडळाव्यतिरिक्त नेहमीच्या कारभारावर नीट लक्ष ठेवण्यासाठी व्यवस्थापक मंडळ असावे व त्यामध्ये संचालक मंडळ सदस्यांव्यतिरिक्त अन्य तज्ज्ञ असावेत असा फतवा काढून त्यावरील अभिप्राय नागरी बँकांकडून मागविले होते. त्यावर कृषी व सहकार व्यासपीठ सभेत दिनांक २१ जुलै २०१८ रोजी सविस्तर चर्चा करण्यात आली. व्यासपीठाच्या या विषयावरील शिफारशी रिझर्व्ह बँकेचे मुख्य अधिकारी (नागरी सहकारी बँक नियमन विभाग) यांना दिनांक २३ जुलै २०१८ रोजी सादर करण्यात आल्या.

**पब्लिक प्रॉव्हीडंट फंड रूल्स**

दिनांक २६ मार्च २०१८ रोजी वरील विषयावर नियमांमध्ये कशा प्रकारची दुरुस्ती हवी यासंबंधी मा. ना. अर्थमंत्री, केंद्र शासन यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानंतर १६ जून २०१८ च्या पत्रास उत्तर न आल्याने या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात आला असता केंद्रीय अर्थ मंत्रालयाचे सीनिअर रीजनल डायरेक्टर श्री. पद्मसिंग यांनी त्यांचे पत्र क्र. ३-१-२०१८ एन. एस. दिनांक २० ऑगस्ट २०१८ अन्वये आपल्या सूचनांची पुढील कार्यवाहीसाठी नोंद घेण्यात आली आहे, असे कळविले आहे.

**सहकारी संस्थांबाबत प्रस्ताव.**

सहकारी संस्था व्यवस्थापक समिती रिक्त पदे भरण्याबाबत मा. अपर मुख्य सचिव (सहकार), महाराष्ट्र शासन, यांना अंकुशराव काकडे यांच्या सहीने दिनांक २० जुलै २०१८ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. दिनांक २८ मे २०१८ रोजी मा. मंत्रिमहोदय, सहकार, ना. श्री. सुभाषजी देशमुख यांना सहकार कायदा दुरुस्तीबाबत प्रस्ताव सादर केला होता.

मागासवर्गीय व महिला सभासद नसलेल्या संस्थांमधील आरक्षणाबाबत मा. डॉ. झाडे, सहकार आयुक्त यांना दिनांक २०-०५-२०१८ च्या पत्राने काही सूचना केल्या होत्या.

डॉ. सोपान शिंदे, उपनिबंधक, कायदा यांनी या प्रस्तावांमधील सूचनांबाबत शासनास अनुकूल अभिप्राय सादर करून शासनाचे निर्देश मागविल्याचे त्यांचेकडील पत्र क्र. ४ सभाकायदा/ रिक्त पदे/ श्री. काकड/ २०१८/ ६२५ दिनांक २० जुलै अन्वये कळविले आहे. त्याचप्रमाणे मा. ना. मंत्रिमहोदय यांना सादर केलेला कायदा दुरुस्ती प्रस्ताव संबंधित कार्यासनांना पाठविण्यात आला असून मा. शेखर चरेगांवकर, अध्यक्ष, सहकार परिषद समिती, यांचा अहवाल प्राप्त झाल्यावर आपल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करणे शक्य होईल असे पत्र क्र. ४ सआ कायदा/ कायदा दुरुस्ती आढावा/ श्री. काकडे २०१८/ दिनांक २० जुलै २०१८ व श्री. सोपान शिंदे, उपनिबंधक (कायदा) यांनी कळविले आहे.

**कृषी व सहकार व्यासपीठ**

**व्यासपीठाच्या सभा**

दि. ३० जून २०१८ रोजी 'शेतीचे इंटेलिजंट भविष्य'
**वक्ते :** श्री. सम्राट फडणीस, निवासी संपादक, दैनिक सकाळ, पुणे

दि. २०-०६-२०१८ रोजी 'मधुमक्षिका पालन'
**वक्ते :** प्रशांत सावंत.

दि. ३१-०७-२०१८ रोजी 'स्वावलंबी डिजिटल आदर्श गाव'
**वक्ते :** एक्झीक्यूटीव्ह इंजिनिअर (निवृत्त) पाटबंधारे व राजेंद्रसिंह यांचे सहकारी कार्यकर्ता श्री. बांदेकर

दि. ०३-०८-२०१८ रोजी 'पेट्रोलियम पदार्थ (नॅप्था)'
**वक्ते :** इंजिनिअर बी. एच. श्रीकांत

दि. २५-०९-२०१८ : 'शासन निर्णयानुसार नियोजित अध्यादेश (सहकारी गृहनिर्माण संस्था स्वतंत्र प्रकरण) त्रुटी/ सूचना'
**वक्ते :** श्री. शं. त्रिं. भिडे



लालबहादूर शास्त्रीजींसोबत.... (१९६६)

# विभागीय केंद्र, नागपूर

## कार्यवृत्त

**१ जून २०१८ ते १० ऑक्टोबर, २०१८**

शिवराज्याभिषेक दिनाच्या पावन पर्वावर ६ जून, २०१८ रोजी विदर्भ गौरव प्रतिष्ठान, नागपूर व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सायंटिफिक सभागृह, आठरस्ता चौक, लक्ष्मीनगर, नागपूर येथे रणशिंग, नागपूर निर्मित 'सह्याद्रीतील सात रत्ने' या दृक-श्राव्य आविष्काराचे आयोजन करण्यात आले. संस्कारभारती, नागपूरच्या अध्यक्षा मा. सौ. कांचनताई गडकरी या प्रमुख अतिथी म्हणून तर विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. दत्ताभाऊ मेघे अध्यक्षस्थानी उपस्थित होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची संकल्पना व प्रस्तुती प्रफुल माटेगांवकर यांची तर संगीत शैलेश दाणी यांचे व पोवाडे डॉ. धनंजय मोडक यांचे होते.

**सभेचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने शुक्रवार ८ जून, २०१८ रोजी वनराई फाऊंडेशन कार्यालय, यश कॉम्प्लेक्स, बुलेट मोटरसायकल शोरूमच्या वर, भरतनगर चौक, रविनगर, नागपूर येथे सभेचे आयोजन करण्यात आले. सभेच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी होते.

**गीतकार शांता शेळके यांच्या भावस्पर्शी भावगीतांचा नजराणा**

निरागस आणि सोज्वळ चेहऱ्याच्या शांताबाई शेळके म्हणजे अमूर्त भावकाव्यच! त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या काव्य अन् चित्रपटगीतांची मैफल शनिवार ९ जून, २०१८ रोजी सायं. ६ वाजता विदर्भ गौरव प्रतिष्ठान, नागपूर व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सायंटिफिक सभागृह, आठरस्ता चौक, लक्ष्मीनगर, नागपूर येथे आयोजित करण्यात आली. याप्रसंगी त्यांच्या चित्रपट गीतांवर अप्रतिम नृत्याविष्कारही सादर करण्यात आला. कार्यक्रमाची संकल्पना व संहिता लेखन रेखा दंडिगे-घिया यांचे होते. नृत्यदिग्दर्शक प्रियंका अभ्यंकर यांचे होते.

विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. दत्ताभाऊ मेघे अध्यक्षस्थानी होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

**यशवंत महोत्सव**

देशाचे माजी उपपंतप्रधान व संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राला विकास आणि सांस्कृतिक दृष्ट्या घडविले. त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने बुधवार ४ जुलै ते गुरुवार १२ जुलै २०१८ पर्यंत 'यशवंत महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले.

या महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्रातील ज्येष्ठ संपादक, उत्तम वक्ते, लेखक व विचारवंत मा. श्री. सुरेश द्वादशीवार यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे विश्वस्त व महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष मा. श्री. दिलीप वळसे-पाटील होते.

शुक्रवार ६ जुलै २०१८ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे सायं. ५.३० वाजता 'अभिव्यक्ती : जी.ए. कुळकर्णींची कथा' या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. श्री. अजित दिवाडकर व श्री. दिनकर बेडेकर यांचे सादरीकरण होते.

शनिवार ७ जुलै २०१८ रोजी सुरेश भट सभागृह, रेशीमबाग, नागपूर येथे सायं. ५.३० वाजता पावसाची हिंदी गाणी 'सावन के झूले पडे' या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. श्री. सचिन ढोमणे व महेंद्र ढोले यांनी संगीत संयोजन व नागपुरातील प्रथितयश कलावंतांनी सादरीकरण केले.

रविवार ८ जुलै २०१८ रोजी श्री. साई सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे सायंकाळी ६ वाजता पावसाच्या मराठी गीतांचा कार्यक्रम 'श्रावणसरी'चे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी

तसेच प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार मा. श्री. दत्ताभाऊ मेघे उपस्थित होते.

सोमवार, ९ जुलै २०१८ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे सायं. ५.३० वाजता 'युवा आमदारांचा युवकांशी संवाद' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी 'कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स'चे कुलपती मा. डॉ. वेदप्रकाश मिश्रा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. मा. आ. डॉ. आशिष देशमुख, मा. आ. प्रणिती शिंदे, मा. आ. यशोमती ठाकूर, मा. आ. प्रशांत बंब, मा. आ. श्री. बाळू धानोरकर, मा. आ. श्री. राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील यांची उपस्थिती होती.

मंगळवार, १० जुलै २०१८ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे सायं. ५.३० वाजता 'दलित पँथरचा उत्तरार्ध' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी, साहित्यिक व विचारवंत मा. डॉ. यशवंत मनोहर होते. याप्रसंगी मा. डॉ. प्रकाश खरात, मा. डॉ. प्रदीप आगलावे, मा. तक्षशीला वाघधरे, मा. रश्मी सोवनी हे सहभागी झाले.

बुधवार, ११ जुलै २०१८ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे सायं. ५.३० वाजता 'मैफिल-ए-मुशायरा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार मा. श्री. दत्ताभाऊ मेघे होते. कार्यक्रमाचे सादरकर्ते ज्येष्ठ संपादक मा. श्री. बाळ कुळकर्णी होते.

**डॉ. सुलभा हेर्लेकर स्मृती पुरस्कार वितरण सोहळा**

शनिवार, ४ ऑगस्ट २०१८ रोजी विदर्भातील ज्येष्ठ कवयित्री डॉ. सुलभा हेर्लेकर यांच्या कविता मराठी काव्यक्षेत्रात स्वतःचे अढळ स्थान राखून आहेत. त्यांनी नव्या दमाच्या अनेक कवींना प्रोत्साहन देऊन घडविले. म्हणूनच त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने एका नवोदित कवीला दरवर्षी 'डॉ. सुलभा हेर्लेकर स्मृती पुरस्कार' देऊन गौरविण्यात येते. या वर्षीचा पुरस्कार रामटेकचे नवोदित कवी प्रा. डॉ. गिरीश नारायणराव सपाटे यांना देऊन गौरविण्यात आले.

हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, ४ ऑगस्ट २०१८ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे सुप्रसिद्ध कथाकार मा. श्रीमती आशाताई बगे यांच्या शुभहस्ते व सुप्रसिद्ध शेफ व कवी मा. श्री. विष्णू मनोहर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून पद्मगंधा प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मा. श्रीमती शुभांगीताई भडभडे होत्या.

**सभेचे आयोजन**

शुक्रवार, २४ ऑगस्ट २०१८ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या कार्यकारिणीची सभा दुपारी ३ वाजता वनराई फाऊंडेशन कार्यालय, यश कॉम्प्लेक्स, भरतनगर चौक, अमरावती रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी होते.

**श्री. प्रभूजी देशपांडे अमृत महोत्सव सोहळा - शुक्रवार**

नागपूर शहरातील सामाजिक, सांस्कृतिक व विशेष करून शिक्षण क्षेत्रात ज्यांनी मोठे योगदान दिले अशा मा. श्री. प्रभूजी देशपांडे यांनी नुकतेच ७५ व्या वर्षात पदार्पण केले. यानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने शुक्रवार, २४ ऑगस्ट २०१८ रोजी सायं. ५ वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे त्यांच्या अमृत महोत्सवी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

हा सत्कार सोहळा 'कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, कराड'चे कुलपती मा. डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या शुभहस्ते व कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरु मा. डॉ. पंकज चांदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

**पुस्तक प्रकाशन सोहळा**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व आंबेडकरी साहित्य प्रबोधिनी, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार २५ ऑगस्ट २०१८ रोजी सायं. ५ वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे लोकनाथ यशवंत यांच्या कवितांचा डॉ. के. जमनादास आणि योगेश मैत्र यांनी केलेला इंग्रजी अनुवाद 'Broken man in search of homeland' च्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

हा प्रकाशन सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ

औरंगाबादचे इंग्रजी विभागप्रमुख मा. डॉ. उत्तम अंभोरे, वर्धा येथील आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापिठाचे मा. प्रा. संदीप सपकाळ यांच्या शुभहस्ते व कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरू मा. डॉ. पंकज चांदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

**गोष्ट एका लग्नाची (धम्माल विनोदी)**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने व फ्री बर्ड प्रॉडक्शन्स, नागपूर निर्मित लेखक-दिग्दर्शक सारंग मास्टे यांच्या 'गोष्ट एका लग्नाची' या सुवर्ण महोत्सवी धम्माल विनोदी नाटकाचे बुधवार, ५ सप्टेंबर २०१८ रोजी सायं. ६.३० वाजता सायंटिफिक सभागृह लक्ष्मीनगर, नागपूर येथे आयोजन करण्यात आले.

या नाटकाचे अवघ्या तीन वर्षांमध्ये व्यावसायिक स्तरावर ४९ यशस्वी प्रयोग झाले असून कुठल्याही वयोगटातील प्रेक्षकवर्ग बघू शकेल असा १ तास २५ मिनिटांचा हा दीर्घांक आहे. यात सतीश ठेंगडी, कल्याणी गोखले, अनिकेत मुनशी, गौरव खोंड, वैष्णवी वखरे हे कलावंत असून संगीत-अभय पांडे, नेपथ्य-स्वप्नील बोहाटे, प्रकाशयोजना-ऋषभ धापोडकर यांचाही सहभाग आहे.

**पं. जवाहरलाल नेहरू विशेष दोन दिवसीय व्याख्यान सत्र**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने सुप्रसिद्ध विचारवंत, कादंबरीकार, राज्यशास्त्राचे अभ्यासक व ज्येष्ठ संपादक मा. प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या दोन व्याख्यानांचे सत्र आयोजित करण्यात आले. 'स्वातंत्र्यसेनानी जवाहरलाल नेहरू' व 'पंतप्रधान जवाहरलाल नेहरू' या दोन दिवसीय व्याख्यानसत्राचे अध्यक्षस्थान यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांनी भूषविले. शुक्रवार, २१ सप्टेंबर २०१८ रोजी 'स्वातंत्र्यसेनानी जवाहरलाल नेहरू' या विषयावर व शनिवार २२ सप्टेंबर, २०१८ रोजी 'पंतप्रधान जवाहरलाल नेहरू' या विषयावर दोन दिवसीय व्याख्यानसत्राचे आयोजन श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

**सभेचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर यांच्यावतीने शनिवार, ८ ऑक्टोबर २०१८रोजी दु. ४ वाजता वनराई फाऊंडेशन कार्यालय, यश कॉम्प्लेक्स, दुसरा मजला, भरतनगर चौक, अमरावती रोड, नागपूर - येथे सभा आयोजित करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी होते.

**अमृत महोत्सव व पुस्तक प्रकाशन समारंभ**

मा. डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी ११ ऑक्टोबर २०१८ रोजी वयाच्या ७५ व्या वर्षात पदार्पण केलं. त्यानिमित्ताने त्यांचा सत्कार सोहळा मंगळवार ९ ऑक्टोबर, २०१८ रोजी सायं ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला. हा सत्कार सोहळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

याप्रसंगी या क्षेत्रात ज्यांचे अमूल्य योगदान आहे ते प्रसिद्ध कवी व लेखक श्री. हिरामण लांजे यांच्या 'मराठी नाट्यसृष्टी' या अभ्यासपूर्ण पुस्तकाचा प्रकाशन समारंभ कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरू मा. डॉ. पंकज चांदे यांच्या शुभहस्ते झाला. याप्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष मा. श्री. नरेश गडेकर उपस्थित होते. या दोन्ही कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष व प्रसिद्ध कवी मा. डॉ. राजन जयस्वाल होते.

# विभागीय केंद्र, नाशिक

## कार्यवृत्त

**चित्रपट चावडी : 'ब्युटीफुल'**
**शनिवार ०२ जून २०१८**

विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को-ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत शनिवार ०२ जून २०१८ रोजी सायंकाळी ६.३० वाजता सुप्रसिद्ध मेक्सिकन सिनेदिग्दर्शक अलेक्झांडर इनारीतु यांचा 'ब्युटीफुल' हा चित्रपट दाखविण्यात आला. 'ब्युटीफुल' सिनेमाचे कथानक बार्सिलोना (स्पेन) मध्ये घडते. कॅन्सरशी झगडणारा नायक अवैध मानवी व्यापारात गुंतलेला आहे. आफ्रिकेतून स्पेनमध्ये येणाऱ्या लोकांसाठी तो काम करतो. ही माणसे अमली पदार्थांच्या व्यवहारात असतात. एकंदरीत सुंदर, रम्य म्हणावे असे या चित्रपटात काहीच नाही. नायकाची वैयक्तिक तसेच आफ्रिकेतून मोठ्या प्रमाणावर युरोपमध्ये येऊ पाहणाऱ्यांची शोकांतिका तथाकथित सुंदर बार्सिलोनाच्या पार्श्वभूमीवर चितारली आहे. मेक्सिको येथे २०१० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'ब्युटीफुल' या सिनेमाचा कालावधी १४८ मिनिटांचा होता.

**पॅन कार्ड शिबिर**
**सोमवार, ४ जून २०१८**

पॅन कार्ड शिबिर या अभियानाअंतर्गत समाजाच्या तळागाळातील लोकांना आर्थिक विकास व त्याचे महत्त्व पटवून देण्याच्या हेतूने बँकेशी संबंधित मूलभूत बाबी जसे बँकेत खाते उघडणे, त्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची जमवाजमव, बचत गट सुरू करणे, त्याचे खाते उघडणे, त्यासाठी लागणारे पॅन कार्ड काढणे, आधार कार्ड आदींचे महत्त्व यांवर भर देण्यात आला. या अभियानाअंतर्गत जो सर्व्हे करण्यात आला, त्यानुसार ५५ वसाहतींमध्ये जवळपास १७०० महिला, पुरुष, युवा वर्ग यांच्याकडे बँकेत खाते उघडण्यासाठी पॅन कार्ड उपलब्ध नव्हते. काही लोकांना पॅन कार्ड म्हणजे काय हेही माहिती नव्हते. ज्या लोकांना पॅन कार्ड काढायचे आहे, त्यातील काही महिला व युवा यांचा जन्माचा पुरावाच नाही असे लक्षात आले. काही लोकांना आधार कार्ड मध्ये दुरुस्ती करून मग पॅन कार्ड काढायचे होते. अशा प्रकारे सविस्तर सर्व्हे करण्यात आला. या सर्व्हे च्या आधारावर विश्वास आर्थिक साक्षरता अभियान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र, नाशिक, विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने ५५ वसाहतींमध्ये जून ते ऑगस्ट २०१८ या कालावधीत 'पॅनकार्ड कॅम्प' घेण्यात आला.

या कॅम्पच्या माध्यमातून पॅन कार्ड काढून देण्यात आले. वसाहतींमधील इच्छुक लहान मुले, महिला, युवा व पुरुष यांना नवीन आधार कार्ड बनवण्याची गरज होती. काही लोकांना आपल्या जुन्या आधार कार्डमध्ये दुरुस्ती करून मग त्यांचे पॅन कार्डचे फॉर्म भरायचे होते. आर्थिक साक्षरता व त्याचे महत्त्व मुख्यत्वे वसाहतीच्या पातळीवरील राहणाऱ्या महिलांना व इतर युवा वर्गाला कळावे हा हे अभियान राबविण्याचा उद्देश होता.

बँकेत खाते उघडण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती दिली व पॅन कार्डचे महत्त्व लोकांना समजावून सांगितले.

पॅन कार्ड काढण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता व त्यांच्याकडे असणाऱ्या कागदपत्रांची तपासणी केली व पॅन कार्डचे फॉर्म भरून दिले.

वस्ती पातळीवरील महिलांना तसेच युवा व पुरुष, ज्यांना पॅन कार्ड काढायचे आहे, मात्र आधार कार्डवर पूर्ण जन्मतारीख नाही, नांवात चूक आहे, अशा लोकांची सविस्तर माहिती घेतली.

आधार कार्डवर दुरुस्ती करण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती दिली.

**पर्यावरण संवर्धन आणि मानवी अस्तित्व यांचा समन्वय साधणे गरजेचे**
**– श्रीराम डाल्टन**
**शनिवार ०९ जून, २०१८**

जल–जंगल–जमीन यावर पृथ्वीतलावरील मानव जातीचा हक्क आहे. पण ते जपण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. खेडे आणि महानगर यातील दरी दिवसेंदिवस रुंदावते आहे आणि त्यातून अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. भौगोलिक परिस्थितीचा ऱ्हास होणे म्हणजे मानवी अस्तित्वावर आक्रमण होणे होय, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक श्रीराम डाल्टन यांनी केले. 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत 'पर्यावरण संवर्धन' या विषयावर लघुपट दाखविण्यात आले. त्याप्रसंगी संवाद साधताना श्रीराम डाल्टन बोलत होते. ते म्हणाले, की जमिनीतील पाण्याची पातळी कमी होत असून त्यासाठी झाडे लावण्याची गरज आहे. तसेच प्लास्टिक मुक्ती, कचरा व्यवस्थापनाचेही समाजात प्रबोधन होणे आवश्यक आहे. १५ मे २०१८ पासून श्रीराम डाल्टन यांनी महाप्रकृतीपर्व या अभिनव पदयात्रेची सुरुवात केली असून मुंबई ते झारखंड असा प्रवास ते करत आहेत. भारतातील सुमारे सात राज्यात ही पदयात्रा जाणार असून प्रत्येक ठिकाणी लघुपट दाखवण्यात येतील. 'लोटापाणी', 'दुपट्टा', 'धुमकुडियाँ', 'द लॉस्ट बहुरूपिया' या लघुपटांबरोबरच 'स्प्रिंग थंडर' या चित्रपटाचा ट्रेलरही इथे दाखवण्यात आला. पाणीप्रश्न, पर्यावरण या माध्यमातून जनप्रबोधन केले जात आहे. या लघुपटातून 'पर्यावरण संतुलन आणि मानवाचे अस्तित्व' यांवर प्रभावी भाष्य केले गेले.

**चित्रपट चावडी : 'नाईन क्वीन्स'**
**शनिवार १६ जून २०१८**

'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत अर्जेंटिनाचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक फेबियन बेलिन्स्की यांचा 'नाईन क्वीन्स' हा चित्रपट दाखविण्यात आला. दक्षिण अमेरिकेचा किंवा लॅटीन अमेरिकेचा सिनेमा खूप समृद्ध आहे. क्युबा, ब्राझील, चिली, अर्जेंटिना, कोलंबिया व मध्य अमेरिकेतील ग्वाटेमाला व इतर देशांमधील सिनेमा विशेष उल्लेखनीय आहे. फेबियन बेलिन्स्की यांचा 'नाईन क्वीन्स' हा चित्रपट म्हणजे लोकांना गंडा घालणाऱ्या एका ठकसेनाची गोष्ट आहे. ब्युनॉस आयर्स या महानगरातील ही एका दिवसाची गोष्ट आहे. आपला चित्रपट नायक फसविण्यासाठी काय काय क्लृप्त्या करतो, सापळे रचतो यांची मालिकाच या चित्रपटात आहे. यात अर्जेंटिनामध्ये राजकीय नेत्यांच्या नाकर्तेपणामुळे जे आर्थिक संकट आले होते, त्यावर खुसखुशीत भाष्य आहे. सन २००० मध्ये अर्जेंटिना येथे प्रदर्शित झालेल्या या सिनेमाचा कालावधी ११४ मिनिटांचा आहे.

**योगसाधनेतून मन चैतन्यमय होते : योगप्रशिक्षक रेवती नरवाडे**
**शुक्रवार २२ जून २०१८**

मनाला चैतन्यमय ठेवणाऱ्या व शारीरिक स्वास्थ्य उत्तम राखणाऱ्या 'योगसाधने'ला जीवनशैलीचा भाग बनवण्यासाठी प्रत्येकाने पुढे यावे. आजच्या 'धावपळीच्या व ताणतणावाच्या आयुष्यात योग जीवनात आनंद निर्माण करतो व मानसिक ऊर्जा प्राप्त करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतो असे प्रतिपादन योगप्रशिक्षक रेवती नरवाडे यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–विभागीय केंद्र, नाशिक व विश्वास को–ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ, निसर्गोपचार केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनानिमित्त सामूहिक योगाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाची संकल्पना विश्वास जयदेव ठाकूर यांची होती. रेवती नरवाडे म्हणाल्या, की विचारांना, मेंदूला कायमच सजग ठेवण्यासाठी योग महत्त्वाचा आहे. त्यातून मन प्रफुल्लित राहते व सकारात्मक विचार निर्माण होण्यास मदत होते. ओमकाराची साधना आणि प्राणायामातून शरीराला ऊर्जा प्राप्त होत असते, त्यातून मनोबलही वाढते. निरामय व निरोगी जीवनाचा योगा हा प्रभावी मंत्र आहे. योगसाधना ही शारीरिक, मानसिक स्थैर्य देणारी शक्ती आहे. प्राणायामातून श्वासावर नियंत्रण तर मिळवता येतेच; त्याचबरोबर एकाग्रता, चिंतनाची शक्ती विकसित होते. यावेळी त्यांनी विविध आसने उपस्थितांकडून करून घेतली आणि आसनांची अभ्यासपूर्ण माहिती दिली. या सामूहिक योगसाधनेसाठी मोठ्या प्रमाणावर साधक उपस्थित होते.

**चित्रपट चावडी : 'सी यु इन माँटेव्हिडीओ'**
**शनिवार ०७ जुलै २०१८**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक ड्रॅगन जेलो ग्रिलीच यांचा 'सी यु इन माँटेव्हिडीओ.' हा चित्रपट दाखविण्यात आला. सध्या २०१८ जागतिक फुटबॉल वर्ल्डकपची जोरदार हवा आहे. त्यानिमित्ताने युरोपियन चित्रपट असला तरी कथानक माँटेव्हीडीओ, उरुग्वे, दक्षिण अमेरिका येथे घडते. युगोस्लाव्हियाची फुटबॉल टीम

१९३० साली पहिली जागतिक फुटबॉल स्पर्धा खेळण्यासाठी पात्र होती व मॉँटेव्हीडीओत दाखल होती. पण, मॅचेसच्या आधी व नंतर बऱ्याच गमतीदार नाट्यमय घडामोडी होतात व त्यातून खेळ व मनोरंजन असा एक आनंद रसिकांना मिळतो. सन २०१४ मध्ये प्रदर्शित झालेल्या या सिनेमाचा कालावधी १४१ मिनिटांचा होता.

**वाहतूक सुरक्षा अभियान**
**गुरुवार ९ ऑगस्ट २०१८**

नाशिकमधील रस्ते वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. वाहनचालकांकडून होणारे नियमांचे उल्लंघन, बेशिस्तपणा हे यामागचे कारण आहे. रस्ते वाहतुकीमध्ये होणारे अपघात हाही एक प्रश्न यानिमित्ताने समोर आला आहे. हे अपघात कमी होण्यासाठी वाहनचालकाने काळजी घेण्याबरोबरच वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. त्यामुळे निश्चितच अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. वाहतूक सुरक्षा व हेल्मेट सक्तीविषयी जनप्रबोधन व्हावे या उद्देशाने विश्वास को–ऑप. बँक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–विभागीय केंद्र नाशिक व विश्वास ज्ञानप्रबोधिनी अ‍ॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांचे संयुक्त विद्यमाने काठे गल्ली, नाशिक येथे विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 'नाशिक फर्स्ट' या संस्थेतर्फे वाहतूक सुरक्षेविषयक प्रबोधन करण्यासाठी २४ सन्माननीय व्यक्तींमध्ये DON (Dost of Nashik) म्हणून विश्वास ठाकूर यांची निवड करण्यात आली होती. त्या माध्यमातून वाहतूक सुरक्षेविषयी ते अनेक उपक्रम राबवत असतात. काठेगल्ली सिग्नल, द्वारका येथे केरळ महिला विकास समितीतर्फे राबविण्यात येणाऱ्या 'हेल्मेट सक्ती'विषयीच्या उपक्रमाला १०० दिवस पूर्ण झाल्याचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी केरळ महिला विकास समितीच्या श्रीमती जया कुरूप व त्यांच्या सहकाऱ्यांचा सौ. ज्योती विश्वास ठाकूर यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

**युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली :**
**मंगळवार, १४ ऑगस्ट २०१८**

देशासाठी लढणाऱ्या हुतात्म्यांचे स्मरण करून देश विकासासाठी व देशरक्षणासाठी प्रत्येकाने पुढे येणे गरजेचे असून लोकशाही मूल्यांची जपणूक करून समानता जोपासावी, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–विभागीय केंद्र नाशिकचे कार्याध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक, नवमहाराष्ट्र युवा अभियान, विश्वास को–ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अ‍ॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने ७२ व्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला 'युवा स्वतंत्रता ज्योत रॅली'चे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी ७ वाजता हुतात्मा चौक, गंगापूर रोड येथून रॅलीला प्रारंभ झाला. गंगापूरनाका, के.टी.एच.एम. महाविद्यालय, अशोकस्तंभ, मेहेर सिग्नल अशी जाऊन हुतात्मा स्मारक, सीबीएस येथे रॅलीचा समारोप झाला. त्यावेळी अर्चना भागवत यांनी राज्यघटनेच्या सरनाम्याचे सामूहिक वाचन केले.

सजविलेल्या रथात भारतमातेच्या वेशातील मुलगी विराजमान झाली होती. उपस्थित युवकांनी देशभक्तीपर गीतांनी व घोषणांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले. रॅलीत अनेक सामाजिक संस्था उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या होत्या. रॅलीच्या सुरुवातीला शिक्षण व आरोग्यविषयक प्रबोधनपर पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. रॅलीमध्ये प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष डॉ. सुधीर संकलेचा, सदस्य अ‍ॅड. नितिन ठाकरे तसेच अमर भागवत, चंद्रशेखर ओढेकर, किरण निकम, प्रसाद पाटील, गोरख चव्हाण, विवेकराज ठाकूर, मंदार ठाकूर, कैलास सूर्यवंशी, किशोर त्रिभुवन, रमेश बागुल, सुरेश वाघ, पूनम काशीकर, प्रियंका ठाकूर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते.

**चित्रपट चावडी : 'द मिस्टीक मॅस्युर'**
**शनिवार १८ ऑगस्ट २०१८**

'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक ईस्माईल मर्चंट यांचा 'द मिस्टीक मॅस्युर' हा चित्रपट दाखविण्यात आला. नोबेल पारितोषिक विजेते लेखक विद्याधर सूरजप्रसाद नायपॉल (व्ही.एस.नायपॉल) यांचे नुकतेच निधन झाले. ते भारतीय वंशाचे पण त्रिनिदाद, टोबॅगो येथील रहिवासी. त्यांच्या पहिल्याच कादंबरीवर आधारित 'द मिस्टीक मॅस्युर' हा चित्रपट आहे. साधारण १९४०चे त्रिनिदाद शहर हे एक ब्रिटीश वसाहत. तिथे गणेश रामसेयोर नावाचा भारतीय वंशाचा तरुण व त्याची पत्नी

लीला राहात असतात. गणेश लेखक होण्याची स्वप्ने पाहताना हिंदू धर्माचा प्रचार करतो. परंतु, त्याची कीर्ती हळूहळू 'दैवी शक्ती असलेला' अशी होते. सन २००१ मध्ये प्रदर्शित झालेल्या या इंग्लिश चित्रपटाचा कालावधी ११७ मिनिटांचा आहे.

**सुप्रसिद्ध लेखक श्याम मनोहर यांची जाहीर मुलाखत**
**शुक्रवार २४ ऑगस्ट २०१८**

आस्तिक–नास्तिक, हिंदुत्ववादी–बिगरहिंदुत्ववादी, विवेकवादी–देवभोळे अशा सर्वच प्रकारच्या माणसांची समाजात गरज असते. विचारसरणी कोणतीही असली, तरी माणसाच्या मूलभूत गरजा समानच असतात. त्यामुळे कोणत्याही गोष्टीचे टोक गाठण्यात अर्थ नाही, असे मत प्रख्यात लेखक श्याम मनोहर यांनी मांडले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–विभागीय केंद्र नाशिक व कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाशिक आयोजित प्रकट मुलाखतीत ते बोलत होते. कुसुमाग्रज स्मारकात हा कार्यक्रम झाला. ज्येष्ठ कवी, समीक्षक डॉ. चंद्रकांत पाटील यांनी श्याम मनोहर यांची मुलाखत घेतली. व्यासपीठावर लेखक सुनील तांबे उपस्थित होते. यावेळी श्याम मनोहर यांनी हिंदुत्व व भारतीयत्व, परंपरा व इतिहास, संस्कृती, जीवनपद्धती अशा अनेक विषयांवर दिलखुलासपणे व उपरोधिक शैलीत मते मांडली. आपल्या लेखन प्रेरणांचेही त्यांनी विश्लेषण केले. ते म्हणाले, ''माणूस प्रसंगी आस्तिकत्व व नास्तिकत्व या दोन्ही बाबी बाजूला ठेवून जगू शकतो. कारण मूलभूत गरजा समान असतात. हिंदू व हिंदुत्ववादी असा सुटा विचार करता येत नाही. धर्म म्हटला की आध्यात्मिकता येतेच. अध्यात्म म्हणजे अहंपणाचा लवलेशही नसणे. अशी अवस्था प्राप्त करणे शक्य नाही, हे प्रत्येकाला माहीत असते; पण त्या दिशेने प्रयत्न करीत रहायला हवा. समाजात काही मोठे प्रश्न जिवंत असायला हवेत. संस्कृती या विषयाचा अनेक वर्षे अभ्यास केल्यानंतर लक्षात आले, की माणसाला दोन मूलभूत प्रेरणा असतात. एक म्हणजे चांगले जगणे व दुसरी या विश्वाविषयीचे कुतूहल शमविणे. यापैकी दुसऱ्या प्रेरणेतील कुतूहलांची उत्तरे शोधत राहणे म्हणजे संस्कृती होय. जशी माणसाला चांगले जगण्याची प्रेरणा आहे, तशीच जीवनाचा अर्थ काय आहे, हे शोधण्याचे कुतूहलही आहे.'' लिखाण पारदर्शी असायला हवे, असेही श्याम मनोहर म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक दत्ता बाळसराफ यांनी केले. स्वागत विभागीय केंद्र, नाशिकचे कार्याध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले.

**चित्रपट चावडी 'दिग्दर्शक इंगमार बर्गमन फिल्म उत्सव'**
**शनिवार १ सप्टेंबर व रविवार २ सप्टेंबर २०१८**

'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध स्विडीश इंगमार बर्गमन फिल्म उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. बर्गमन यांच्या कारकीर्दीचा वेध घेणाऱ्या लघुपटाचे सादरीकरण करण्यात आले. बर्गमन यांचा सिनेमा जागतिक सिनेमा सृष्टीत क्लासिक किंवा अभिजात म्हणून ओळखला जातो. मानवी संबंधांची गुंतागुंत, अनेक मानव निर्मित संस्था व सामाजिक अनुबंध व त्यातील परस्पर व्यवहार यावर भाष्य करणारा त्यांचा सिनेमा अनुभवविश्व समृद्ध करणारा आहे. त्यांच्या सिनेमातील पात्रे व प्रतिमासृष्टी सिनेमाला एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जातात. त्यापैकी १) वाईल्ड स्ट्रॉबेरीज २) सेवन्थ सील ३) समर इंटरल्युड ४) ऑटम सोनाटा हे चित्रपट दाखविण्यात आले.

**चित्रपट चावडी : 'पेशन्स स्टोन'**
**शनिवार १५ सप्टेंबर २०१८**

'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक अतिकी रहिमी यांचा 'पेशन्स स्टोन' हा चित्रपट दाखविण्यात आला. अफगाणिस्तानमध्ये घडलेली ही एक नाजूक आणि हृदयद्रावक कहाणी आहे. एक स्त्री आपल्या मूक पतीजवळ तिच्या जगण्याचा रहस्यमय, रोमांचकारी सत्यप्रवास कथन करते. त्यातूनच हा चित्रपट पुढे सरकत जातो. यात स्त्रीचे बालपण, एकाकीपण, तिची अपूर्ण स्वप्ने, इच्छा आकांक्षा मांडते. नात्यामधील असलेली जगण्याची आस आणि प्रेमभावना याचे विलक्षण मिश्रण यात आहे. सन २०१२ मध्ये अफगाणिस्तान येथे प्रदर्शित झालेल्या या पर्शियन चित्रपटाचा कालावधी १०० मिनिटांचा आहे.

**'पोषण अभियाना'विषयी कार्यक्रमांचे आयोजन**
**गुरुवार, २० सप्टेंबर २०१८**

'सही पोषण, देश रोशन–कुठेच राहणार नाही कुपोषण' या ब्रीदवाक्याअंतर्गत आणि एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प नाशिक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को–ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अ‍ॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध स्पर्धांचे आयोजन तसेच कार्यक्रमांचे प्रसारण करण्यात आले.

या कार्यक्रमांमध्ये गरोदर मातांपासून तर बालकांपर्यंत जसे 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' याविषयांवर जनजागृतीपर व्याख्यान, ० ते ६ वर्ष वयोगटातील बालकांचे वजन किती असावे, त्यांना कोणता आहार द्यावा, संतुलित आहारात कोणकोणत्या घटकांचा समावेश असावा या विषयावर व्याख्यान झाले. तसेच पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महिलांना योगा प्रशिक्षण देणे का गरजेचे आहे? पोषण आहारात कोणकोणत्या गोष्टींच्या समावेश असावा? अंगणवाडीच्या मुलांना विविध फळांच्या पोषण आहारासंदर्भात मार्गदर्शन व बालकांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रेडिओ विश्वास ९०.८च्या माध्यमातून 'आरोग्यसखी' या कार्यक्रमांतर्गत गर्भवती महिलेचा आहार कसा असावा, त्यांनी कोणकोणत्या तपासण्या करून घेणे गरजेचे आहे, याविषयांवर सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. चंद्रकांत संकलेचा, डॉ. अश्विन मोरे यांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

**चित्रपट चावडी : 'अंडर द स्मोकी रूफ'**
**शनिवार ६ ऑक्टोबर २०१८**

'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध इराणी दिग्दर्शक पुरन दाराक्शंदे यांचा 'अंडर द स्मोकी रूफ' हा चित्रपट दाखविण्यात आला. शिरीन नावाच्या महिलेचे नवऱ्या व मुलाबरोबरचे संबंध बिघडलेले आहेत. ते सुधारण्याचा व त्यांच्याशी संवाद साधण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे. पण, परिस्थिती आटोक्याच्या बाहेर जाते आणि त्यातून नवीन प्रश्न उभे राहतात. स्त्री–पुरुष नातेसंबंधातील गुंतागुंतीचा वेध घेण्याचा प्रयत्न दिग्दर्शकाने यातून केला आहे. सन २०१५मध्ये इराण येथे प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी १०७ मिनिटांचा आहे.

**'विश्वास आर्थिक साक्षरता'**
**शनिवार ६ ऑक्टोबर २०१८**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को–ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅण्ड रिसर्च इन्स्टिटयूट नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने मार्च २०१८ पासून नाशिक मध्ये एकूण ५५ वसाहतींमध्ये वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवित आहोत. या उपक्रमांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक साक्षर बनविण्यासाठी संस्था प्रयत्न करीत आहे. या करिता वसाहतींमध्ये सर्व्हे करण्यात आला, या सर्व्हेच्या माध्यमातून पॅन कार्ड कॅम्प घेण्यात आला. मात्र यातून असे लक्षात आले, की वसाहतीमध्ये महिलांची एक समिती असणे गरजेचे आहे, की ज्यामुळे महिलांना पॅन कार्ड काढणे, आधार कार्ड मध्ये दुरुस्ती करणे, नवीन आधार कार्ड काढणे, बचत गट चालू करणे, राज्य शासन व केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती, इ. सारख्या अनेक कामांसाठी इतरत्र फिरण्याची गरज भासणार नाही व त्या स्वतः स्वतःच्या कामासाठी सक्षम होतील. त्यांना बँकिंग संदर्भात माहिती देण्याच्या हेतूनेही या समितीचा उपयोग होऊ शकतो. या हेतूने संस्थेने प्रत्येक वसाहतीमध्ये 'विश्वास समिती' स्थापन करण्याचे ठरविले.

विश्वास समितीच्या माध्यमातून वसाहतीमधील महिला एकत्रित याव्यात व स्वविकास साधून स्वावलंबी व्हाव्या या उद्देशाने विश्वास समितीची स्थापना करण्यात आली. २) विश्वास समितीच्या माध्यमातून महिलांनी आर्थिक साक्षर व्हावे, तसेच कोणत्याही प्रकारच्या सामाजिक कामांसाठी समितीमधील महिलांनी इतर महिलांसोबत संवाद साधावा. ३) विश्वास समितीच्या माध्यमातून वसाहत पातळीवर विविध शिबिरांचे उदा. पॅन कार्ड शिबिर, आधार कार्ड शिबिर, लघु उद्योग प्रशिक्षण, बचत गट स्थापना आदी कार्यक्रम आयोजित करणे. ४) राज्य शासन व केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ वसाहती मधील महिलांना समितीच्या माध्यमातून घेता यावा या उद्देशाने समितीची स्थापना करण्यात आली.

**'विश्वास आर्थिक साक्षरता'**
**आधार कार्ड शिबिर**
**सोमवार, ८ ऑक्टोबर २०१८ ते बुधवार, ३१ ऑक्टोबर २०१८**

आज आधुनिकीकरणाच्या काळात आपल्या देशात आर्थिक विकासाला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. आज आपल्या देशात होत असलेले डिजिटलायझेशन, मेक इन इंडिया (Make in India), स्मार्ट सिटी (Smart City), स्टार्ट अप (Start Up) हा आर्थिक विकासाचाच एक भाग आहे. आर्थिक विकास म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्नात वाढ या बरोबर सामाजिक कल्याणात वाढ हाही आर्थिक विकासाचाच भाग आहे. त्याचाच एक भाग म्हणून सामाजिक बांधीलकीच्या जाणीवेतून आधारकार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये नवीन आधारकार्ड काढणे, आधारकार्डमध्ये दुरुस्ती, आधारकार्ड संदर्भात सर्व शंकांचे निरसन करण्यात येत आहे. विश्वास को–ऑप. बँकेच्या ११ शाखांमध्ये हे शिबिर राबविण्यात आले. त्याला लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# विभागीय केंद्र, औरंगाबाद

## कार्यवृत्त

### 'चित्रपट चावडी' उपक्रमात फ्रेंच भाषेतील 'ब्लू' चित्रपट

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र, औरंगाबाद व एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय आयोजित चित्रपट चावडी या उपक्रमांतर्गत १९९३ मधील फ्रेंच भाषेतील 'ब्लू' हा चित्रपट शनिवार २३ जून २०१८ रोजी सायं. ६ वा. आइनस्टाईन सभागृह, जेएनईसी महाविद्यालय, एमजीएम परिसर, औरंगाबाद येथे दाखविण्यात आला.

अशीच एक जगभर गाजलेली कलाकृती म्हणजेच Three Colours Trilogy. फ्रेंच भाषेतील ही ३ चित्रपटांची मालिका म्हणजे मानवी जीवन उलगडण्याचा एक यशस्वी प्रयत्न होय. krzysztof keeslowski हा पोलिश दिग्दर्शक फ्रान्सच्या ध्वजावरील ३ रंगांनुसार तयार केलेल्या Blue, White आणि Red या चित्रपटांमधून अनुक्रमे स्वातंत्र्य, समता व बंधुता या नैतिक मूल्यांवरचे तत्वज्ञान मांडतो. जीवनाचे अनेक अंग, त्याची प्रखरता आणि त्याच्याशी दिलेला लढा यांचे समग्र दर्शन ते krzysztof यांच्या खास दिग्दर्शन शैलीतून आणि अत्यंत वास्तवादी अशा कथांमधून पाहायला मिळते.

मालिकेतील पहिल्या चित्रपटातून kieslowski हे रस्त्यावरील एका दुर्दैवी अपघातामध्ये आपले संपूर्ण कुटुंब गमावलेल्या एका स्त्रीची गोष्ट सांगतो. ज्यूली नावाची ही स्त्री एका संगीतकाराची पत्नी असते. अपघातामध्ये मुलगा व पती यांच्या दुर्दैवी मृत्यूमुळे तिच्या आयुष्याचा अर्थच नष्ट झालेला असतो; म्हणून खचून जाऊन केलेला आत्महत्येचा प्रयत्न सुद्धा फोल ठरतो. मग अनिच्छेने का होईना पण परिस्थितीशी जुळवून घेत जगण्यासाठीची धडपड आणि पूर्वायुष्यातील अनेक प्रसंगांशी सतत होणाऱ्या संघर्षाला तोंड देत तिने घेतलेला स्वातंत्र्याचा शोध म्हणजेच Blue....

चित्रपट रसिकांनी या चित्रपटाला उत्स्फूर्त गर्दी केली होती. विभागीय केंद्राचे सचिव निलेश राऊत, डॉ. रेखा शेळके, सुहास तेंडूलकर, सुबोध जाधव, एमजीएम फिल्म आर्ट विभागप्रमुख शिव कदम आदींची उपस्थिती यावेळी होती.

### परिक्षीत सूर्यवंशी लिखीत 'वेस्ट पासून बेस्ट' पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन संपन्न

शालेय जीवनापासून कचरा आपल्या उर्जेचे स्त्रोत ठरू शकतो, हा विचार विद्यार्थ्यांच्या मनात जगविणे गरजेचे आहे. औरंगाबाद येथील रचनात्मक कार्यात अग्रेसर असलेला युवक परिक्षीत सूर्यवंशी याने शालेय विद्यार्थ्यांकरिता अतिशय महत्त्वाच्या ठरू शकणाऱ्या पुस्तिकेचे लिखाण यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबादच्यावतीने केले आहे. परिक्षीत सूर्यवंशी लिखित 'वेस्ट पासून बेस्ट' या पुस्तिकेचे प्रकाशन शनिवार, ३० जून २०१८ रोजी एमजीएमचे विश्वस्त तथा विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. अंकुशराव कदम यांच्या हस्ते औरंगाबाद येथे झाले.

'वेस्टपासून बेस्ट' ही पुस्तिका विद्यार्थी समोर ठेवून लिहिली असून, शिक्षक/पालक यांच्या मार्गदर्शनाखाली यात सांगितलेल्या कृती करायच्या आहेत. कचऱ्याची समस्या सोडवण्यात विद्यार्थी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. प्रत्येक विद्यार्थ्यांने कमीत कमी आपल्या घरात जरी या पुस्तकात सांगितलेले – वर्गीकरण, कम्पोस्टिंग आणि रिसायकलिंग हे उपाय करायला सुरुवात केली, तरी खूप मोठा बदल घडू शकतो. तसेच घन कचऱ्याचा प्रश्न समजाऊन घेऊ पाहणाऱ्या आणि तो सोडविण्यासाठी आपल्या परीने प्रयत्न करू इच्छिणाऱ्या प्रत्येकाला हे पुस्तक नक्कीच उपयोगी पडेल. प्रत्येकाला 'कचरा साक्षर' बनवू शकेल अशा उत्तम पद्धतीने परिक्षीतने या पुस्तिकेचे लिखाण केलेले आहे. पुस्तकाची आकर्षक मांडणी, योग्य रंगसंगती, आवश्यक चित्रे, यामुळे पुस्तक वाचकांच्या नक्कीच पसंतीस पडेल. पुस्तकाच्या शेवटी कचरा समस्येवर आधारीत भारतातील काही यशस्वी कथा दिलेल्या आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश राऊत यांनी केले, तर परिक्षीत सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त केले. सुबोध जाधव यांनी आभार मानले.

सदरील पुस्तिका ही औरंगाबाद जिल्ह्यातील आठशे शाळांमध्ये वितरीत करण्यात आली. शिक्षकांनी कचऱ्याच्या जाणीव जागृती संदर्भात विद्यार्थ्यांकडून करून घ्यावयाच्या विविध कृतींचा त्यात समावेश आहे.

**मराठवाड्यातील महाविद्यालयांना 'दायाद' ग्रंथभेट**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - विभागीय केंद्र औरंगाबादच्यावतीने मराठवाड्यात सातत्याने निरनिराळे सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. सर्वसामान्य विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीच्या दृष्टीने व गुणवत्तावाढीच्या बाबतीत रचनात्मक कार्याच्या माध्यमातून कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

औरंगाबाद विभागीय केंद्राच्यावतीने दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला मराठवाड्यातील निवडक महाविद्यालयांना ग्रंथभेट दिली जाते. यंदा २०१८-१९ या वर्षाकरिता ज्येष्ठ नाटककार मा. प्रशांत दळवी संपादित 'दायाद-वारसा वाडा त्रयींचा....' या ग्रंथाची निवड भेटीकरिता करण्यात आली. ज्येष्ठ नाटककार मा. महेश एलकुंचवार यांच्या 'वाडा चिरेबंदी', 'मग्न तळ्याकाठी' व 'युगान्त' या मराठीतील अतिशय गाजलेल्या नाट्यत्रयींच्या प्रवासाची ही विचारप्रक्रिया आहे. ज्येष्ठ नाट्य दिग्दर्शक मा. चंद्रकांत कुलकर्णी यांनी या ग्रंथाच्या निर्मितीकरिता विशेष प्रयत्न केले आहेत. लोकसत्ता संपादक शिफारस योजनेत या ग्रंथाची निवड करण्यात आली होती, हे विशेष!

औरंगाबाद विभागीय केंद्राच्यावतीने हा ग्रंथ मराठवाड्यातील वेगवेगळ्या ७० महाविद्यालयांना भेट देण्यात आला. यावेळी शिक्षण मंडळांचे प्राचार्य, प्राध्यापक यांनी या ग्रंथ ग्रंथालयात विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन दिले व प्रतिष्ठानचे आभार मानले. विभागीय केंद्राच्यावतीने सुबोध जाधव, मंगेश निरंतर, महेश अचिंतलवार, सचिन दाभाडे आदींची यावेळी उपस्थिती होती.

**चित्रपट चावडी : फ्रेंच भाषेतील थ्री कलर्स व्हाईट चित्रपट**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय आयोजित 'चित्रपट चावडी' या उपक्रमांतर्गत फ्रेंच भाषेतील 'थ्री कलर व्हाईट' हा चित्रपट शनिवार, १४ जुलै २०१८ रोजी, सायं. ६ वाजता आइनस्टाईन सभागृह, जेएनईसी महाविद्यालय, एमजीएम परिसर, औरंगाबाद येथे दाखविण्यात आला.

पोलिश दिग्दर्शक Kryzstof Kieslowski यांच्या Three Colours च्या Blue या पहिल्या चित्रपटानंतर 'चावडी'च्या कट्ट्यावर द्वितीय भाग White दाखवण्यात आला. खरं तर स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यावर सतत भाष्य होत असते; पण Kryzstof Kieslowski यांची शैली आणि तत्त्वज्ञान काही वेगळेच!

Three Colours Trilogy मधील पहिला चित्रपट Blue द्वारे स्वातंत्र्यावर, तर दुसरा चित्रपट White यातून krzysztof kieslowski आपल्याला समता या विषयावर चिंतन करायला लावतो. दैनंदिन जीवनात आर्थिक, सामाजिक, बौद्धिक समानता यांच्या मागे लागलेला मानव हा मुळात भावनिकदृष्ट्या समान होऊ पाहत असतो. अशाच एका समतेच्या मागे लागलेल्या व्यक्तीच्या गोष्टीमध्ये आपल्याला अडकवून टाकत आणि आपल्याही नकळत आपण समतेचा अर्थ, गरज आणि प्रमाण समजून घ्यायच्या प्रयत्न सुरू करतो.

चित्रपट रसिकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी विभागीय केंद्राचे सचिव निलेश राऊत, डॉ. रेखा शेळके, सुबोध जाधव, एमजीएम फिल्म आर्ट विभागप्रमुख शिव कदम, श्रीकांत देशपांडे, महेश अचिंतलवार, गणेश घुले आदींची उपस्थिती होती.

**शेतकऱ्यांनी ई-साक्षर होणे ही काळाची गरज**
**फिरोज मसानी :**

शेतकऱ्यांचे काम पिकांपुरतेच मर्यादित राहिले नसून, आता शेतकऱ्यांच्या कंपन्या स्थापन होऊ लागल्या आहेत. ई-कॉमर्स, वायदे बाजार, ऑनलाईन लिलाव, असे अनेक पर्याय शेतमाल विक्रीसाठी खुले झाले आहेत. त्यासाठी शेतकऱ्यांना सर्वप्रथम ई-साक्षर करणे ही काळाची गरज बनली आहे, असा सल्ला 'सेंटर फॉर इंटरनॅशनल ट्रेड इन अग्रिकल्चर अॅण्ड अॅग्रोबेस्ड इंडस्ट्रीज (सिटा)'चे कार्यकारी अधिकारी फिरोज मसानी यांनी दिला.

एमजीएमच्या आर्यभट्ट सभागृहात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सहकार्याने आयोजित 'सिटा संवाद' कार्यक्रमात त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी एमजीएमचे विश्वस्त अंकुशराव कदम होते. यावेळी ज्येष्ठ कृषीतज्ज्ञ विजयअण्णा बोराडे, महाबँकेचे व्यवस्थापक प्रदीप कुतवळ, एमजीएमचे गांधेली कॅम्पसचे संचालक डॉ. जी. आर. रेड्डी, जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष जगन्नाथ काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मसानी पुढे म्हणाले, की शेतकऱ्यांनी आपल्या उत्पादनाचे योग्य नियोजन केले, तर हव्या त्या दरात त्यांना ते विकता येऊ शकते. त्यासाठी आणि शेती उद्योग यशस्वी होण्यासाठी सर्व शासन योजनांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार शेतकऱ्यांनी आधुनिक होणे गरजेचे आहे. कारण, एखादा मेल करायचा म्हटले तरी शेतकऱ्यांना तो करता येत नाही. त्यासाठी, त्यांनी ई–साक्षर होणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त नवीन तंत्रज्ञान अवगत केल्याशिवाय शेतकऱ्यांना पुढे जाता येणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. 'सिटा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील तांबे म्हणाले, की ई–कॉमर्सचा प्लॅटफॉर्म उभारणे व वायदेबाजारात उतरण्यासाठी शेतकरी कंपन्यांना सहकार्य करणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

**सरकारकडून दुर्लक्ष कशामुळे**

कृषितज्ज्ञ विजयअण्णा बोराडे म्हणाले, की निवडणुकीमध्ये ग्रामीण भागातील मतदाराची टक्केवारी ५४ टक्क्यांवर आली आहे. यामुळे सरकारने ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष करणे सुरू केले आहे. सरकार आता शहरीकरणावर भर देत आहे. सरकारकडून शेतकऱ्यांना सापत्न वागणूक मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता उत्तम शिक्षण घेऊन कंपनी स्थापन्यावर भर दिला आहे.

यानंतर शेतकरी कंपन्यांचे प्रतिनिधी भगवान म्हात्रे, दीपक चव्हाण यांनी प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणींचा पाढा वाचला. शिल्पा तरटे हिने सूत्रसंचालन केले, तर श्रीकृष्ण सोनावणे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे दत्ता बाळसराफ, निलेश राऊत, सुबोध जाधव आदींनी परिश्रम घेतले.

**'बहुरी अकेला'**

पं. कुमार गंधर्व यांनी गायन क्षेत्रात केलेले वेगवेगळे प्रयोग, गाण्याविषयीचे त्यांचे चिंतनशील विचार आणि दुर्मिळ चित्रफिती असा कुमार गंधर्वांच्या आठवणींचा समृद्ध ठेवा 'बहुरी अकेला' या दृक–श्राव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून उलगडत गेला आणि त्यांच्या गायकीचा पटच डोळ्यासमोर उभा राहिला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद व स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ शास्त्रीय गायक पंडित कुमार गंधर्व यांच्या संगीतावर आणि साहित्यावर आधारित 'बहुरी अकेला' या दृक–श्राव्य कार्यक्रमाचे शनिवारी (दि. २१ जुलै) आयोजन करण्यात आले होते. गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी येथे झालेला हा दीड तासाचा अनोखा कार्यक्रम कुमार गंधर्वांच्या गाण्यांवर, गाण्यातील चिंतनशील निवडक पैलूंवर प्रकाशझोत टाकणारा ठरला.

पुणे येथील कलावंत सायली तामने व धनंजय मुळी यांनी हा कार्यक्रम सादर केला. यामध्ये कुमार गंधर्वांच्या मुलाखतींचे दुर्मिळ छायाचित्रण, वसंत बापट यांच्यासोबतचा त्यांचा संवाद, लोकधूनमधून रागांची निर्मिती कशी झाली, याबाबत कुमारांनी सांगितलेला सैद्धांतिक विचार, वेगवेगळ्या संतांच्या रचनांबद्दले कुमार गंधर्वांचे मत, संगीत कलेविषयीचे त्यांचे मत याविषयी दृक–श्राव्य माध्यमातून माहिती देण्यात आली. 'माया महा ठनगी हम जानी....', 'पियाजी मोरे नैना आगे राह ज्योजी....', 'गुरुजी जहाँ बैठू वहाँ छाया जी....', यासारख्या कुमार गंधर्वांच्या लोकप्रिय गाण्यांच्या रेकॉर्डिंगही ऐकविण्यात आल्या.

**मला फक्त संगीत सापडते.**

अनेक कलाकार संगीताकडे दैवी नजरेतून पाहतात, पण कुमार मात्र संगीताकडे इहवादी दृष्टीकोनातून पाहताना मानवनिर्मित मानतात. याविषयीची त्यांची चित्रफित दाखविण्यात आली. कुमार म्हणतात, की संगीतातून ईश्वर सापडतो की नाही, माहीत नाही. मला फक्त संगीत सापडते. स्वरांची निर्मिती ही दैवी नसून, लोकधूनमधून आली आहे. लोकधून म्हणजे वरचेवर घुमवलेले मोजके स्वर होत. कुमार गंधर्वांचा जन्म मध्यप्रदेशातील माळवा प्रांतातला. हा प्रांत लोकगीतांसाठी समृद्ध असून, त्यांनी निर्मिती केलेल्या 'माळवा की लोकधुनें' या कार्यक्रमातील काही दृश्येही याप्रसंगी दाखविण्यात आली.

**देवळी : भंडारेंच्या छायाकृतींत फ्रेमपलीकडील जगाचा शोध**

विभागीय केंद्र, औरंगाबाद व एमजीएम वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालयातर्फे आयोजित प्रसिद्ध छायाचित्रकार संदेश भंडारे यांचे 'देवळी– कोनाडा' छायाचित्र प्रदर्शन शनिवार, ११ ऑगस्ट ते रविवार १९ ऑगस्ट २०१८ रोजी एमजीएम कलादीर्घा आर्ट गॅलरी, एमजीएम स्टेडियम परिसर, औरंगाबाद येथे सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत भरविण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. अंकुशराव कदम यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रख्यात छायाचित्रकार संदेश भंडारे यांच्या छायाकृतींचे 'देवळी–कोनाडा' प्रदर्शन पाहताना भंडारे यांच्या विचारशक्तीतील वेगळेपण मनात ठसते. जुन्या आठवणी, बालपणाच्या गोष्टींत रमणे अनेकांना आवडत असते. विशेषतः वयाला चाळीशीचे वेध लागले, की आपला मूळ उगम, उदय येथे झाला तो परिसर खूणावू लागतो. त्यातील तपशील डोळ्यांसमोरून भिरभिरू लागतात. भंडारे यांनी देवळी प्रदर्शनात नेमका हाच वेध घेतला आहे. ५० वर्षांपूर्वी गावांमधील शहरात वस्तीत आलेल्या लोकांचे बालपण वाडा संस्कृतीत गेले आहे. काळाच्या ओघात गावकरी वाडे सोडून गेले. हळूहळू वाड्यांना घरघर लागली. त्यातील स्थापत्य वैशिष्ट्यांच्या खुणा सांस्कृतिक वेगळेपण लयाला जाऊ लागले. आत तर वाडे नामशेषच झाले आहेत. एक प्रकारे आपली एक समृद्ध परंपरा आपण मोडीत काढली आहे. त्याचे प्रतीक म्हणून भंडारे यांनी शेकडो जुन्या वाड्यांतील देवळी, म्हणजे कोनाड्यांची विविध रूपे टिपली. त्याचे प्रदर्शन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या औरंगाबाद विभागीय केंद्रातर्फे एमजीएमच्या कालदिर्घा दालनात भरवले. प्रत्येक फ्रेम पाहताना त्यातील भावार्थ अधिक व्यापक असल्याचे जाणवले. त्याकाळी वाड्याची देवळी म्हणजे एक जिवंत व्यक्तिमत्त्वच होते किंवा एक हक्काचा माणूसच समजा. कोणीही येता जाता देवळीत काहीही ठेवून जावे आणि तिने ते जिवाभावाने सांभाळावे, अशी स्थिती होती. त्यामुळे वाड्यांमध्ये देवळी तयार करताना तिच्यावर छानपैकी संस्कार केले जात. तिला विविध आकार दिले जात. कलाकुसरही केली जात असे. काही देवळ्या मोठ्या आकाराच्या विशाल हृदयाच्या, तर काही देवळ्या छोटेखानी, पण मनात अपार माया भरलेल्या, असे सारे चित्रण भंडारे यांच्या या प्रदर्शनात पाहण्यास मिळाले.

अशा या आगळ्यावेगळ्या प्रदर्शनाच्या आयोजनाबद्दल प्रतिष्ठानचे निलेश राऊत, सुबोध जाधव आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी केले

**चखोट झाले पाऊसपाणी, सरली कामे स्फुरली गाणी**

पावसाने खंड दिल्यामुळे आपल्याकडच्या शेतकऱ्यांचे जीव कोरडे पडत असताना किमान विंदांच्या 'चखोट झाले पाऊसपाणी, सरली कामे स्फुरली गाणी' यासारख्या कवितांनी रसिकांची मने तर चिंब झाली!

कवी विंदा करंदीकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालयातर्फे रविवारी (दि. १९ ऑगस्ट) वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान, सिंधुदुर्गनिर्मित 'स्वच्छंद' या मंचीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन कवी दासू वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. विंदा कायमच समकालीन वाटणारे कवी होते, असे ते यावेळी म्हणाले.

यावेळी स.भु.चे सहसचिव डॉ. श्रीरंग देशपांडे, संगीत विभागप्रमुख डॉ. संजय मोहोड, सुबोध जाधव यांची उपस्थिती होती. वामन पंडित, अनिल फराकडे, प्रसाद घाणेकर, विद्यागौरी ताम्हणकर यांनी विंदांच्या प्रसिद्ध कवितांचे अभिवाचन केले. माधव गावकर यांनी काही गेय कवितांचेही सादरीकरण केले. 'माझ्या मना बन दगड', 'तेच ते, तेच ते', 'चेडवा ये गो माझ्या घरी', 'माझी राधा', 'आंबा' अशा कवितांच्या सादरीकरणासह त्यांचे निबंध आणि इतर चिंतनाचाही ऊहापोह यावेळी केला गेला.

**चित्रपट चावडी: थ्री कलर्स – रेड चित्रपट**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय आयोजित चित्रपट चावडी या उपक्रमांतर्गत फ्रेंच भाषेतील 'थ्री कलर्स – रेड' हा चित्रपट शनिवार, २५ ऑगस्ट २०१८ रोजी, सायं. ६ वा., आईनस्टाईन सभागृह, जेएनईसी महाविद्यालय, एमजीएम परिसर औरंगाबाद येथे दाखविण्यात आला.

खूप कमी वेळा असं होतं, की एखाद्या कलाकाराची शेवटची कलाकृती सर्वोत्कृष्ट असते; पण २० वर्षांच्या कारकीर्दीमध्ये Kryzstof keislowski याने कीर्तीचे सर्वोच्च शिखर गाठले ते त्याच्या अकाली मृत्यूआधीच्या शेवटच्या चित्रपटामधूनच. Three Colours च्या अंतिम भागातून समाज आणि व्यक्तिमत्त्व यांच्यातील परस्परसंबंध चित्रित केल्यामुळे मैत्रीवरील सखोल तत्त्वज्ञान अनुभवायला मिळते. आपल्या आयुष्यातील नियतीची भूमिका आणि निवडीचे महत्त्व हे चित्रपटामधून जाणवत असूनदेखील सुरुवातीपासून शेवटपर्यंत Red आनंददायक व खिळवून ठेवणारा आहे, यावरून Keislowski यांची प्रतिभा लक्षात येते.

व्हॅलेंटाईन नावाच्या एका तरुण मॉडेलच्या गाडीखाली एक कुत्रं येतं आणि त्यातून तिची ओळख होते ते कुत्र्याचे मालक निवृत्त न्यायाधीश कर्न यांच्याशी. Red ही या दोघांच्या विचित्र

पण सुंदर नाते आणि नियतीच्या खेळाची जोड असलेली कथा. याचवेळी ऑगस्ट नावाच्या न्यायाधीश होऊ पाहणाऱ्या तरुणाची प्रेमकथादेखील पडद्यावर उलगडत जाते. ऑगस्ट आणि कर्न याच्या जीवनातील साम्य; पण वयानुसार बदललेला दृष्टिकोन यामुळे Red बघणं हा एक अत्यंत सुखद अनुभव ठरतो.

चित्रपटास डॉ. रेखा शेळके, एमजीएम फिल्म आर्ट विभाग प्रमुख शिव कदम, सुबोध जाधव, उमेश राऊत, श्रीकांत देशपांडे, महेश अचिंतलवार, गणेश घुले आदी उपस्थित होते. चित्रपटाला रसिकांनी गर्दी केली होती.

**प्रचंड प्रतिसादामुळे 'गावकथा' चा दुसरा प्रयोग**

बदलत्या गावाची कहाणी सांगणारा 'गावकथा' नाट्य प्रयोग विशेष रंगला. कविता, स्वगत, अभंग, संवादाच्या माध्यमातून खुमासदार शैलीत गावगाडा मांडण्यात आला. प्रयोगाला रसिकांची भरभरून दाद मिळाली. रसिकांची प्रचंड गर्दी झाल्यामुळे पहिला प्रयोग संपल्यानंतर आयोजकांना लगेच दुसरा प्रयोग घ्यावा लागला.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद व स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्यावतीने बालाजी सुतार लिखित 'गावकथा' या नाट्य संहितेचा प्रयोग स.भु. महाविद्यालयाच्या गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी सभागृहात रविवारी (दि. ९ सप्टेंबर) सायंकाळी रंगला. ग्रामीण महाराष्ट्रातील भोवताल दोन-तीन दशकांत अतिशय बदलला. तसेच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक मूल्यभानाचा ऱ्हासही झाला. शेतीच बिकट अवस्था, स्त्रियांचे अवघड आयुष्य, दिशाहीन तरुणाई आणि मूल्यविहीन ग्रामीण राजकारणाच्या अंगाने 'गावकथा' सादर झाली. 'रंगदृष्टी', पुणे यांची निर्मिती असलेल्या प्रयोगाचे दिग्दर्शन संजय मोरे यांचे होते. या प्रयोगाला तांत्रिक साथसंगत मयुर मुळे, दीप डबरे, शिवानी कंधारकर, अनिरुद्ध गोरे, गोपाळ तिवारी यांनी केली. संजय ठाकूर, महेंद्र प्रकाश, विनोद वणवे, अनिता डेंगळे, श्रीकांत शिवाजी, ऋताली वैद्य, रश्मी साळवी, तुषार हांडे, हर्षा ए.जी., अरबाज मुलाणी यांनी भूमिका साकारल्या.

प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, प्रा. रा. रं. बोराडे, श्रीरंग देशपांडे, दासू वैद्य यांच्या हस्ते सर्वांचे सत्कार करण्यात आले. यावेळी निलेश राऊत, सुहास तेंडुलकर, शिव कदम, सुबोध जाधव, मंगेश निरंतर, दीपक जाधव, गणेश घुले, उमेश राऊत, सचिन दाभाडे, श्रीकांत देशपांडे, महेश अचिंतलवार आदींची उपस्थिती होती.

**चित्रपट चावडी : अमेरिकन फिल्म नोटोरियस**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय आयोजित चित्रपट चावडी या उपक्रमांतर्गत १९४६ मधील अमेरिकन निर्माता व दिग्दर्शिक अल्फ्रेड हिचकॉक यांचा 'नोटोरियस' चित्रपट शनिवार, २९ सप्टेंबर २०१८ रोजी, आईनस्टाईन सभागृह, जेएनईसी विद्यालय, एमजीएम परिसर, औरंगाबाद येथे दाखविण्यात आला.

चित्रपटात कॅरी ग्रँट, इन्ग्रिड बर्गमन आणि क्लाउड पाऊन्स यांनी अभिनय केला आहे. नाटोरियस हा चित्रपट अल्फ्रेड हिचकॉकच्या व्हिज्युअल शैलीतील मोहक अभिव्यक्ती आहे. यामध्ये त्याच्या कारकिर्दीतील सर्वात प्रभावशाली कॅमेरा शॉट्स आहेत आणि ते सर्व उत्कृष्ट अंतिम परिच्छेदांमध्ये पोहोचतात, ज्यात दोन माणसे दोघे किती चुकीचे आहेत हे शोधून काढतात. कॅसाब्लांकासह हा चित्रपट ॲलिसिया हर्बरन (इंग्रिड बर्ममन) अमरत्वाचे आश्वासन देतो. ती एक महिला आहे, जिची गुन्हेगार अमेरिकन मुलगी अशी ओळख आहे. यू.एस. सहकारी एजंट टी. आर. डेव्हलिन (कॅरी ग्रांट) ॲलिसिया हर्बरन गुप्तचर म्हणून नियुक्ती करतो. त्यावेळी ॲलिसियाला ब्राझीलमध्ये लपवलेल्या नाझी अलेक्झांडर सेबास्टियन (क्लाउड पाऊन्स) यांचे प्रेम जिंकण्याचे निर्देश दिले जातात. जेव्हा सेबॅस्टियन ॲलिसियाबरोबरच्या नातेसंबंधांबद्दल गंभीर ठरतो, तेव्हा त्याची भागीदारी अधिक वाढते आणि डेव्हलिनला मोठा धोका असतानाही प्रेमासाठी गुप्त माहिती देणे भाग पडते. त्यात तिचा मृत्यू होतो. त्यांचा चुकीचा समज एका प्लॉटच्या मध्यभागी आहे ज्यामध्ये सर्व तुकडे एकत्रितपणे एकत्र येतात, जेणेकरून दोन लोक त्यांच्या स्वातंत्र्यासाठी एक पायऱ्या खाली पळतात आणि तिसरा माणूस त्याच्या दंडापर्यंत पाऊल उचलतो.

चित्रपट रसिकांनी या चित्रपटास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. चित्रपटास डॉ. रेखा शेळके, सुहास तेंडूलकर, एमजीएम फिल्म आर्ट विभाग प्रमुख शिव कदम, सुबोध जाधव आदींची उपस्थिती होती.

**अल्फाजने अल्फाज को छुआ : 'सहर होने तक'**

उर्दू शायरी ज्या विशेष शैलीमध्ये लिहिल्या आहेत, त्यातील सर्वांत पहिल्या शायरा म्हणजे औरंगजेबाची मोठी कन्या झेबुन्निसा. झेबुन्निसा यांच्या शायरीपासून ते अगदी आताच्या शायरा मोनिका सिंह यांच्या शायरीपर्यंतचा प्रवास 'सहर होने तक' या कार्यक्रमातून अलगद उलगडत गेला आणि प्रत्येक शायरीला 'वाह वा..,' 'क्या बात है....' अशी मनसोक्त दाद मिळून सारे सभागृहच 'शायराना' रंगात रंगले होते. शायरी, नृत्य आणि गायन यांचा तिहेरी मिलाफ असलेल्या या कार्यक्रमात उर्दू-फारसी शायरीचे वेगळेपण उलगडताना तिची नजाकत जपत कलाकारांनी लक्षवेधी सादरीकरण केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबाद, एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, ७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता जेएनईसी महाविद्यालयाच्या आर्यभट्ट सभागृहात नीरजा क्रिएशन आणि 'दकनी अदब फाऊंडेशन' प्रस्तुत 'सहर होने तक' या उर्दू शायरी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विभागीय केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, एमजीएम वृत्तपत्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रेखा शेळके यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

नीरजा आपटे यांची संकल्पना, दिग्दर्शन आणि संचालन असलेल्या या कार्यक्रमाचे वेगळेपण दीप प्रज्वलनाने जाणवले. कथ्थक नृत्य सादर करत अबोली अभ्यंकर यांनी प्रेक्षकांमधून प्रवेश करून नृत्य करतच दीप प्रज्वलन करून मैफलीची सुरुवात केली. पुण्याच्या जिल्हाधिकारी तथा शायरा मोनिका सिंह यांच्या दमदार उच्चारातील पंजाबी लहेजा आणि गायिका गायत्री सप्रे यांच्या सुरांचा गोडवा कार्यक्रम रंगतदार करून गेला. 'अल्फाजने अल्फाज को छुआ, सहर होने तक' असे म्हणत कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर कैसरजहाँ यांची 'मैने ढूँढा साज ए फिदरत के तरन्नम में उसे....' ही शायरी सादर झाली. 'जुदा हो मुझसे मेरा यार ये खुदा ना करे....' ही झेबुन्निसा यांची शायरी, 'भूलकर के भी न दर्द को दिल से कभी जुदा समझ..' ही ताजबुद यांची तर 'खामोशी के पेड से मैंने अक्षर नही तोडे...' ही अमृता प्रीतम यांची शायरी, 'लो बुलबुलो चलो बे दिन आए बहारके...' ही शायरी कार्यक्रमाला नव्या उंचीवर नेणारी ठरली. यावेळी श्रीकांत देशपांडे, गणेश घुले, महेश अचिंतलवार, सुबोध जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

**अमृत महोत्सव वर्षानिमित्त मा. अंकुशराव कदम यांचा सत्कार**

औरंगाबाद विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. अंकुशराव कदम यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा मा. खा. सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते ९ ऑक्टोबर २०१८ रोजी सत्कार करण्यात आला.

मा. अंकुशराव कदम हे मराठवाड्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणून नावारूपास आलेल्या महात्मा गांधी मिशनचे विश्वस्त तथा सचिव आहेत. शिक्षण संस्थेच्या माध्यमातून मराठवाड्यातीलच नव्हे तर विविध राज्यातील मुलेदेखील या शिक्षण संस्थेत दर्जेदार, उच्च शिक्षण घेत आहेत. मुळातच सामाजिक कार्याची आवड असल्याने आणि त्यातही यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राच्या अध्यक्षपदाची जबाबदारी आल्याने त्यांच्या सामाजिक कार्यातही उल्लेखनीय बाबी घडत आहेत. मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त परिस्थिती, नापिकी, कर्जबाजारीपणा यामुळे त्रस्त असणाऱ्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी विविध विषयांवरील कार्यशाळा आयोजित करून या परिस्थितीशी दोन हात करण्यासंदर्भात त्यांनी उचललेली पावले महत्त्वपूर्ण आहेत. शहरातील कचराकोंडीमुळे शहरवासीयांचा गुदमरलेला श्वास मोकळा करण्यासाठी एमजीएम आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांनी घेतलेली मेहनत फळाला आली आहे.

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मा. अंकुशराव कदम यांचे यंदा वयाचे पंचाहत्तरावे वर्ष आहे. त्यानिमित्ताने त्यांचे अभीष्टचिंतन करून त्यांना पुढील कार्यासाठी व दीर्घ आयुष्यासाठी मा. खा. सुप्रियाताई सुळे यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी विभागीय केंद्राचे सचिव निलेश राऊत, अपर्णा कक्कड, सुबोध जाधव, महेश अचिंतलवार, एमजीएम फिल्म ॲण्ड आर्ट विभागाचे प्रमुख शिव कदम, प्रा. रेखा शेळके आदींची उपस्थिती होती.

# विभागीय केंद्र, लातूर

## कार्यवृत्त

### राजर्षी शाहू महाराज जयंती ( व्याख्यान)

विभागीय केंद्राच्यावतीने लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने दि. २६ जून २०१८ रोजी 'राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य व धोरण' या विषयावर लातूर येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे तर प्रमुख व्याखाते म्हणून कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. शिंदे होते. प्रा. शिंदे म्हणाले, की शाहू महाराज हे एक द्रष्टे राज्यकर्ते असून शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी 'मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा' पारित करणारे देशातील ते पहिले राष्ट्रपुरुष होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांनी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य व धोरण यावर सार्वत्रिक प्रकाश टाकला.

याच कार्यक्रमात ज्येष्ठ कवी शशिकांत हिंगोणेकर यांच्या 'ऋतुपर्व' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. या प्रसंगी प्रमुख अतिथी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. फ. म. शहाशिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे, सूत्रसंचालन केंद्राचे कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर व आभार सदस्य प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी मानले.

### श्रद्धांजली सभा

लातूर विभागीय केंद्राचे सचिव, एक यशवंतप्रेमी व्यक्तिमत्त्व, ज्येष्ठ समाजसेवक, नाट्य कलावंत श्री. हरिभाऊ जवळगे यांचे २४ जुलै २०१८ रोजी कर्करोगाच्या प्रदीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. ७४ वर्षीय हरिभाऊ जवळगे यांनी प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून शेवटच्या श्वासापर्यंत सचिवपदी पाहून प्रामाकिपणे प्रतिष्ठानचे कार्य केले.

विभागीय प्रतिष्ठानच्यावतीने २६ जुलै २०१८ रोजी भालचंद्र ब्लड बँक सभागृह, येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. श्रद्धांजली सभेचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे हे असून या प्रसंगी माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील, ॲड. मनोहरराव गोमारे, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, कॉम्रेड विठ्ठल मोरे, ज्येष्ठ सामाजिक कार्याकर्त्या सुनिता आरळीकर, प्रा. श्याम आगळे आदींसह सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर कार्यकर्ते मोठ्या संस्थेने उपस्थित होते.

### लो. टिळक पुण्यतिथी, अण्णाभाऊ साठे जयंती :

१ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय केंद्राच्यावतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार वाहून अभिवादन करण्यात आले. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या संसगोलाई जवळील पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी साठे यांच्या विचारांचे अनुयायी मोठ्या संस्थेचे उपस्थित होते. या अनुयायांना, तरुणांना प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, ॲड. मनोहरराव गोमारे, विवेक सौताडेकर, रामकुमार रायवाडीकर यांनी संबोधित केले. शेवटी विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### स्वातंत्र्यदिनी अभिवादन

१५ ऑगस्ट २०१८ रोजी भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त तिरंग्यास व राष्ट्रपुरुषांना अभिवादन केले व शहरातील सार्वजनिक महारॅलीत सहभाग नोंदविला.

### हैदराबाद मुक्तीसंग्राम दिन

लातूर येथील हुतात्मा स्मारक येथे जाऊन हैदराबाद मुक्ती लढ्यात मृत्यू पावलेल्या शहीदांच्या कार्याचे स्मरण करून दि. १७ सप्टेंबर २०१८ पुष्पांजली वाहण्यात आली. ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक जीवनधर शहरकर, मुर्गाप्पा खुमासे इत्यादींचा सत्कारही करण्यात आला.

### महात्मा गांधी जयंती-परिसंवाद

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र, लातूरच्यावतीने दि. २ ऑक्टोबर२०१८ रोजी महात्मा गांधींच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताचे 'एकविसाव्या शतकात

महात्मा गांधींजीच्या विचाराची प्रासंगिकता' या विषयावर मंगळवार २ ऑक्टोबर २०१८ रोजी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

परिसंवादाच्या मध्यक्षलस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे व प्रमुख वक्ते ज्येष्ठ राज्यशास्त्रज्ञ तथा माजी विभागीप्रमुख राज्यशास्त्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार हे उपस्थित होते

या प्रसंगी डॉ. चौसालकर म्हणाले की, स्त्रीमुक्ती, स्त्री-पुरूष ,समानता, वर्ण व्यवस्था, धर्माचे महत्व अशा कितीतरी प्रथाबाबतच्या चौकटी गांधींनी तोडल्या असून त्यांच्या विचारांची प्रासंगिकता आपल्याला वेळोवेळी जाणवणार आहे, ''डॉ. कुंभार म्हणाले की, गुजरातचे असूनही 'मोदी' आणि 'शहा' यांना अजून गांधी समजलेच नाहीत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सदस्य ॲड मनोहरराव गोमारे व आभार आणि सूत्रसंचालय विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर यांनी केले

आज निकड आहे ती शेतीविकास आणि कृषीक्षेत्राच्या आधुनिकीकरणाद्वारे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करण्याची. पर्यावरणाशी अनुरूप अशा खाद्यपदार्थांची निर्मिती, जैविक कीटकनाशकं आणि जैविक खतांचं उत्पादन, गांडूळ शेती, जैवप्रक्रिया, आरोग्यसंवर्धन, आहारशास्त्राचं अनुपालन, आयुर्वेदिक औफधांची निर्मिती, कचऱ्याचं निर्मूलन व व्यवस्थापन, शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या अवजांर-उपकरणांचं उत्पादन, पुरवठा, विक्री, दुरुस्ती-देखभाल अशा अनेकानेक क्षेत्रांत रोजगाराची साधनं व संधी निर्माण करता येतील.

**मा. शरद पवार**

# विभागीय केंद्र, रत्नागिरी

## कार्यवृत्त

### शिक्षक दिन

विभागीय केंद्र रत्नागिरी व सह्याद्री शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने माध्यमिक महिला विद्यालय पाग– चिपळूण येथे शिक्षक दिनाचे आयोजन केले होते.

प्रथम मा. यशवंतराव चव्हाण व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले या कार्यक्रमात मुख्याध्यापिका सौ. नलावडे यांनी 'शिक्षक दिनाचे महत्त्व' या विषयावर आपले विचार मांडले. विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी शिक्षकांबद्दल आपले विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या वनिता काशीद, सायली पंडित व क्षितिजा पांडे यांच्या हस्ते शिक्षकांना प्रशस्तिपत्रे देऊन गौरविण्यात आले.

### वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र रत्नागिरी व सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डे यांच्या विद्यमाने चिपळूण तालुक्यातील काही गावांमध्ये वृक्ष वाटप (रोपे) या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

आकेशीया, साग, काजू, आंबा कलम व सुरू या रोपांचे वाटप दळवटणे, तिवडी, ओवळी, तिवरे,रिक्टोली, टेरव, आंबव या गावांमध्ये सुमारे ८००० रोपांचे वाटप करण्यात आले.

जास्तीत जास्त वृक्षलागवड करून निसर्गाचा समतोल कसा राखता येईल आणि वृक्ष लागवडीचे महत्त्व जन – मानसात निर्माण होणे यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.




४-११-१९७६ इंदिराजीं समवेत ३१व्या संयुक्त राष्ट्रसंघ महासमितीच्या अधिवेशनात

# विभागीय केंद्र, अहमदनगर

## कार्यवृत्त

**शेतीकट्टा**

**विषय :– ऊस उत्पादन तंत्रज्ञान (१५.०६.२०१८)**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत ऊस उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर शेती कट्ट्याचे आयोजन आश्वी ता. संगमनेर येथे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री. नारायण निबे (विषय विशेषज्ञ, कृषी विद्या विभाग, कृषी विज्ञान केंद्र, दहिगावने ता. शेवगाव) हे उपस्थित होते. त्यांनी उसामध्ये आंतरपीक लागवड, उसाचे वेगवेगळे वाण, वाणांचा उतारा, उसाचे उत्पादन, पाणी व्यवस्थापन, लागवड व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन, आंतर मशागत आणि तण व्यवस्थापन याविषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. श्री. अशोक म्हसे प्रगतशील शेतकरी, आश्वी ता. संगमनेर हे होते. या प्रसंगी डॉ. हरी मोरे प्राचार्य कृषी महाविद्यालय, सोनई, श्री. रविंद्र मोरे, श्री. गणेश घावटे, प्रा. योगेश जाधव, प्रा. सोमनाथ दरंदले, डॉ. सारीका वाद्रे, प्रा. सुजाता पेरणे, प्रा. राजेंद्र लिपणे व परिसरातील प्रगतशील ऊस बागायतदार शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–विभागीय केंद्र, अहमदनगर सर्व सन्माननीय सदस्य तसेच श्री. अशोक पाटील म्हसे व ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरी मोरे, प्राचार्य, कृषी महाविद्यालय, सोनई, तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र लिपणे कृषी महाविद्यालय सोनाई यांनी केले.

**विषय :– हवामान बदल (०१.०७.२०१८)**

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन व शेती कट्टा कार्यक्रमाचे आयोजन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत 'हवामान बदल' या विषयावर कृषी महाविद्यालय, सोनई येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून मा. डॉ. रामचंद्र साबळे, माजी कृषी हवामान विभाग प्रमुख व मा. डॉ. शरदराव गडाख, संशोधन संचालक, म. फु. कृ. वि, राहुरी हे उपस्थित होते. या प्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. साबळे यांनी वातावरणातील हवेचा दाब तयार होण्याची कारणे, पावसाच्या वितरणातील असमानता, जागतिक तापमानवाढ, गारपीट, अतिवृष्टी, जगातील, भारतातील व मुख्यत्वे महाराष्ट्रातील हवामानाचा अचूक अंदाज कसा काढला जातो तसेच हवामानाचा अंदाज व्यक्त करणाऱ्या देशातील विविध संस्था हवामानातील बदलांना सामोरे जातांना शेतकऱ्यांनी काय काळजी घ्यावी, याविषयी सविस्तर मार्गदर्शन करून उपस्थित शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले. तसेच डॉ. शरदराव गडाख यांनी हवामान बदलामुळे पिकांवर होणारे परिणाम, शासनाच्या खरीप पिकासंबंधित विविध योजना, हवामान बदल व विद्यापीठातील संशोधन याविषयी मार्गदर्शन केले. या प्रसंगी नेवासा तालुक्यातील विविध गावातील एकूण ५१ शेतकरी व कृषी महाविद्यालय, सोनईतील प्राध्यापक, कर्मचारी वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मा. श्री. उत्तमराव लोंढे सचिव मुळा एज्युकेशन सोसायटी, सोनई तसेच मुळा सह. सा. का. लि. सोनई येथील पदाधिकारी, मुळा एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी व नेवासा तालुक्यातील विविध क्षेत्रातील पदाधिकारी उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–विभागीय केंद्र अहमदनगरच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. हरी मोरे प्राचार्य कृषी महाविद्यालय, सोनई यांनी केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. योगेश जाधव व आभार प्रदर्शन प्रा. संदीप तांबे यांनी केले.

**विषय :– खरीपातील एकात्मिक पीक व्यवस्थापन (१८.०८.२०१८ )**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत 'खरीपातील एकात्मिक पीक व्यवस्थापन' या विषयावर शेती कट्ट्याचे आयोजन खडकवाडी ता. पारनेर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री. युनुस खान, कृषितज्ज्ञ अकोला हे उपस्थित होते. या प्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी जमिनीची मशागत, पिकासाठी पाणी व्यवस्थापन, रासायनिक व सेंद्रीय खतांचा समतोल वापर, तण नियंत्रण तसेच कीड व रोग नियंत्रण करत असताना शेतकऱ्यांनी काय काळजी घ्यावी. फवारणी करताना लागणाऱ्या आवश्यक निविष्ठा त्यांचा योग्य वापर व फवारणीनंतर त्यांची योग्य विल्हेवाट करताना घ्यावयाची काळजी या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमप्रसंगी फवारणी करताना शेतकऱ्यांनी परिधान करावयाचा सर्व पोषाख व त्याचा उपयोग याबद्दल माहिती देऊन शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. तसेच प्रातिनिधीक स्वरूपात पाच शेतकऱ्यांना फवारणी करताना लागणाऱ्या उपयुक्त पोषाखाचे (किट) वितरण करण्यात आले. तसेच त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. श्री. सखाराम पाटील तमणर हे उपस्थित होते. गावच्या सरपंच श्रीमती शारदाताई तमणर, कृषी महाविद्यालय सोनईचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, तसेच डॉ. माने व्यासपीठावर उपस्थित होते. हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय केंद्र अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य तसेच श्री. रावसाहेब पाटील तमणर व ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरी मोरे प्राचार्य कृषी महा. सोनई तर सूत्र संचालन प्रा. राजेंद्र लिपणे आणि प्रा. जयसिंग वाघमारे यांनी आभार व्यक्त केले.

**विषय :– कांदा उत्पादन तंत्रज्ञान(१९.९.२०१८)**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत 'कांदा उत्पादन तंत्रज्ञान' या विषयावर शेती कट्ट्याचे आयोजन गटेवाडी ता. पारनेर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रा. एम एच गावडे साहाय्यक प्राध्यापक, उद्यान विद्या विभाग म. फु. कृ. वि., राहुरी हे उपस्थित होते. या प्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी कांदा लागवड संबंधी खरीप व रब्बी हंगामातील अधिक उत्पादन देणारे वाण, गादी वाफा तयार करताना घ्यावयाची काळजी, जैविक खते व त्यांचे प्रमाण, सरी वरंबा पद्धतीने लागवड करण्याचे फायदे, पाणी व्यवस्थापन, तण नियंत्रण, हिरवळीच्या खताचे महत्त्व, कीड व रोग व्यवस्थापन, पिकाची काढणी व साठवण करताना काय काळजी घ्यावी इ. विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गटेवाडी गावचे सरपंच श्री. दशरथ गट उपस्थित होते. तसेच श्रीमती शुभांगी औटी, ग्रामसेवक, गटेवाडी, प्रा. योगेश जाधव कृषी महाविद्यालय, सोनई, श्री. आप्पासाहेब गट कृषी साहाय्यक व परिसरातील प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय केंद्र अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य, श्री. आप्पासाहेब गट, श्री. रामचंद्र गट व गटेवाडी ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. योगेश जाधव यांनी तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र लिपणे यांनी केले.

# विभागीय केंद्र, सोलापूर

## कार्यवृत्त

### वाहतूक सुरक्षा अभियान

सध्या भेडसावणारा वाहतूक सुरक्षेचा विषय खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेनुसार तरुणाईपर्यंत पोहोचेचविण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र, सोलापूर, आणि सारथी सुरक्षा यांच्या संयुक्त विद्यमाने ०६, ०७ व ०८ ऑगस्ट रोजी सलग तीन दिवस जिल्ह्यातील सहा महाविद्यालयांमध्ये या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. 'सारथी सुरक्षा'चे विनय मोरे यांचे प्रमुख मार्गदर्शन होते. सध्या सरासरी १८ ते ४० वयोगटातील तरुणांचे अपघात होतात, हे भयावह वास्तव आहे. अपघातग्रस्तांमध्ये तरुणाईचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे या अभियानाद्वारे जागरूकता निर्माण करण्यासाठी व्याख्यानातून प्रबोधन आणि मनोरंजन करून वाहतुकीचे नियम का पाळावेत, तसेच वाहन चालविताना आणि रस्त्यावरून चालताना कोणती खबरदारी घ्यावी यासंबंधीचे सखोल मार्गदर्शन श्री. विनय मोरे यांनी विद्यार्थ्यांना केले. संगमेश्वर महाविद्यालयामध्ये सौ. वैशाली शिंदे, सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा यांच्या हस्ते या अभियानाचे उद्घाटन झाले. महाविद्यालयाच्या प्राचार्य सौ. राजमान्य या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. वि. गु. शिवदारे महाविद्यालय, शंकरराव पाटील महाविद्यालय, अनगर ता. मोहोळ, ऑर्चिड कॉलेज, सोलापूर, शिवाजी रात्र महाविद्यालय, नारायणराव कुचन महाविद्यालय या सहा महाविद्यालयांमध्ये या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

### युवा ज्योत रॅली

प्रतिष्ठानचा नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि सोलापूर विभागीय केंद्राच्यावतीने १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० ते ७.३० या कालावधीत शंभर युवांनी युवा ज्योत रॅलीचे आयोजन केले होते. हुतात्मा स्तंभ येथे अभिवादन करून ही रॅली सम्राट चौक, शिवाजी चौक, सरस्वती चौक, यामार्गे चार हुतात्मा पुतळा येथे आली. युवांच्या हस्ते चार हुतात्म्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत आणि संविधानाचे वाचन करून रॅलीची समाप्ती झाली.

### वंचित बालकांचे हक्क विकासाच्या केंद्रस्थानी असावेत –भा.ल. कोरगावकर

वंचित बालकांचे हक्क विकासाच्या केंद्रस्थानी असले पाहिजेत. वंचित मुलांच्या शाश्वत पुनर्वसनासाठी समाज व शासन यांनी सक्रीय पुढाकार घ्यावा, असे आवाहन भा.ल. कोरगावकर यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई– विभागीय केंद्र सोलापूर, आपलं घर बालगृह, वालचंद कला वा शास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आपलं घरच्या रौप्यमहोत्सवानिमित्त 'वंचित मुले व समाज' या विषयावर आयोजित एकदिवसीय परिसंवादात बीजभाषण करताना ते पुढे म्हणाले, की पोषण आहार व बालशिक्षण हा भारतीय बालकांच्या संदर्भात जीवन–मरणाचा प्रश्न बनला आहे. सारे जग अक्षर साक्षरता साध्य करून डिजिटल साक्षरतेकडे वाटचाल करताना भारतातील मुले मात्र मूलभूत हक्कांपासून वंचित आहेत. बालपण निर्देशांकात ब्रिक्स देशांत भारताचा क्रमांक सर्वांत शेवटचा आहे. वंचित मुलांचा प्रश्न समाजाच्या दया व सहानुभूतीवर अवलंबून न ठेवता कायद्यानेच शाश्वत पुनर्वसन करण्याकरिता शासनाने पावले उचलली पाहिजेत असे प्रतिपादन त्यांनी केले.

या परिसंवादाचे उद्घाटन शुभांगी बुवा यांच्या हस्ते झाले. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संतोष कोटी होते. विचारमंचावर साथी पन्नालाल सुराणा, विभागीय केंद्राचे सदस्य दत्ता गायकवाड, प्रा. डॉ. अबोली सुलाखे उपस्थित होते. युवाशक्ती हीच राष्ट्रशक्ती आहे. युवकांच्या सहभागानेच वंचित मुलांचा प्रश्न सुटू शकेल व भविष्यात 'पाखर'सारख्या संस्थांची गरज राहू नये, अशी अपेक्षा शुभांगी बुवा यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. संतोष कोटी म्हणाले, की समाजकार्याच्या विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण झाल्यावर काही महिने वंचित बालकांसाठी काम करणाऱ्या संस्थेत विनामूल्य काम करावे. किल्लारी भूकंपात अनाथ झालेल्या बालकांच्या पालकत्वाची जबाबदारी साथी पन्नालाल सुराणा व 'आपलं घर' यांनी घेतली. या प्रकल्प उभारणीसाठी मा. शरद पवार साहेबांनी मोलाची भूमिका बजावली. हे ऐतिहासिक व अभिनंदनीय समाजकार्य

आहे. आदिवासी समाजात एकही अनाथ बालक आढळत नाही. मात्र सुशिक्षित समाजातील वंचित व अनाथ बालकांची संख्या समाजाच्या सुसंस्कृतपणावर प्रश्न निर्माण करते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. कोटी यांनी केले. उद्घाटनाच्या सत्रात प्रा. डॉ. अबोली सुलाखे यांनी 'वंचितांच्या पुनर्वसनात संगीताचे योगदान' या विषयावर मार्गदर्शन केले. संगीत मनोरंजनासोबत जीवन जगण्याचा आधार मिळवून देते असे त्या म्हणाल्या. उद्घाटन सोहळ्याची प्रस्तावना साथी पन्नालाल सुराणा यांनी केली व 'आपलं घर'च्या स्थापना व रौप्य महोत्सवी वाटचालीचा आढावा घेतला. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. अभय जाधव व प्रा. श्रीकांत धारुरकर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती वाघमारे यांनी केले तर आभारप्रदर्शन निलेश ठाकूर यांनी केले.

**मूक व कर्णबधिर मुलांचे तपासणी शिबिर**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, आणि स्टार की फौंडेशन, अमेरिका यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार ३० सप्टेंबर रोजी मूक व कर्णबधिर मुलांची तपासणी व मोजमाप शिबिर नू.म.वि. प्रशालेमध्ये सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन माजी खासदार तथा विभागीय केंद्राचे सदस्य श्री. धर्मण्णा सादूल, विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. राजशेखर शिवदारे यांच्या हस्ते झाले. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांनी यात सहभाग घेतला. २९४ मुलांनी या शिबिराचा लाभ घेतला. सदरचे शिबिर ० ते १२ वयोगटातील मुलांसाठी होते. स्टार की फौंडेशन च्या सर्व सहकाऱ्यांनी अत्यंत उत्तमरित्या हे शिबिर हाताळले. शिबिरासाठी सोलापूर जिल्हा परिषदेचा समाज कल्याण अपंग विभाग, जिल्हा अपंग पुनर्वसन, मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट यांचे सहकार्य लाभले. शिबीर यशस्वी करण्यासाठी आनंद कोलारकर, रोहन उत्तरकर, आकाश कोळी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

काहीतरी नवीन करायला कोणी पुढे येत असेल, तर त्याला प्रोत्साहित केलं पाहिजे. त्याच्या पाठीशी शक्ती उभारली पाहिजे. ज्या परिसरात काही घडत नसेल, त्या ठिकाणी कोणी काही घडवण्याचा प्रयत्न करत असेल तर ते घडवणाऱ्याला आपण साथ दिली पाहिजे. कै. यशवंतराव चव्हाणसाहेबांनी अशाप्रकारची वृती जाणीवपूर्वक जोपासली होती. तिचा अभाव आपल्याला आज पहायला मिळतो. या अभावाची किंमत त्या अविकसित परिसरातल्या माणसालाच शेवटी द्यावी लागते, हे कठोर सत्य आहे. २६ फेब्रुवारी १९८८

**मा. शरद पवार**

# विभागीय केंद्र, अंबेजोगाई

## कार्यवृत्त

### वृद्धांना काठ्या वाटप

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, अपंग हक्क विकास समिती व मानवलोक, अंबेजोगाई यांच्यावतीने दि. १९ जुलै २०१८ रोजी गरजू वृद्धांना चालण्यासाठी आधाराच्या काठ्या वितरीत करण्यात आल्या.

त्यावेळी अपंग हक्क विकास समितीचे मा. विजय कान्हेकर, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र, अंबेजोगाई चे अध्यक्ष डॉ. द्वारकादास लोहिया, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई चे कार्यक्रम संयोजक मा. दत्ता बाळसराफ, 'मानवलोक'चे कार्यवाह मा. अनिकेत लोहिया, मा. निलेश राऊत, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र, अंबेजोगाईचे सचिव डॉ. नरेंद्र काळे, सौ. आशाताई भिसे, मा. जयसिंग चव्हाण, जनसहयोगचे श्याम सरवदे इ. सह गरजू वृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सिटा संवाद

शेतकऱ्यांना शेतीविषयी काय वाटते? शेतकऱ्यांच्या समस्या, प्रश्न समजावून घेण्यासाठी लोकनेते शरदचंद्र पवार यांच्या सूचनेवरून सिटा संवाद कार्यक्रम राबवत आहे. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गटशेती, समूह शेती करावी, शेतीचे उत्तम व्यवस्थापन करावे, जो पिकवतो तो विक्री करू शकत नाही हे वास्तव आहे. तेव्हा जोपर्यंत शेतीसमोरचे प्रश्न भारताच्या पंतप्रधानांपर्यंत पोहोचणार नाहीत तोपर्यंत शेतकऱ्यांचा विकास होणार नाही असे प्रतिपादन सिटाचे कार्यकारी संचालक फिरोज मसानी यांनी केले.

सिटा (सेंटर फॉर इंटरनॅशनल ट्रेड इन ॲग्रीकल्चर ॲण्ड ॲग्रो बेस्ड इंडस्ट्रीज), यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई विभागीय केंद्र, अंबेजोगाई (बीड जिल्ह्याकरिता), मानवलोक, अंबेजोगाई व कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबेजोगाई, खरेदी विक्री संघ, अंबेजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, १९ जुलै रोजी मानवलोक मुख्यालय, रिंग रोड, अंबेजोगाई येथे सिटा संवाद हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शेतकरी कंपन्या वा फार्मर प्रोड्युसर कंपन्या आणि शेतमालाचे ठोक खरेदीदार यांच्यासाठी ई-कॉमर्स प्लॅटफार्मची निर्मिती, शेतकरी कंपन्यांचे सक्षमीकरण या विषयावर सिटा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.

या कार्यक्रमात सिटाचे कार्यकारी संचालक ज्येष्ठ कृषितज्ज्ञ फिरोज मसानी, सिटाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील तांबे, दत्ता बाळसराफ, मा. विजय कान्हेकर, मा. निलेश राऊत, अनिकेत लोहिया, प्रा.अरुण गुट्टे (विस्तार कृषी विद्यावेत्ता, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी),तसेच बीड जिल्हा बँकेचे संचालक दत्तात्रय पाटील, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष जयसिंग चव्हाण, मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया, आशाताई भिसे (लातूर), विजय कान्हेकर, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, अंबेजोगाईचे अध्यक्ष डॉ. द्वारकादास लोहिया, सचिव डॉ.नरेंद्र काळे, माजी सदस्य आ. उषाताई दराडे, अमर हबीब, अभिजीत जोंधळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी थोर नेते यशवंतरावजी चव्हाण यांच्या प्रतिमेस अभिवादन व दीपप्रज्वलन करण्यात आले.संयोजकांनी मान्यवरांचे स्वागत केले.

प्रास्ताविकात अनिकेत लोहिया यांनी गटशेतीची संकल्पना रूजली पाहिजे हे सांगून मानवलोक पुढील काळात शेतीपूरक उद्योगांची उभारणी करणार असल्याचेही सांगितले. जनावरांसाठी सामूहिक गोठा उभारण्याची अपेक्षा व्यक्त केली. तर कृषी पत्रकार सुनिल तांबे यांनी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्र पवार यांच्या पुढाकाराने सेवा सिटाच्या माध्यमातून शेतकरी व शेतकरी कंपन्यांच्या मार्गदर्शनासाठी प्रकल्प अहवाल तयार करणे, केंद्र व राज्य सरकार तसेच नाबार्डच्या विविध योजना व कार्यक्रमांचा लाभ मिळवणे, सल्लागार सेवा या सुविधा सुरू करण्यात येणार आहेत. शेतकरी कंपन्या आणि कॉर्पोरेट वा मोठे खरेदीदार यांनी शेतकरी कंपन्यांकडून थेट खरेदी करावी, यासाठी ई-कॉमर्सचा प्लॅटफॉर्म उभारण्यासंबंधात सिटा पुढाकार घेणार आहे, अशी माहिती दिली गेली. ज्या शेतकरी कंपन्या वायदेबाजारात उतरतात, त्यांच्यासाठी माहिती सेवा-कमोडिटी इंटेलिजन्स- पुरवण्यासंबंधात सिटा उत्प्रेरकाची

भूमिका पार पाडेल. या सर्व अनुषंगाने शेतकरी कंपन्यांना उपरोक्त विषयांची माहिती व्हावी याकरिता या सिटा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे असे सांगितले. तसेच यावेळी डॉ.अरुण गुट्टे यांनी सरकारच्या सुधारणावादी धोरणांमुळे कृषी विद्यापीठातून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविले जातात असे सांगितले.

या कार्यक्रमात फार्मर प्रोड्युसर कंपन्यांचे प्रतिनिधी दत्ता काकडे, अभिमान आवचार, बाळासाहेब चव्हाण, रवि गोरे तसेच सीएम फेलो दादासाहेब गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी कृषी तज्ज्ञांना विविध प्रश्न विचारले. पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनद्वारे सिटा संवाद व सेंद्रीय शेतीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

अध्यक्षीय समारोप यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, अंबेजोगाईचे अध्यक्ष डॉ. द्वारकादास लोहिया यांनी केला, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश राऊत यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, अंबेजोगाईचे सचिव डॉ.नरेंद्र काळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सिटा संवाद कार्यक्रमास बीड, लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रगतिशील शेतकरी, शेतकरी कंपन्यांचे व शेतकरी गटाचे प्रतिनिधी, शेतमालाचे व्यापारी, शेतमाल प्रक्रिया उद्योगांचे प्रतिनिधी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, कमिशन एजंट, नाबार्ड तसेच शेतीकर्ज पुरवठा करणाऱ्या बँका, कृषी विद्यापीठातील विस्तार विभागाचे अधिकारी वा प्राध्यापक, कृषी विभागाचे अधिकारी, विद्यार्थी, महिला, स्वयंसेवी संस्था, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले. सदरील कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य होता.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिजीत जोंधळे, रणजित मोरे, गोविंद टेकाळे, सलीम शेख, कृष्णा सापते, मानवलोकचे सर्व कार्यकर्ते यांनी पुढाकार घेतला.

### युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली

मागील अनेक वर्षांपासून नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दरवर्षी युवकांमध्ये राष्ट्रभावना जागृत होण्यासाठी युवा स्वातंत्र्य ज्योत रॅलीचे आयोजन करण्यात येते. ही रॅली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र, अंबेजोगाईच्यावतीने नवमहाराष्ट्र अभियानांतर्गत आयोजित करण्यात येते. यावर्षीही ही रॅली स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला मंगळवार, दि.१४ ऑगस्ट रोजी अंबेजोगाईत काढण्यात आली. युवा स्वातंत्र्य ज्योत रॅलीत अंबेजोगाईकर मोठ्या संख्येने सहभागी झाले. रॅली आयोजनाचे यंदाचे हे अकरावे वर्ष होते. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला दरवर्षी

राज्यातल्या २५ शहरांत ही रॅली काढण्यात येते. यावर्षी या रॅलीचे आयोजन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र, अंबेजोगाईच्यावतीने नवमहाराष्ट्र अभियानांतर्गत करण्यात आले. अंबेजोगाईत रॅलीचे उदघाटन अपर पोलीस अधीक्षक अजित बोऱ्हाडे यांच्या हस्ते करण्यात आले. नगरपरिषद कार्यालय परिसरातील दै. विवेकसिंधू कार्यालयासमोरून रॅलीस प्रारंभ होऊन ही रॅली सावरकर चौक – मंडीबाजार – योगेश्वरी देवी मंदीर – शिवाजी चौक– पंचायत समिती – बसस्टँड मार्गे निघून वेणूताई चव्हाण कन्या शाळेच्या प्रांगणात या रॅलीचा समारोप झाला. रॅलीच्या समारोपप्रसंगी भारतीय संविधानाच्या सरनाम्याचे सामूहिक वाचन करण्यात आले व त्यानंतर राष्ट्रगीत झाले.

या रॅलीमध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, अंबेजोगाईचे डॉ. द्वारकादास लोहिया (अध्यक्ष), ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, डॉ. नरेंद्र काळे (सचिव), दगडू लोमटे (उपाध्यक्ष), अभिजित जोंधळे (कोषाध्यक्ष), मुजीब काझी, अनिकेत लोहिया (मानवलोक), ॲड. जयसिंग चव्हाण, अक्षय मुंदडा, उपनगराध्यक्ष सारंग पुजारी, पंचायत समितीचे उपसभापती तानाजी देशमुख, कॉ. अजय बुरांडे, अंकुशराव काळदाते, मधुकर काचगुंडे, वाजेद खतीब, वैजेनाथ देशमुख, ॲड.संतोष लोमटे, डॉ.राहुल धाकडे, डॉ.मुकुंद राजपंखे, प्रा. भगवान शिंदे, प्रविण चोकडा, मोईन शेख, एस.बी.सय्यद, प्रा. सुलभाताई सोळंके, प्रा. प्रशांत जगताप, शाम सरवदे, प्रज्ञाताई आपेगावकर, अनंत अरसुडे, गोपाळ मस्के, अमोल पवार, रणजित मोरे, गोंविद टेकाळे, आशिष जाधव, नेताजी साळुंके, कृष्णा सापते आदींसह अंबेजोगाई शहर व परिसरातील महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक, युवती, प्राध्यापक, सर्वसामान्य नागरिक, महिला, स्वयंसेवी सामाजिक संस्था, संघटना, राजकीय पक्ष, प्रशासकीय अधिकारी यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

### ४ ऑक्टोबर २०१८

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, स्टार्की फाऊंडेशन– अमेरिका, अपंग हक्क विकास मंच, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, पुणे, महात्मा गांधी सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील

सुमारे १५ हजार कर्णबधिर विद्यार्थ्यांना मोफत श्रवणयंत्रे देण्यात येणार आहेत. त्याकरिता अंबेजोगाईत गुरुवार, दि.४ ऑक्टोबर रोजी मनस्विनी महिला प्रकल्प, धडपड कार्यालय, सायगांव नाका, पोखरी रोड येथे कर्णबधिर विद्यार्थ्यांचे नावनोंदणी, पूर्व तपासणी व मोजमाप शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ३०० कर्णबधिर विद्यार्थ्यांची मोफत तपासणी करण्यात आली. या शिबिराच्या उद्‌घाटन प्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, अंबेजोगाईचे अध्यक्ष डॉ. द्वारकादास लोहिया, उपाध्यक्ष दगडू लोमटे, सचिव डॉ.नरेंद्र काळे, कोषाध्यक्ष अभिजीत जोंधळे यांच्यासह प्रतीक निर्मळ व तज्ज्ञांचा संच उपस्थित होता.

यावेळी तज्ज्ञांनी अंबेजोगाईमध्ये ३०० कर्णबधिर विद्यार्थ्यांची तपासणी केली व मोजमाप घेतले. या शिबिराच्या प्रारंभी माहिती देताना डॉ.नरेंद्र काळे म्हणाले, की या उपक्रमांतर्गत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रातील शून्य ते दहा वर्ष वयोगटातील तब्बल १५ हजार विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५,०००/- रु. किमतीची श्रवणयंत्रे देण्यात येतील. श्रवणयंत्रांचे वितरण २५ व २६ ऑक्टोबर २०१८ रोजी माजी केंद्रीय कृषिमंत्री खा. शरदचंद्र पवार साहेबांच्या उपस्थितीत पुणे येथे होणार आहे. अंबेजोगाईत गुरुवारी आयोजित केलेल्या कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी, पूर्व तपासणी व मोजमाप शिबिराच्या यशस्वितेसाठी मानवलोक (अंबेजोगाई), यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागिय केंद्र-अंबेजोगाई, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय (अंबेजोगाई),अनुसया कॉम्प्युटर्स (अंबेजोगाई) इत्यादी संस्थांनी मोलाचे सहकार्य केले, तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रणजित मोरे, गोविंद टेकाळे, प्रा. डॉ.दिलीप भिसे, प्रा.टी.एन.चव्हाण, सलीम शेख, कृष्णा सापते, वाघ सर आदींनी विशेष प्रयत्न केले.



लडाख येथील ग्रामस्थांसमवेत लोकसंगीताच्या तालावर.. (१९६१)

# विभागीय केंद्र, ठाणे

## कार्यवृत्त

दि. २२. ०८. २०१८ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे जिल्हा केंद्र व कोकण मराठी साहित्य परिषद युवा शक्ती, मुंबई–ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने एम. एच. हायस्कूल, ठाणे (पश्चिम) येथे वक्तृत्व स्पर्धेचे अ गट नववी ते बारावी व ब गट पदवी गट असे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी ठाणे, शहापूर, पनवेल, चेंबूर, घाटकोपर, नवी मुंबई, माटुंगा, महाड, मुंबई अशा विविध भागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. आदित्य देसाई, प्रा. जयश्री जंगले, प्रा. अनुया धारप आणि प्रा. मानसी वाळिंबे यांनी काम पाहिले. या स्पर्धेसाठी अ गटातून २८ तसेच व गटातून २२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ संध्याकाळी ६ वाजता ॲड. मा. मुक्ता दाभोळकर यांच्या हस्ते करण्यात आला. अ गटातून प्रथम पारितोषिक एम. एच. हायस्कूलच्या मैत्रेयी भारती हिने, द्वितीय पारितोषिक आचार्य महाविद्यालयाच्या सौंदर्या कांबळे हिने, तृतीय पारितोषिक रूपारेल महाविद्यालयाच्या दर्शन गायकवाड याने, उत्तेजनार्थ पारितोषिक रूपारेलच्या अमेय वायंगणकर व विशेष पारितोषिक व्हीजेटीआय महाविद्यालयाच्या अमन सरगर यांनी मिळवले. ब गटातून प्रथम पारितोषिक बांदोडकर महाविद्यालयाच्या अनिकेत पाळसेने, द्वितीय पारितोषिक वझे केळकर महाविद्यालयाच्या किशोर शेट्टीने, तृतीय पारितोषिक रुईया महाविद्यालयाच्या नम्रता गोडांबने तर उत्तेजनार्थ पारितोषिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या लक्ष्मण कचरे यांना मिळाले. सदर प्रसंगी ॲड मा. मुक्ता दाभोळकर यांनी 'विवेकवादाच्या चळवळीला हवी तरुणांची साथ' या विषयावर आपली मते व्यक्त करताना सांगितले, की आजच्या तरुणांची लढाई आपल्या विचारांशी असली पाहिजे, आपल्या भोवतालचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण अविवेकाची साथ न देता विवेकाने आपण पुढे गेले पाहिजे. आपल्याला जगताना प्रश्न पडले पाहिजेत आणि ते विचारले गेले पाहिजेत. आपण जात, धर्म यात न अडकता आपल्या देशातील विविधतेच्या आचाराचा विचार केला पाहिजे. अंनिसची प्रचंड मोठी चळवळ समाजातील अंधश्रद्धा समूळ नष्ट करण्यासाठी काम करतेय. तरुणांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. विवेक वाहिनी प्रत्येक विद्यार्थ्याने आपापल्या महाविद्यालयात कार्यरत करावी यासाठी अंनिस तुमच्यासोबत असेल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे जिल्हा केंद्रातर्फे शिक्षक दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाचे प्रभारी अध्यक्ष श्री. चंद्रशेखर ओक, आय. ए. एस. यांचे अध्यक्षतेखाली विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार समारंभ ८ सप्टेंबर २०१८ रोजी सकाळी ११ वाजता एम.एच. विद्यालय, ठाणे येथील सभागृहात पार पडला. ठाणे केंद्राचे सचिव श्री. अमोल नाले यांनी ठाणे केंद्राच्या विविध उपक्रमांची माहिती प्रस्ताविकातून दिली. यावेळी सत्कारार्थींमधील ज्येष्ठ पत्रकार व मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. नरेंद्र बाबळे यांनी पत्रकारितेच्या जुन्या व नवीन कल्पना कशा बदलत गेल्या याचे सुरस वर्णन केले तर प्रा. भगवान चकदेव यांनी भौतिकशास्त्र शिकवत प्रयोगाची प्रात्यक्षिके गावोगावी जाऊन कशी केली त्याचे महत्त्व विशद केले. सौ. प्राजक्ता सामंत यांनी नर्सिंगची पदवी कशी मिळवली आणि त्यांना येणारे अनुभव यावर सविस्तर माहिती दिली. जीवनाचा प्रवास हा पोटापासून सुरू होतो हे तत्त्व अंगी बाणलेल्या व सामान्य कुटुंबातून आलेल्या सौ. वंदना मिश्रा चतुर्वेदी यांनी हॉस्पिटॅलिटी व टुरिझमचा अभ्यासक्रम निवडण्यामागचे कारण व त्याचे जीवनातील महत्त्व विस्ताराने स्पष्ट केले. त्या डी. वाय. पाटील कॉलेजला संचालिका असून इतर अभ्यासक्रमांपेक्षा हा विषय व्यक्तिमत्त्व विकासाला कसा उपयुक्त आहे हे त्यांनी विस्ताराने सांगितले. डॉ. मृदूल निळे यांनी आदिवासी विभागातील जीवनाचे वर्णन करताना ते चित्र नजरेसमोर उभे केले. निवडणुकीच्या संदर्भात नोटा या प्रकाराबद्दल शासनाला कशा सूचना पाठविल्या ते सांगितले. सर्व सत्कारमूर्तींना मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. चंद्रशेखर ओक यांनी आत्ताची शिक्षणप्रणाली व शासनाची भूमिका मांडली आणि शिक्षणाशी त्यांचा संबंध कसा येत गेला, हे सांगितले. यावेळी त्यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे केंद्राच्या कार्याचीदेखील स्तुती केली. प्रा. दीपा ठाणेकर यांनी सर्व सत्कारमूर्तींशी संवाद साधला आणि त्या

संवादामधून सर्वांना बोलके केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे जिल्हा केंद्र व रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २ ऑक्टोबर २०१८ रोजी नरेंद्र बल्लाळ सभागृह, ठाणे महानगरपालिका, ठाणे येथे मा. श्री. महेश झगडे (आय.ए.एस., निवृत्त प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई) यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या पाच ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ थाटात साजरा करण्यात आला. श्री. विश्वंभर दास, निवृत्त अधीक्षक अभियंता, एम. एस. इ. डी. सी. एल. यांची संगीतमय मुलाखत व त्यांचा वाद्यवृंद यामुळे गायनाचा कार्यक्रमदेखील छान रंगला. डॉ. दामोदर खडसे मराठी भाषिक असून हिंदी साहित्यातील त्यांची प्रगती उल्लेखनीय आहे. संवादिका डॉ. लतिका भानुशाली यांनी घेतलेल्या मुलाखतीदरम्यान प्रश्नांची दिलखुलास उत्तरे डॉ. खडसे यांनी हिंदीत दिली. फादर फ्रान्सिस दिब्रिटोंनी मुलाखतीत वसईचा हरितपट्टा राखण्यासाठी व खाजगी परिवहन सेवेच्या विरुद्ध दिलेला लढा कसा यशस्वी झाला? याचे सविस्तर स्पष्टीकरण दिले. श्री. अरविंद हेब्बार हे मूळचे कानडी, त्यांचे शिक्षण कानडीत झालेले; परंतु त्यांनी मराठीत विपुल लेखन केले. यावेळी त्यांनी कानडीतील नावाजलेल्या कलाकृती मराठीत अनुवादित केल्याचे सांगितले. डॉ. भगवान नागपूरकर हे शासकीय रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. निवृत्तीनंतर ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कसे प्रयत्न करीत आहेत? याचे त्यांनी सोदाहरण विवेचन केले.

सर्व ज्येष्ठ नागरिकांचा शाल, श्रीफळ, गौरवपत्र, स्मृतिचिन्ह व पुस्तक भेट देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. महेश झगडे यांनी स्वातंत्र्योत्तर काळानंतर मानवाचे आयुष्य कसे वाढत चालले आहे, हे सांगितले व होऊ घातलेल्या शास्त्रीय क्रांतीमुळे होणाऱ्या संभाव्य परिणामांची कल्पना दीर्घ उदाहरणांच्या साहाय्याने मांडली. आता ज्येष्ठ नागरिकांची जबाबदारी कशी वाढत चालली आहे हे स्पष्ट करताना त्यांनी सांगितले, की ज्येष्ठ नागरिकांनी जर यात सहभाग घेतला नाही तर निर्माण होणाऱ्या बेरोजगारीच्या संकटाचा मुकाबला करणे समाजाला कठीण होईल. सामाजिक प्रश्न केवळ भौतिक प्रगतीमुळे सुटणारे नाहीत. राजकीय शक्ती या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहात नाहीत या मुद्यावर त्यांनी भर दिला. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे जिल्हा केंद्राचे सर्व पदाधिकारी तसेच रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थचे सर्व पदाधिकारी तर उपस्थित होतेच; पण ठाण्यातील मान्यवर रसिकांनी सभागृह पूर्णपणे व्यापून टाकले होते.



तोफांची पहाणी करताना (१९६४)

# देवराष्ट्रे अहवाल

दि. १ जुलै २०१८ ते १० ऑक्टोबर २०१८ या चार महिन्यांच्या कालावधीत स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या देवराष्ट्रे येथील ''जन्मघर स्मारकास'' एकूण ११४२ पर्यटकांनी भेटी दिल्या.

दि. १८ जुलै रोजी श्री. शरद पवार साहेबांचे नातू श्री. रोहित पवार (इंडियन शुगर मिल्स असो. चे राष्ट्रीय अध्यक्ष) यांनी जन्मघर स्मारकामधील सर्व फोटो पाहिले व येथे येणाऱ्या प्रत्येक पिढीला नवी उर्जा मिळेल; ज्या व्यक्तीने आधुनिक महाराष्ट्र घडविला त्यांच्या जन्मघर स्मारकास भेट देणे ही एक अविस्मरणीय घटना आहे. मी सुद्धा या जन्मघरातून एक नवी प्रेरणा घेऊन जात आहे असे उदगार त्यांनी काढले.

दि. १८ ऑगस्ट रोजी विठामाता चव्हाण स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी देवराष्ट्रे ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच श्री. प्रकाश मोरे यांच्या हस्ते श्रीमती विठामाता चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-केंद्र देवराष्ट्रे, यशवंतराव हायस्कूल व कला – विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'सुसंस्कृत माता' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा. सौ. निता पाटील लाभल्या होत्या. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, ''आपला पाल्य शाळेत जितका वेळ असतो त्यापेक्षा जास्त काळ तो आपल्या घरी असतो; घरचे संस्कार कसे असावेत याकडे सर्वांचे लक्ष असले पाहिजे.'' या कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहन मोरे होते तसेच गावातील इतर पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते.



# YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN

MKCL
Creating a Knowledge Lit World

नवीन

# MS-CIT

आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

या सुट्टीत घडवा तुमचे करियर,
होऊया कंप्यूटरचे स्मार्ट यूझर!




| Windows 7 | Office 2013 | ९५ लाखांहून अधिक लोकांना कंप्यूटरचे 'स्मार्ट यूझर्स' बनविणारा कोर्स |
|---|---|---|

**Other Courses**

- ⇨ **MS-Office**
- ⇨ **Web Designing**
- ⇨ **Advance Excel**
- ⇨ **DTP**
- ⇨ **Tally Expert**

5th Floor, Y.B.Chavan Centre, Gen J.Bhosale Marg, Opp Mantralaya,
Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel No : 022 - 22817975 / 22043617/19 / 9769256343

# YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN

5th Floor, Y.B.Chavan Centre, Gen J.Bhosale Marg, Opp Mantralaya,
Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel No : 022 - 22817975 / 22043617/19 / 9769256343

MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
www.mkcl.org/klic

## New Careers

Maharashtra Knowledge Corporation Ltd., under its various education initiative now introduces KLiC, a role based Diploma program. Career can be made in different fields and in same field of work one has to perform different types roles. Learn according to your interests and gain expertise by actual Hands on. Decide your own syllabus and what you learn! Complete any 6 modules out of the given role based modules and get a KLiC Diploma ++.

### Programming Track

- KLiC SCRATCH
- KLiC C
- KLiC C++

### Other Courses

- KLiC Video Editing
- KLiC Office Assistance
- KLiC PowerPoint Expert

## KLiC Courses

### DTP and Web Designing Track

- KLiC Photoshop
- KLiC DTP (Adobe)
- KLiC DTP (Corel Draw)
- KLiC Web Designing
- *KLiC Advanced DTP
- KLiC Content Illustration

### IT Hardware and Networking Track

- KLiC Hardware Support
- KLiC Network Support
- KLiC Security Support
- KLiC Desktop Support

### Finance and Accounts Track

- KLiC Tally
- *KLiC Advanced Tally
- KLiC Excel
- *KLiC Advanced Excel

क्लिक कोर्सेससाठी नजीकच्या MS-CIT/ KLiC केंद्राशी आजच संपर्क साधा. | अधिक माहितीसाठी- संपर्क: 9326552525 | वेबसाइट: www.mkcl.org/klic

# यशवंतराव चव्हाण राज्य पारितोषिक पुरस्कारप्राप्त मान्यवर

| सन | पारितोषिक विजेता | पारितोषिक |
|---|---|---|
| १९९० | मा. तात्यासाहेब कोरे | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९१ | मा. बाबा आढाव | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९२ | मा. विजय बोराडे | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९३ | मा. नारायण सुर्वे | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९४ | मा. आप्पासाहेब चमणकर | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९६ | श्रीमती शांताबाई दाणी | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९६ | मा. अरूण निकम | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९७ | मा. शंकरराव खरात | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९८ | डॉ. जयंतराव पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९९ | मा. दादासाहेब रुपवते | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००० | सर्च-शोधग्राम, गडचिरोली | ग्रामीण विकास पारितोषिक |
| २००१ | कवयित्री शांता शेळके | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| २००२ | 'प्रयोग' परिवार | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| २००३ | डॉ. यु. म. पठाण | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००४ | डॉ. चित्रा नाईक | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २००५ | पं. भीमसेन जोशी | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २००६ | श्री. भंवरलाल जैन | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २००७ | श्री. अनिल काकोडकर | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २००८ | प्राचार्या लीला पाटील | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २००९ | श्रीमती किशोरी आमोणकर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१० | श्री. सा. रे. पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना/ व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २०११ | मराठी विज्ञान परिषद, मुंबई | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २०१२ | मातृमंदिर, देवरुख, रत्नागिरी | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २०१३ | मा. श्री. गोविंदराव तळवलकर | मराठी साहित्य संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१४ | मा. श्री. शरद जोशी | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन |
| २०१५ | श्रीमती अरुनिमा सिन्हा | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१६ | श्री. प्रतापशेठ साळुंखे | ग्रामीण विकास/आर्थिक सामाजिक विकास |
| २०१७ | श्री. भुजंगराव कुलकर्णी | कृषी औद्योगिक समाज रचना/व्यवस्थापन प्रशासन |
| २०१८ | विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त मान्यवर

| अ. नं. | वर्ष | पुरस्कार प्राप्त मान्यवराचे नाव |
| --- | --- | --- |
| १ | १९९५ | प्राध्यापक मधु दंडवते |
| २ | १९९६ | श्री. बियांत सिंग- मरणोत्तर |
| ३ | १९९७ | डॉ. सी. सुब्रमण्यम् |
| ४ | १९९८ | श्रीमती इला भट |
| ५ | १९९९ | श्रीमती आवाबाई वाडिया |
| ६ | २००० | श्री. सुंदरलाल बहुगुणा |
| ७ | २००१ | डॉ. व्ही. कुरियन |
| ८ | २००२ | डॉ. जयंत नारळीकर |
| ९ | २००३ | श्री. आर. के. लक्ष्मण |
| १० | २००४ | न्या. व्ही.आर. कृष्णा अय्यर |
| ११ | २००५ | श्री. सॅम पित्रोदा |
| १२ | २००६ | श्री. नारायण मूर्ती व सौ. सुधा मूर्ती |
| १३ | २००७ | श्री. आर. के पचौरी व श्रीमती सरोज पचौरी |
| १४ | २००८ | इस्त्रो - (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन) |
| १५ | २००९ | प्रो. यश पाल |
| १६ | २०१० | श्रीमती महाश्वेता देवी |
| १७ | २०११ | एअर चीफ मार्शल श्री. अर्जुनसिंग |
| १८ | २०१२ | डॉ. ई. श्रीधरन |
| १९ | २०१३ | श्री. झुबिन मेहता |
| २० | २०१४ | श्री. रतन टाटा |
| २१ | २०१५ | डॉ. विजय केळकर |
| २२ | २०१६ | श्री. नंदन निलेकणी |
| २३ | २०१७ | डॉ. एम. एम. शर्मा |

# प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे : भाग १ – संकलन : डॉ व्ही जी खोबरेकर | २५०.०० |
| २. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस – विधिमंडळ – भाग २ – संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट – वाय. बी. चव्हाण – खंड १ ते ४ संपादक : राम प्रधान प्रत्येकी | २५०.०० |
| ४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन – ना. धों. महानोर | १.०० |
| ५. | सह्याद्री वारे – यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन – प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास – संपादक – वि. स. पागे | ३५.०० |
| ८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन – संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन – शरदराव पवार – भाषणसंग्रह – संपादन : दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा – संपादन : पी. बी. पाटील | |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास संशोधक / लेखक – लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल – डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण – चरित्र – लेखक – अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य – संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाउंटीफुल बनियान – डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र – खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा – (काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई'बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य / फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन – डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २४. | उपक्रम : वेचक–वेधक – डॉ. वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. | स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले – श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना – सुप्रिया सुळे | २०.०० |
| २७. | 'संवादिनी' – सुप्रिया सुळे | २०.०० |
| २८. | 'शाळांचे प्रगतिपुस्तक' डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |

२९. Yashwantrao Chavhan : an Autobiography ३९५.००

३०. यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र – कृष्णाकाठ ३००.००

३१. यशवंतराव चव्हाण व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व ५००.००

३२. शिक्षणवृत्ती – डॉ. कुमुद बन्सल २००.००

३३. शिक्षणकट्टा – बसंती रॉय २००.००

३४. वाटचाल ई–शिक्षणाची – बसंती रॉय २००.००

३५. हवामान बदलास आमचे उत्तर १००.००

३६. विचारसूत्रे – संपादन : पद्मभूषण देशपांडे २००.००

३७. पाणीबाणी – प्रभाकर साळेगावकर १६०.००

३८. पर्व–प्रगतीचे परिवर्तनाचे – पद्मभूषण देशपांडे (मराठीबरोबरच हिंदी, इंग्रजी, ऊर्दूतही उपलब्ध) खाजगी वितरणासाठी

३९. Whats App चर्चा– शिक्षण विकासाच्या – संपादक : माधव सूर्यवंशी, नितीन खंडागळे, किशोर भागवत २००.००

४०. सेमी इंग्रजी – का आणि कसे ? २००.००

- डीव्हीडी व ऑडीओ कॅसेट्स
- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट
- वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक – श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शक : विनय नेवाळकर
- ‘बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै’ माहितीपट, दिग्दर्शक – जयप्रद देसाई
- ‘जागर हा जाणिवांचा....’ लघुपट, दिग्दर्शक – चंद्रकांत कुलकर्णी
- ‘कृष्णाकांठ’ : ऑडीओ सी. डी. (ध्वनिमुद्रिका)

**चित्रपट**

- यशवंतराव चव्हाण... बखर एका वादळाची : दिग्दर्शक – जब्बार पटेल

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित संकेतस्थळे**

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे संकेतस्थळ – http://ybchavanpratishthan.org/
- यशवंतराव चव्हाण यांचे समग्र संदर्भ साहित्य - http://ybchavan.in
- धर्मानंद कोसंबी यांचे समग्र साहित्य - http://dharmanandkosambi.com/
- केतकरकृत महाराष्ट्रीय ज्ञानकोश - http://ketkardnyankosh.com/
- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे समग्र साहित्य - http://virashinde.com/
- इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाकडे उपलब्ध दुर्मीळ कागदपत्रांचे डिजिटायझेशन - http://vkrajwade.com

‘जागर हा जाणिवांचा’

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

आयोजित

# युवा संवाद यात्रा

संवादक : मा. खा. सुप्रियाताई सुळे



## संवाद दौरा

### अहमदनगर जिल्हा

- मंगळवार, दि. २ ऑक्टोबर २०१८
  महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा
- बुधवार, दि. ३ ऑक्टोबर २०१८
  राधाबाई काळे महाविद्यालय, अहमदनगर
- गुरुवार, दि. ४ ऑक्टोबर २०१८
  अगस्ती महाविद्यालय, अकोले

### औरंगाबाद जिल्हा

- शुक्रवार, दि. ५ ऑक्टोबर २०१८
  प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण

### जळगाव जिल्हा

- बुधवार, १० ऑक्टोबर २०१८
  प्रताप महाविद्यालय, अमळनेर
- गुरुवार, ११ ऑक्टोबर २०१८
  शंकर पाटील महाविद्यालय, एरंडोल
- शुक्रवार, १२ ऑक्टोबर २०१८
  कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, धरणगांव
- शनिवार, १३ ऑक्टोबर २०१८
  एम. एम. महाविद्यालय, पाचोरा



स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाबळी, युवतींवरील अत्याचार व युवांच्या व्यसनाधीनता विरोधातील संवादयात्रा











# SO THE WORLD MAY HEAR




Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai